समाजप्रबोधन व सोयरे संबंध जुळवणारा । घराघरांत अन् मनामनांत पोहचणारा ॥





मासिक

# माळी आवाज

संस्थापक / संपादक - स्व. विजयकुमार नारायण लडकत


वार्षिक वर्गणी रु. २००/-

वर्ष २०, अंक ४-५, एकूण पृष्ठे ९६

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ (मासिक)

Mali Aawaj | Pune | Vol. 20 | Issue No. 4-5 | October_November 2024 (Monthly) | Pages 96


रांगोळीच्या सप्तरंगात सुखाचे दिप उजळू दे,
लक्ष्मीच्या पावलांनी घर सुख समृध्दीने भरू दे.
दीपावलीच्या शुभक्षणांनी आपली सारी स्वप्न साकार व्हावी...

मासिक माळी आवाजतर्फे
आपणा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!!



स्थापना १९८८

विश्वासाचं नांव

®

सर्वोत्तम पुरस्कार प्राप्त संस्था

३७ वर्षाची विश्वसनीय परंपरा असलेली संस्था

# ज्योती

## सहकारी पतसंस्था मर्या.कोपरगांव.

ज्योती सर्कल, मेनरोड, कोपरगांव ४२३६०१ फोन नं.- ०२४२३-२२१०५५ / २२३०५५

शाखा - कोपरगाव, शिर्डी, सुरेगांव (कोळपेवाडी), कोल्हार, राहुरी, श्रीरामपुर, येवला, अहमदनगर,पुणे

**पुणेकरांच्या सेवेसाठी पुण्यात शाखा सुविधा**

पत्ता - अमित समृध्दी बिल्डींग ३ मजला, अभ्युदय बँकेच्यावर, बालगंधर्व चौक, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४,संपर्क- ०२०-२९९८५५३५, शाखाधिकारी नरके मॅडम मो.९९२१७३२६२५



अॅड.श्री.रविकाका बोरावके

चेअरमन





***आर्थिक स्थिती***

* ठेवी - ३४० कोटी
* कर्जे - २२५ कोटी
* गुंतवणूक - १३८ कोटी
* स्वनिधी - २५ कोटी
* एकुण व्यवसाय - ५६५ कोटी
* कायम मालमत्ता - २.२१ कोटी
* नफा - २ कोटी ६६ लाख
* ऑडिट वर्ग - सतत अ
* विनम्र व तत्पर सेवा

सोने तारण कर्ज, लॉकर्स सुविधा, NEFT / RTGS सुविधा, SMS सुविधा,मोबाईल कलेक्शन, सुलभ कर्ज वितरण सुविधा, ज्योती मोबाईल बँकींग, ई चलन सुविधा,कोअर बँकिंग सुविधा

# ❖ आमचे प्रेरणास्थान ❖



## स्व. श्री. विजयकुमार नारायण लडकत

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!!

# ❖ माळी आवाज संपादकीय व प्रतिनिधी मंडळ ❖



रागिणी लडकत



शिला गिते



रंजना जाधव



शुभांगी शिंदे



कल्पना करपे




चंद्रकला पाथरे



उज्ज्वला कुमोद



अंजली भुजबळ



बीना बुनगे



राजेश बुनगे



वसंतराव नेवसे



प्रा. आदेश बनकर



दिलीप धामणे



लक्ष्मण बादाडे



प्रसन्नकुमार शिंदे




KAPILA
Business Hotel

# कपिला बिझनेस हॉटेल

१७४, ढोले पाटील रस्ता, पुणे १

# Kapila Business Hotel

**174, Dhole Patil Road,**
**Pune - 411 001**

# दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा।



प्रार्थना आमची परमेश्वराला, सुखी, समृद्धी आणि ऐश्वर्य लाभो सर्वांना...
यशाची रोषणाई कीर्तीचे अभ्यंग स्नान, मनाचे लक्ष्मीपूजन, समृद्धीचा फराळ,
प्रेमाची भाऊबीज, अशा दिवाळीच्या आनंददायी शुभेच्छा!
लक्ष लक्ष दिव्यांनी उजळुन निघो ही निशा
घेऊनि येवो नवी उमेद नवी आशा,
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !



**मासिक माळी आवाजच्या वाचकांना, हितचिंतकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!!**




## सौ. मनिषा संदिप लडकत

नगरसेविका - पुणे महानगरपालिका
अध्यक्षा - प्रभाग समिती, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय
सदस्या - महिला बाल कल्याण समिती
सदस्या - राज्य ग्रंथागार परिषद, पुणे
माजी अध्यक्षा - विधी समिती, पुणे


## श्री. संदिप गजानन लडकत

मा. नगरसेवक - पुणे महानगरपालिका
उपाध्यक्ष - भारतीय जनता पार्टी, पुणे शहर
माजी संचालक म्हाडा

# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...



नंदन रासकर
१३ ऑक्टोबर




मा. उपमुख्यमंत्री छगन भुजबळ साहेब
अध्यक्ष, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद
१५ ऑक्टोबर



संतोष लडकत
३ ऑक्टोबर



रंजना जाधव
२८ ऑक्टोबर



नितीन रासकर
१० ऑक्टोबर




तुषार गद्रे
१८ ऑक्टोबर



केतन करपे
१ ऑक्टोबर



पार्थांश सोडकर
१० ऑक्टोबर



प्रभाकर पाटील
१० ऑक्टोबर



सुनिता भगत
४ नोव्हेंबर



जयश्री बनकर
७ नोव्हेंबर



शीला गिते
१० नोव्हेंबर



साची जाधव
२० नोव्हेंबर



रागिणी लडकत
२१ नोव्हेंबर



विक्रांत लडकत
२१ नोव्हेंबर

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...

# ● मासिक माळी आवाज संपादक व प्रतिनिधी मंडळ ●

## माळी आवाज

आपले समाजाचे मुखपत्र,
मनामनांत आणि घराघरांत सर्वात
लोक प्रिय, माळी आवाज.



### संस्थापक

स्व. विजयकुमार नारायण लडकत

### संपादिका

**रागिणी विजयकुमार लडकत**
फोन
**८७६७५ ८१९०६**
**९१५८३ ३३७५८**

### प्रकाशन स्थळ

२३, गौरव को-ऑप. हौ. सोसायटी,
सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे,
आनंदनगर, पुणे - ४११०५१.

### मुद्रण

शिवानी प्रिंटर्स,
शॉप नं, ७८९, १३११ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

### अक्षरजुळणी आणि डिझाईनींग

देवदत्त एन्टरप्रायजेस
योगेश काकडे
गणेशनगर, धायरी, सिंहगड रोड,
पुणे ४१. मो. ९८८१३०३५९४

### मुखपृष्ठ

सौ. हर्षदा प्रथमेश दोडकर

### आधारस्तंभ

सौ. बीना राजेश बुनगे
विक्रांत विजयकुमार लडकत

### पुणे विभाग

**प्रा. आदेश बनकर**
मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर,
जि. पुणे. मो. ९६६५२५३४४८

**सौ. कल्पना करपे**
९०८, गोखलेनगर, वीर बाजीप्रभूशाळेजवळ,
पुणे ४११ ०१६. मो. ९९६०४९८८४९

**अंजली भुजबळ**
नं. ३०२, रुतुजा पार्क,
सिल्व्हरबर्च हॉस्पिटलच्या मागे,
रायकर मळा, धायरी, पुणे ४११०४१.
मो.: ९७६३६५५६२७

### लातूर विभाग

**प्रा. लक्ष्मण धोंडीराम बादाडे**
पार्थ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०३,
अश्वमेघ हॉटेल मागे, महादेव मंदिर समोर,
सुभाष नगर, जुना एमआयडीसी रोड, लातूर,
जि. लातूर - ४१३५१२
मो. ७७६८८८६५६०, ९४२३४९७०८०

### सातारा विभाग

**सौ. शीला गिते**
उमेश, कोटेशवर कॉलनी, अर्क शाळेजवळ,
सातारा, मो. ९६२३६९२०४४

**श्री. वसंतराव नेवसे**
१०३, दत्तनगर, एस.टी.स्टँड मागे, मु. पो. वाई,
जि. सातारा, मो. ८१४९०१३८६५

### औरंगाबाद विभाग

**सौ. चंद्रकला पाथरे**
प्लॉट नं. १८, बिजली नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद. मो. : ९४२०२४२१६५

### वधूवर नोंदणी फी

इंटरनेट, सर्व संचालकांकडे नोंदणी,
१ वर्षासाठी : रु. २३००/- +
क्लासिफाईड रु. ३००/- +
वार्षिक वर्गणी रु. २००/- = २८००/-

### नाशिक विभाग

**सौ. उज्ज्वला कमोद**
फ्लॅट नं.११, तिसरा मजला, श्रीनंद अपार्टमेंट ,
अपेक्स हॉस्पिटल, चौक नं. ४, गोविंदनगर,
नाशिक -४२२०११
मो.९८६७५११९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

### सोलापूर विभाग

**श्री. प्रसन्नकुमार शिंदे**
खेलो टॉईज आणि स्पोर्टस्, सुजयनगर,
०७ बायपास रोड, सी.एस.बी. बँकेशेजारी,
शहा ब्रदर्स शोरुम जवळ, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०८
मो.: ७८७५४४४७५५

### ठाणे कल्याण विभाग

**सौ. शुभांगी शिंदे**
२/१०/आनंदकुंज, सीएचएस,
को. ऑ. हौ. सोसायटी, आनंद विहार,
खारेगाव, रेल्वेक्रॉसिंग जवळ, खारेगाव,
कळवा ईस्ट - ४००६०५
मो.: ८७७९५३८८२६

**सौ. रंजना जाधव**
फ्लॅट नं. २०४, शिशिर सुदामा, आर. एम/९५,
ममता हॉस्पिटलजवळ, कामत हॉस्पिटलसमोर,
एमआयडीसी, निवास, डोंबीवली, (पू)
मो ९१६७७७३५६६
वेळ : दु. १२ ते ४

### मासिकाची वार्षिक वर्गणी

रु. २००/-

**वधू-वर सूचक केंद्र कार्यालय**
१, रासकर पॅलेस, चिंतामणी नगर नं. २ शेजारी,
बिबवेवाडी, पुणे ४११०३७. फोन - ०२०-२४२८१११०
● कार्यालयीन वेळ ●
मंगळ. ते शनि. - संध्या. ४ ते ७
रवि. सकाळी - ११ ते २ (सोमवार सुट्टी)

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | – – | १० |
| २. | ध्येय आपलं गाठायचं असतं (कविता) | परशुराम लडकत | १२ |
| ३. | बलात्कार एक ज्वलंत सामाजिक समस्या | बीना राजेश बुनगे | १३ |
| ४. | माझा पाठीराखा (कविता) | डॉ. माणिक बनकर | १६ |
| ५. | विवाहसंस्था – एक अनुभव | रागिणी विजयकुमार लडकत | १७ |
| ६. | देव तिथेच बसलाय तुझ्यासाठी (कविता) | देवश्री | १८ |
| ७. | स्त्री एक आदिशक्ती | माधुरी विधाटे | १९ |
| ८. | माझी भाषा, माझी बोली, माय मराठी | डॉ. शुभांगी धारमळकर | २१ |
| ९. | निःसंग | वृषाली बोरावके | २३ |
| १०. | प्रतिकारशक्ती | डॉ. सारिका सचिन आरु | २४ |
| ११. | सत्याची ताकत | डॉ. दत्ता कोहिनकर | २६ |
| १२. | संत नामदेवांचे जन्म स्थान नर्सी | दिलीप धामणे | २८ |
| १३. | स्त्रीभ्रूण हत्या | शीला गिते | ३० |
| १४. | गुडघेदुखीवर करा मात | ॲड. भालचंद्र कोद्रे | ३२ |
| १५. | कठपूतली (कविता) | ॲड. भालचंद्र कोद्रे | ३३ |
| १६. | जगणं उथळ होत चाललंय | डॉ. अभिनय दरवडे | ३४ |
| १७. | शक्य आहे शक्य आहे, तुला सर्व काही शक्य आहे. | सतिश नागनाथ भोंग | ३६ |
| १८. | असे दिवस अशी माणसे | गोविंद बभुता मोरे | ३७ |
| १९. | सत्यशोधक विवाह | सुदाम दगडू घाडगे | ४४ |
| २०. | माथा (कविता) | परशुराम लडकत | ४८ |
| २१. | बायको, ब्रेकिंग न्यूज आणि न्यूटनचा सिद्धांत | सुरेशचंद्र वाघ | ४९ |
| २२ | गाठणं (कविता) | कल्पना दुधाळ | ५३ |
| २२. | जय जोती | पद्माकर वाघमारे | ५४ |
| २३. | पॉपकॉर्न ब्रेन सिंड्रोम | डॉ. कारभारी रा. खरात | ५७ |
| २४. | फासं (कविता) | परशुराम लडकत | ५९ |
| २५. | भारतातील रुग्णांचे हक्क | डॉ. धनंजय मानकर | ६० |
| २६. | रस्ता (कविता) | डॉ. ज्योती कदम | ६५ |
| २७. | सल | बापू त्र्यंबक माळी (सर) | ६६ |
| २८. | अभ्यंग व उद्वर्तन कथा अभ्यंगाची | डॉ. लीना बोरुडे | ७५ |
| २९. | वधू–वर यादी | – – | ७७ ते ८३ |
| ३०. | क्लासिफाईड | – – | ९१ ते ९४ |



# संपादकीय

रागिणी विजयकुमार लडकत
मो.: ८७६७५८१९०६

सर्वांना सस्नेह नमस्कार...

असं म्हणतात की, 'जीवनाचा प्रवास हा आपण नेहमी आपल्याला साथ देणाऱ्या, मदत करणाऱ्या व आपल्याविषयी सकारात्मक विचार असणाऱ्या लोकांबरोबर केला तर आपण नेहमी यशस्वी होतो. आपली चांगली प्रगती होते'.

हाच अनुभव मासिक माळी आवाज परिवाराने आपण दिलेल्या सहकार्य व सदिच्छांमुळे अनुभवला आहे.

२००३ साली राज्यस्तरीय मासिक माळी आवाजची स्थापना स्वर्गीय विजयकुमार नारायणराव लडकत यांच्या संकल्पनेतून करण्यात आली. माळी समाज बांधवांचे संघटन करणे, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले आणि संत सावता माळी यांचे विचार समाजापर्यंत पोहोचवणे आणि समाजहित साधने या उच्च हेतूने मासिक माळी आवाज समाजप्रबोधन करीत आहे.

मासिक माळी आवाज अंतरंगातून अनेकविध रंगानी बहरलेला आहे. हे रंग आहेत अनेक साहित्यिकांच्या साहित्यांचे, वधूवरांच्या सूचींचे, त्यांच्या क्लासिफाईड फोटोंचे, समाजवृत्तांचे, त्या महिन्यातील वाढदिवसांचे, निधनवृत्तांचे आणि अनेक उपयुक्त जाहिरातींचे.

मासिक माळी आवाजतर्फे दहावी-बारावी पदवीधर, गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनींचा सत्कार केला जातो. तसेच समाजातील अनेकविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या समाजबांधवांना प्रेरणा मिळावी म्हणून त्यांचाही सत्कार केला जातो. सावित्रीबाई फुले यांचा वसा पुढे चालवताना समाजातील विधवा, परित्यक्त्या महिलांसाठी हळदीकुंकू हा विशेष कार्यक्रम दरवर्षी केला जातो. दरवर्षी वधू-वर पालक मेळावे आयोजित करून एका छताखाली अनेक उपवर वधू-वरांच्या मिलनाचे मंगल कार्य मासिक माळी आवाजतर्फे आयोजित केले जाते. यावेळी वधू वर व पालकांचे समुपदेशन त्याचबरोबर डॉक्टरांचे मार्गदर्शन याचेही आयोजन केले जाते.

मासिक माळी आवाज वधु वर केंद्रामध्ये नोंदणी केलेल्या वधू-वरांना हे मासिक घरपोच मिळत असते. क्लासिफाईड रंगीत फोटोंसह वधू वर सूचिही देऊन अत्यंत दर्जेदार आणि अभ्यासपूर्ण लेख त्याचबरोबर समाजप्रबोधनपर व इतर विषयांवर आधारित कविता, अनेक जाहिराती यांचा समावेशही अंकात केला जातो.

स्व. विजयकुमार लडकत यांनी दूरदृष्टी ठेवून या अंकाच्या मदतीने अनेक माळी समाजबांधव एकजुटीने या परिवारात सामावून घेतलेले आहेत.

माळी आवाजाच्या माध्यमातून आज महाराष्ट्रातल्या जवळ जवळ अडीच हजाराहून अधिक

घरांमध्ये हा अंक पोहोचला आहे. आमचे सर्व वधू वर, संचालक आणि प्रतिनिधी यासाठी मनापासून कार्यरत आहेत. वधु वर सुचक केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत अनेक विवाह जमले आहेत. अनेक दांपत्य आज सुखा समाधानाने त्यांच्या संसारात रममान झालेली आहेत. माळी आवाजने आमचा विवाह जमविला हे शब्द जेव्हा कानावर पडतात तेव्हा अभिमानाने आमचा ऊर भरून येतो.

वाचकांची आवड, मनोरंजन, ज्ञान, जिज्ञासा याचा विचार करून विविरंगी साहित्याचा अंतर्भाव या विशेषांकात केला आहे. समाजातील ज्वलंत प्रश्न, काही चिंतनात्मक बाबी, आरोग्याचे महत्त्व, साहित्यिकांच्या भावभावना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न हा दिवाळी विशेषांक आपल्या हाती देताना मासिक माळी आवाज परिवाराने सर्वतोपरी केला आहे.

२१ सप्टेंबर २०20 रोजी विजयकुमार लडकत यांचे कोरोनामुळे निधन झाले. त्यांच्या जाण्याने समाजामध्ये कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या या कार्याची धुरा समर्थपणे पेलताना मला माझ्या कुटुंबियांची, हितचिंतकांची खूपच मदत होत आहे. त्याबद्दल मी सर्वांची आभारी आहे.

मासिक माळी आवाजच्या शाखा महाराष्ट्रभर पसरलेल्या आहेत. राज्यस्तरावर हे मासिक तेवढाच जोमाने काम करत आहे. पुणे, नाशिक, हिंगोली, औरंगाबाद, सातारा, वाई, बारामती, ठाणे, अहमदनगर, लातूर अशा अनेक विभागातून संचालक मंडळ व प्रतिनिधी मंडळ निष्ठेने मासिकासाठी काम करत आहेत. वधू-वरांची नोंदणी तेवढ्याच जोमाने प्रत्येक विभागातून होत आहे.

माळी आवाज मासिकाच्यावतीने प्रकाशित करण्यात येत असलेला 'शब्दगंध' हा दिवाळी विशेषांक आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे. या मासिकात साहित्यिकांच्या लेख कथा, कविता या साहित्याचा आस्वाद आपल्याला मिळालेला आहे. हा आस्वाद घेताना ज्ञान, मनोरंजन यांच्या शब्दरुपी सुगंधात आपण न्हाऊन निघतो. मुखपृष्ठावर सौ. हर्षदा प्रथमेश दोडकर हिचे छायाचित्र घेतलेले आहे. सुंदर फुलांची रांगोळी, त्यात तेवणारी समई, फुलांच्या माळा व हातात पूजेचे तबक घेऊन दीपावलीचा आनंद व्यक्त करताना. हर्षदा हिचे छायाचित्र अधिकच सुंदर व मोहक दिसत आहे.

हा दिवाळी अंक तयार करण्यासाठी आम्ही अनेकांना लेख मागितले. आमच्या अनेक समाज बांधवांनी आमच्या विनंतीला मान देऊन आपले लेख कविता व इतर साहित्य आमच्यापर्यंत वेळेत पोहोचविले त्यांचा समावेश या अंकात करण्यात आला आहे जाहिरातदारांनी आपल्या जाहिराती आम्हाला देऊन आपल्या उद्योगाची व व्यवसायाची प्रसिद्धी करण्याची संधी आम्हाला दिली त्याबद्दल आपल्या सर्वांचे मी आभार मानते.

काम पाहणारे श्री. योगेश काकडे, मासिकाच्या कामात सर्वतोपरी मदत करणारी माझी नणंद बीनाताई राजेश बुनगे, बहिण रंजना जाधव, मुलगी देविका लडकत, मुलगा विक्रांत लडकत या सर्वांचे आभार मानणे हे माझे आद्य कर्तव्य आहे. तसेच वेळेत दिवाळी विशेषांकाचे प्रिंटिंग करून देणारे शिवानी प्रिंटिंगचे श्री. दीपक ढोले आणि माळी आवाज मासिकाचे सर्व पदाधिकारी, सर्व भागातून कार्यरत असणारे प्रतिनिधी, संचालक, सर्व साहित्यिक यांचे मी मनापासून आभार मानते. कारण हे टीमवर्क आहे व यासाठी सर्वांनी केलेल्या सहकार्यामुळेच हा अंक आपल्या हातात देणे मला शक्य झाले आहे.

हे नमूद करणे येथे माझे आद्यकर्तव्य आहे.

आपल्या जीवनातील सर्व संकटे, ताण-तणाव, दुःख दूर होऊन आपले जीवन सुख, समृद्धी, शांती, आनंद, यश व प्रेम याने भरून जावे हीच सदिच्छा व्यक्त करून मी आपणास या दीपावलीच्या शुभेच्छा देते. धन्यवाद...

## ❖ ध्येय आपलं गाठायचं असतं ❖

कितीही झालं मनमानी वागणं
मुकाट पाण्याने सहन करायचं नसतं
जिद्दीने आता लढायचं असतं
ध्येय आपलं गाठायचं असतं....

येत राहतात चढ-उतार
चढाला खचायचं नसतं
उताराला पळायचं नसतं
ध्येय आपलं गाठायचं असतं....

निंदा करणारे भेटतात .
स्तुती करणारेही भेटतात
दोघांचही ऐकायचं असतं
ध्येय आपलं गाठायचं असतं....

यश अपयश पचवायचं असतं
कधिही कुणाला दुखवायचं नसतं
प्रेमाने जग जिंकायचं असतं
ध्येय आपलं गाठायचं असतं....



**श्री.परशुराम लडकत**
मो. नं.८१४९४७४९६१




बाळसराफ
मोटार ड्रायव्हिंग स्कूल
टु व्हिलर व फोर व्हिलर शिकवले जाईल
आरटीओची सर्व कामे केली जातील.



प्रो. प्रा.
लिना द. बाळसराफ - ९३२५२२४११८
शुभम बाळसराफ - ९९७०६३८१९०
शॉप नं., सत्यजय अपार्टमेंट,
तळेगाव-चाकण रोड, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
KESHAV
Motor Driving School
Balasaheb G. Darmalkar
M.: 9922540009 / 9372440009
Valmiki Plaza, Shop No.3, Keshavnagar, Mundhwa, Pune 36.
2 & 3 Wheeler Training Centre
We undertake All types of RTO Works







# बलात्कार एक ज्वलंत सामाजिक समस्या

**बीना राजेश बुनगे**
माध्यमिक शिक्षिका – सेवासदन संस्था, पुणे
धायरी, पुणे – ४१.
मो.: ९८८१५८५०४०

आपल्या भारतीय संस्कृतीने भारतीय स्त्रियांचे गुणगान विशेष केलेले आहे .

हे नारी...
उत्तुंग तुझ्या यशापुढे
अंबर खुजे भासावे
तुझ्या विशाल पंखाखाली
अवघे विश्वची फुलावे

खरं आहे हे. एका वेळी अनेक भूमिका निभावू शकणाऱ्या स्त्रिया ही परमेश्वराची पृथ्वीतलावर अलौकिक अशी एक देणगी आहे. अनेक अवघड आव्हाने पेलण्याची मोठी शक्ती निसर्गत: स्त्रीला मिळालेली आहे. जगतावर माया करणारी स्त्री ही आदिशक्ती आहे. कुटुंबव्यवस्था, समाजस्वास्थ्य अनादी काळापासून टिकवणारी स्त्री ही विश्वाचा आश्वासक आधार आहे. पण... ही स्त्री या भूतलावर सुरक्षित आहे का हा कायम भेडसावणारा प्रश्न ही आजची ज्वलंत समस्या आहे.

'' मॅडम माझी मुलगी दररोज साडेपाच वाजता घरी येते. आता सहा वाजले तरी ती घरी आली नाही. शाळेत तुम्ही जादा तास घेतला का?'' अशी विचारणा करणारे पालकांचे फोन नेहमी मला येत असतात. त्यावेळी नेहमीच्या वेळेपेक्षा थोडा वेळ उशीर झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थिनींच्या पालकांचा त्या घाबरलेल्या आवाजातल्या फोनचा मी नेहमी अनुभव घेते. त्यावेळी अनेक शंका कुशंकांनी त्यांच्या मनात थैमान घातलेले असते. मुलीला घरी यायला उशीर झाला म्हणजे तिच्याबरोबर काही वाईट तर घडले नाही ना? बलात्कार... विनयभंग... अपहरण... विटंबना... अशा अनेक शब्दांची भीती त्यांच्या मनामध्ये दडलेली आहे हे जाणवते.

बलात्काराच्या कितीतरी बातम्या दररोज आपण ऐकतो. अशा किती निर्भया, डॉक्टर रेड्डी, नयना पुजारी, ज्योती कुमारी, आसिफा आपलं बलिदान देणार आहेत? अशा आणखी किती लहानग्या लेकींवर पाशवी अत्याचार होणार आहेत हा प्रश्न कायम मनाला भेडसावतो. पुरुषी नजरेने बलात्कार, मनाने बलात्कार, अश्लील बोलण्यातून बलात्कार हे सतत मुली व महिला सहन करत असतात.

बलात्कार... किती किळसवाणे कृत्य! किती घृणास्पद कृत्य! किती लाजिरवाणे कृत्य ! कोणी एक किंवा अनेक अनोळखी व्यक्ती समोर येते आणि त्याच्यातील कामवासनेपोटी, शारीरिक गरज भागवण्यासाठी एखाद्या अबलेचे सर्वस्व लुटते. त्यावेळी किती वेदना होत असतील त्या स्त्रीला. नाही आवडत तिला कोणा अनोळख्या व्यक्तीचा स्पर्श. नाही आवडत तिला त्या नराधमांनी तिच्या सर्वस्वावर घाला घातलेला . ती विव्हळते, याचना करते, त्याच्या तावडीतून सुटण्याचा आटोकाट प्रयत्न सर्व ताकदीनिशी करते, आरडाओरडा करून आकाश पाताळ एक करते पण त्या नराधमाच्या असुरी ताकदीपुढे ती पराभूत होते. त्यावेळी जणू तिच्यावर आकाश कोसळते, धरनी दुभंगते, ढगफुटीची काळी अपवित्र बरसात होते. ती लुटली जाते. आपले सर्वस्व गमावते.

हे बलात्कारी केवढे निर्घृण आणि क्रूर असतात. जेव्हा तिच्यावर बलात्कार होतो तेव्हा तिचे फक्त सर्वस्वच लुटले जाते असे नाही त्याचबरोबर तिच्या सुंदर नाजूक शरीरावर अनेक जखमा होतात. रक्तबंबाळ होते ती. तिचा गळा दाबला जातो, पाय तोडले जातात, डोक्याला, डोळ्याला, हाता-पायाला मार लागलेला असतो. शरीरातील अनेक हाडे तुटलेली असतात. तिचा आवाज बंद करण्यासाठी तिचे तोंड जमिनीवर, भिंतीवर आपटलेले असते. तिच्या नाजूक अवयवांचे लचके तोडले जातात. मरणप्राय यातना सहन करत ती तशीच पडून राहते निपचित, असहाय्य. तेवढ्यानेही समाधान झाले नाही तर हे नराधम तिला मारून टाकतात, जाळून टाकतात. राक्षसी वृत्तीलाही लाजवेल असे कृत्य ते करतात.

पूर्वापार चालत आल्याप्रमाणे स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू आणि पुरुष म्हणजे फक्त वासना अशी समाजाची मानसिकता असावी का? सर्रासपणे आपल्याला समाजात एक चित्र सतत पाहायला मिळते. चौकात उभे राहून येणाऱ्या जाणाऱ्या मुली व स्त्रियांकडे बघत राहणे, त्यांच्यावर काहीतरी अश्लील शेरेबाजी करणे, रस्त्यात, बसमध्ये त्यांना जाणून-बुजून धक्का मारणे, छेडछाड करणे, शिट्ट्या मारणे, घाणेरडे अंगविक्षेप करणे, त्यांचा पाठलाग करणे, फोन करून वाट्टेल ते बोलणे, प्रेमाच्या चिठ्ठ्या पाठवणे अशा अनेक पद्धतीने मुली व महिलांना त्रास देण्याचे प्रकार घडत आहेत. या सगळ्या गोष्टींकडे मुली दुर्लक्ष करतात किंवा त्यांना तोंड देतात. कारण शेवटी जर या मुलांना विरोध केला तर ही मुले वेगळी पावले उचलतात. जसे मुलींचा रस्ताच अडवणे, हात पकडणे, अंगावर ॲसिड फेकणे यामुळे या मुलीही घाबरून गप्प बसतात. यामुळे मुलींच्या फिरण्यावर वागण्यावर अनेक मर्यादा येतात, बंधने येतात.

बलात्काराच्या घटना घडल्या की समाजमनातून एक तक्रारीचा सूर कायम येतो तो म्हणजे हल्ली मुली चांगले अंगभर कपडे घालत नाहीत. अंग प्रदर्शन करतात. यामुळे मुलींचे तोकडे कपडे घालणे ही बाब बलात्काराला चालना देणारी आहे असे सर्रासपणे बोलले जाते. त्यामुळे मुलींनी तसेच तिच्या पालकांनी त्यांच्या वेशभूषेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. आधुनिकतेच्या नावाखाली फॅशन जरूर करावी परंतु त्यातून आपली भारतीय संस्कृती जोपासली जाईल याकडेही विशेष लक्ष द्यावे. रात्री बेरात्री एकट्या मुलींनी निर्जन, ओसाड ठिकाणी शक्यतो जाऊच नये जेणेकरून त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उद्भवणार नाही. स्त्री पुरुष समानतेचा विचार रुजू घातलेला आहे परंतु निसर्गत: स्त्रीयांवर काही बंधने येतात त्यांचे उल्लंघन न केले तर नक्कीच स्त्रियांचे चारित्र्य जपले जाईल व ती सुरक्षित राहील.

शाळेतील बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बदलापूर येथील एका नामांकित शाळेतील शिशु वर्गात शिकणाऱ्या दोन चिमूरड्या मुलींवर अक्षय शिंदे या नराधमाने अत्याचार केला. त्यांचे लैंगिक शोषण केले. या कृत्याने प्रचंड जनक्षोभ उसळला. आंदोलने झाली. अक्षय शिंदे हा पोलिसांच्या एन्काऊंटर मध्ये मारला गेला. चिमूरड्यांच्या पालकांना न्याय मिळाला. परंतु बदनामीच्या भीतीने अनेक पालक गप्प बसतात. रिक्षा, व्हॅन, स्कूलबस यातून जाताना अनेक विद्यार्थ्यांना या लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागते यासाठी अनेक कडक कायदे करणे तेवढेच गरजेचे आहे. सरकारने तसे आदेशही शाळांना दिले आहेत. शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, नियंत्रण कक्षाद्वारे चित्रफितींची सतत पाहणी करणे, शाळेत तक्रार पेट्या ठेवणे. परंतु, या सर्व उपायांनी खरंच बलात्काराच्या घटना थांबतील का? कारण बाल लैंगिक शोषण म्हणजेच पॉक्सो

कायद्यानुसार सर्वाधिक म्हणजे २० हजार ७६२ गुन्हे महाराष्ट्रात नोंदवण्यात आलेले आहेत  हे आपले दुर्दैवच म्हणावे लागेल. यासाठी लहानपणापासूनच पालकांनी आपल्या मुलामुलींशी मनमोकळेपणाने बोलले पाहिजे. नैतिकतेचे धडे त्यांना दिले पाहिजे. चांगला स्पर्श व वाईट स्पर्श (Good touch and Bad touch) याचे ज्ञान मुलांना दिले पाहिजे. लैंगिक शिक्षणाबाबतही शाळांनी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली पाहिजे.

पुरुषांनी आपल्या शारीरिक ताकदीचा आणि पुरुषीपणाचा माज सोडून स्त्रीच्या बौद्धिक, मानसिक, व्यावहारिक, हुशारीचा आदर करायला हवा. स्त्री ही फक्त मादी किंवा उपभोगाची वस्तू नसून एक माणूस आहे, जन्मदात्री आहे याचं भान समाजाने ठेवायला हवे. बलात्कार हा कधीच एका स्त्रीच्या शरीरावर होत नसतो तर तो होत असतो माणुसकीवर, असाहाय्यतेवर आणि पर्यायाने समाजावरही.

फक्त मेणबत्ती जाळून, एकत्र येऊन किंवा निषेध करून बलात्काराची समस्या समाजातून समूळ नष्ट होणार नाही. या बलात्काऱ्यांना कठोरातल कठोर शासन करायला हवे. महिलांना व मुलींना घराबाहेर पडताना असुरक्षित वाटणे हा लोकशाहीचा पराजय आहे. सुसंस्कृत समाजाची हार आहे. मला असे वाटते की पोलिसांची थर्ड डिग्री, चौकशी, पोलीस कोठडी, फासावर लटकवणे या साऱ्यांचे चित्रण दूरदर्शनवर इंस्टाग्रामवर दाखवायला हवे. म्हणजे समाजमनावर आपोआप याचा वचक बसेल. ज्या पद्धतीने बलात्काऱ्याने संबंधित मुलीचे हाल केले तसेच त्याचे उघड्या मैदानात हाल करावेत म्हणजे पीडित स्त्रीला झालेला वेदनांची जाणीव त्या नराधमालाही नक्कीच होईल. कुठेतरी हे अत्याचार, बलात्कार जुलूम यांना लगाम बसेल. बलात्काराच्या या चालवल्या जाणाऱ्या केसमध्ये वकिलांचा वेळकाढूपणा नको, आरोपीला माफीचा साक्षीदार करायला नको. जलद न्यायालयांने नावाप्रमाणे जलद निकाल देण्याची व्यवस्था करावी. असे झाले तर पीडित मुलीला लवकर न्याय मिळेल. तिच्या पालकांना सारखे पोलीस स्टेशन व न्यायालयाचे उंबरठे झिजवायला नको. प्रत्येक मुलीने लाठी, बॉक्सिंग जुडो तायक्वांदो याचे प्रशिक्षण घेऊन स्वतःला सक्षम करायला हवे. आपल्या बॅगमध्ये मेकअप किटबरोबरच मिरची पावडर, गुंगी आणणारा स्प्रे ठेवायला हवा.

बलात्कार करणाऱ्या नराधमांना शिक्षा झाली म्हणजे या मुलीला न्याय मिळाला असे म्हणून केवळ हा विषय संपत नाही. बारकाईने विचार केला तर त्या बलात्कारीत मुलीचे भविष्यात पुढे काय? सर्वस्व लुटलेली ती मुलगी दूषित होते. मलिनता शिरावर घेऊन असाहाय्यतेचे जगणे तिच्या नशिबी येते. शारीरिक, मानसिक, बौद्धिक दृष्टीने ती खचते. अर्थातच तिचे कुटुंबीय तिचे समुपदेशन करून तिच्या मनाची उभारी उंचावतील. भक्कमपणे तिच्या पाठीशी उभे राहतील पण तिच्या त्या नाजूक कोमल मनावर बसलेल्या या घावाचे काय? या कटू आठवणीचे ओझे वागवत उभे आयुष्य तिला व्यतीत करावे लागते. आयुष्याचा चिखल झालेल्या तिच्या आयुष्याचे अष्टांधात रूपांतर करताना तिच्या तुटलेल्या पंखात पुन्हा नव्याने बळ भरताना कसोटी लागते हो तिच्या कुटुंबीयांची आणि तिचीही.

आज स्त्रीने अनेक क्षेत्रात आपली प्रगती केली आहे. अनेक खडतर आव्हाने तिने यशस्वीपणे पेलली आहेत. अनेक कंपन्यांमधून आयटी क्षेत्रांमधून तिला रात्री उशिरापर्यंत काम करावे लागते अशावेळी तिच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही सर्वस्वी समाजाची आहे. समाजाच्या मानसिकतेची पायाभरणी आपण आपल्या घरापासूनच केली पाहिजे. आपण आपल्या घरातील

मुलांना स्त्रियांशी आदराने वागले पाहिजे, मुलींचा आपण सन्मान केला पाहिजे त्यांना संरक्षण दिले पाहिजे, जशी आपली बहीण तसेच इतर मुलींकडेही त्याच नजरेने आपण पाहिलं पाहिजे ही शिकवण लहानपणापासून मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजे.

शिक्षणाची मशाल हाती घेऊन स्त्री आज अनेक क्षेत्रात विकासाच्या वाटेवर आरूढ झालेली आहे. घराचा उंबरठा ओलांडून आज आत्मसन्मानाने सोनेरी भविष्य हस्तगत करण्यासाठी आणि आपले चौफेर कर्तुत्व सिद्ध करण्यासाठी ती उच्च शिक्षण घेत आहे. स्वतःला सिद्ध करत आहे. म्हणूनच तिला आत्मनिर्भरतेने व स्वाभिमानाने जगण्यासाठी संपूर्ण समाजाने तिच्या संरक्षणाची जबाबदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

म्हणूनच मला अशा कार्यकर्तृत्वाने सिद्ध असलेल्या अष्टभुजा स्त्रीस प्रेरणा देताना म्हणावेसे वाटते,

तू डगमगू नकोस,  
तू घाबरु नकोस...  
नराधम तो जरी  
तुजसमोर ठाकला  
दे धडक तू बेधडक अन्  
फोड त्याजला.

## माझा पाठीराखा

चालतो हत्ती सारखा  
गरजतो सिंहा सारखा  
तापतो सुर्या सारखा  
शांत चंद्रा सारखा  
बाप माझा.....

समुद्रा एवढ्या मोठ्या मनाचा  
वसुंधरेच्या सहनशीलतेचा  
पर्वता एवढ्या धिप्पाड छातीचा  
माडा सारखा ताठ मानेचा  
बाप माझा.....

घराचा कणा तो  
आईचं कुंकू तो  
माझा पाठीराखा तो  
माझा पहिला गुरु तो  
बाप माझा.....

– डॉ. माणिक नामदेव बनकर (बनफुल)  
निमगांव केतकी, ता. इंदापूर, जि. पुणे


दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!

शिवानी प्रिंटर्स

श्री. दीपक ढोले पाटील

मो. ९४२२०८५८९०

१३११, किनारा सहकारी गृहसंस्था,  
राज ट्रॅव्हल्स शेजारी, कसबा पेठ, पुणे








डॉ. माणिक नामदेव बनकर  
(बनफुल)  
एम.ए. (मराठी), सेट, पी.एच.डी.,

मु. पो. निमगांव केतकी,  
ता. इंदापूर, जि. पुणे  
संपर्क क्र. ९९६०३१४५१४



# विवाहसंस्था– एक अनुभव

रागिणी विजयकुमार लडकत
मो.: ८७६७५८१९०६

शिक्षण, नोकरी, व्यवसाय यांची व्याप्ती आज मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. अनेक क्षेत्रे निर्माण झाली आहेत त्यामुळे प्रत्येकाला अनुरूप जोडीदार असावा अशी अपेक्षा असते. मुला–मुलींच्या अपेक्षाही खूप वाढलेल्या आहेत. त्या अपेक्षांची पूर्तता करता करता पालकांची दमछाक होते.

पूर्वी घरातील ज्येष्ठ वडीलधारी मंडळी विवाहामध्ये मध्यस्थी करीत असत. सध्याचा काळ बदललेला आहे पालक नोकरी व्यवसायात व्यस्त असल्याने वधु वर मंडळाची मदत घेतली जाते.

पालक जेव्हा वधू–वर मंडळात नाव नोंदवतात तेव्हा त्यांना स्थळासंदर्भात काही अपेक्षा असतात. अपेक्षा अवाजवी  असतील तर अशा मुला मुलींचे विवाह जमण्यास विलंब होतो परिणामी त्यांचे वय वाढते व एक वेळ अशी येते की त्यांना जीवनसाथी मिळणे कठीण होते. ज्यांच्या अपेक्षा वाजवी असतात व त्यांची तडजोड करण्याची तयारी असते, त्या उपवरांचे विवाह त्वरित जमतात याचा अनुभव मी कित्येक वर्ष घेत आहे.

वधू –वर सूचक मंडळ हे मध्यस्थाची भूमिका बजावत असताना आपली सगळी खरी माहिती त्यांना दिली पाहिजे .या माध्यमात कार्य करताना आलेला अनुभव म्हणजे अनेक पालक मुलाच्या उत्पन्नाविषयी, शिक्षणाविषयीची माहिती अनेकदा खरी देत नाहीत कधी कधी असे होते की मुलगा घटस्फोटीत असतो परंतु तो प्रथमवर म्हणून मुलींची स्थळे पाहत असतो अशावेळी वधु पित्याची फसवणूक होऊ शकते यासाठी खूप बारकाईने वधू–वरांबाबत चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे. पालक जेव्हा आपला मुलगा किंवा मुलगी यांच्या विवाहाचा विचार करतात त्यावेळी सर्वात आधी आपल्या मुलांशी मनमोकळेपणाने संवाद साधने गरजेचे आहे, ते लग्नासारखी मोठी जबाबदारी पेलण्यास तयार आहेत का? त्यांचे कोणाशी प्रेम संबंध आहेत का? या गोष्टी जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे. काही मुले आई वडिलांशी उघडपणे बोलत नाहीत आणि लग्न झाल्यावर आपल्या जीवनसाथीला सांगतात माझ्या आई–वडिलांच्या इच्छेसाठी लग्न केले याचा त्या मुलांवर फार मोठा विपरीत परिणाम होतो व यातून त्यांना सावरायला फार वेळ लागतो हे असे होण्यापेक्षा आधीच या गोष्टी स्पष्ट सांगाव्यात म्हणजे या मुला–मुलींवर घटस्फोट घेण्याची वेळ येणार नाही.

प्रत्येक उपवर पालकांनी मुला–मुलींची मेडिकल टेस्ट करावी त्यामुळे एकमेकांत काही दोष असल्यास पुढील अनर्थ टाळता येतो. कित्येक मुलींचे संसार आईच्या अति हस्तक्षेपामुळे मोडले आहेत. आताच्या मुली सक्षम आहेत, हुशार आहेत त्यांना त्यांची आव्हाने पेलू द्यात त्यांच्या अडचणी त्यांना सोडवू द्यात

जिथे गरज लागेल तिथेच पालकांनी हस्तक्षेप करावा. सारखे सारखे मुलांच्या संसारात लुडबुड करू नये त्यांचे निर्णय त्यांना घेऊ द्यात जिथे निर्णय चुकेल तिथे तुम्ही समजावून सांगा. ज्या गोष्टींवरून घरात वाद होत असतील त्यावर उपाययोजना शोधाव्यात नक्की सापडतात.

बऱ्याच वधू पालकांची मुलाला शेती असावी अशी इच्छा असते. परंतु, त्यांना शेतकरी जावई नको असतो. एक अनुभव सांगते. एका मुलीच्या आईचा फोन आला मुलीची सगळी माहिती सांगून झाली शेवटी म्हणाल्या,'मुलाला शेती पाहिजे बर का मॅडम! मी म्हणाले तुमच्या घरी शेती आहे का? त्या 'हो' म्हणाल्या मी विचारले त्यांना मुलीला शेतातील काय काय कामे येतात त्यावर त्या म्हणाल्या, 'हल्लीच्या मुली कुठे शेतात जातात?' मग मी त्यांना म्हणाले, 'मग शेती कशाला हवी तुम्हाला?' त्यावर त्या म्हणाल्या, 'शेती असलेली बरी असते पुढे मागे प्लॉटिंग होते, पैसे भरपूर मिळतात'. या मुलीच्या आईचे विचार किती दूरवरचे आहेत हे मला समजले. त्यावर मी त्यांना म्हणाले माझ्याकडे एक स्थळ आहे त्यांना शंभर एकर जमीन आहे. गाडी बंगला सगळं आहे देता का मुलगी? त्या म्हणाल्या, 'नको नको मॅडम खेडेगावात कशी राहील माझी मुलगी?' लोकांच्या अशा वृत्तीमुळे खेड्यातील मुलांचे विवाह लवकर होत नाही, कारण कोणाला ही खेड्यात जायचे नाही. शेतकरी मुलांची अवस्था तर फार वाईट आहे त्यांना कोणीच मुलगी द्यायला तयार नसते. त्यामुळे मुलांची वय ३५ ते ४० च्या घरात गेलेली आहेत.

अलीकडे कित्येक पालकांना एक किंवा दोन अपत्य असतात. त्यातूनही मुलगी असेल तर वेगळीच समस्या असते कारण एकुलती एक मुलगी त्यामुळे तिच्यावर तिच्या पालकांची जबाबदारी असते. लग्न ठरविताना वधू-वर व पालकांनी एकमेकांशी संवाद साधून पुढील भविष्याचे नियोजन केल्यास अनेक वादाचे प्रसंग टळू शकतील व आनंदाने सुखी संसार होईल .

माझ्या मते प्रत्येकाला आपल्या अपेक्षेप्रमाणे सगळ्याच गोष्टी मिळतीलच असे नाही त्यामुळे तडजोड आणि समंजसपणाने विवाहाचा विचार केल्यास विवाह जमणे सुकर होईल!!

### ❖ देव तिथेच बसलाय तुझ्यासाठी ❖

तोच आहे तुझ दुःख ऐकून घेयला
तोच तुला प्रश्नांची उत्तर देयला
तो एकमेव असा आहे जो तुझ्या दुःखावर नाही हसणार
तुझ्या सुखात मागे आणि दुःखात पुढे तोच फक्त असणार
तू चुकलीस तरी तुला माफ करणारा
तू चिडलीस की ऐकून घेणारा
तुझ दुःख वाटून घेणारा
स्वतःच सुख तुझ्या पुढ्यात करणारा
तुझ्या सोबत कोणी नसताना तोच येतो
सोबत तुझी संकट घेऊन जातो
रागात असताना त्याला नाही नाही ते बोलणार
सुखाच्या क्षणी मात्र त्यालाच विसरणार
वाग तू कशी ही त्याच्या सोबत
पुढे संकटकाळी असे फक्त तोच सोबत
उद्याचा दिवस तोच तुला दाखवणार आहे
आजच्या दिवसाची रात्र सुंदर तोच करणार आहे
त्याच्यासाठी आयुष्यात काहीतरी करतेस का ग
एकदा तरी त्याला thank you म्हटलीस का ग

**देवश्री**
इयत्ता बारावी



# स्त्री एक आदिशक्ती

लेखन – सौ. माधुरी शिवाजी विधाटे
सदस्य – पिंपरी चिंचवड साहित्य मंच
नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ
मो.: ७५८८३२८४६९

स्त्री हे आदिशक्तीचे रुप आहे. स्त्रियांमध्ये दुर्गा,महालक्ष्मी व महासरस्वती या रूपांचा त्रिवेणी संगम झाला आहे. यापैकी करारी, कर्तृत्ववान, खंबीर मनोवृत्तीचे, आत्मविश्वासाने उजळलेले दुर्गेचे तेजोमय रुप प्रामुख्याने लक्ष वेधून घेते.

महाभारत काळातील द्रौपदी ही द्रुपदराजाने पुत्रप्राप्तीसाठी केलेल्या यज्ञातुन जन्माला आलेली याज्ञसेना. कौरवांनी केलेल्या तिच्या स्त्रीत्वाच्या अपमानाचा प्रतिशोध घेण्यासाठी पांडवांमधील अस्मितेवर फुंकर घालून ती प्रज्वलित ठेवणारी मुक्तकेशिनी पांचाली. तिचे झळाळते अग्निशिखेसारखे रूप स्मरून तिचे नाव पंचकन्यांमध्ये सन्मानाने घेतले जाते.

शिवरायांच्या बालमनात स्वराज्यस्थापनेचे स्फुलिंग पेटवणाऱ्या जिजाऊमाता. निर्भयतेचे बाळकडू पाजून छत्रपती शिवराय घडवणारी ही लढवय्यी आणि शस्त्रपारंगत, करारी, निःपक्षपाती, स्वाभिमानी अशी ओजस्वी रणरागिणी. हे दुर्गारूप विस्मयचकित करते.

महाराणी येसूबाईनी रात्रंदिन युद्धात गुंतलेल्या शंभूराजांसोबत व त्यांच्या मृत्यूनंतरही स्वराज्याच्या कारभाराची धुरा यशस्वीरित्या पेलली. ‘श्री राज्ञी जयति’ अशा त्या स्वराज्याच्या कुलमुखत्यार होत्या. करारी,निस्पृह अशी ही कर्तृत्वशालिनी. होळकरांचा राज्यकारभार शिरावर घेणाऱ्या खंबीर मनोवृत्तीच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, ’मेरी झांसी नही दूंगी’ म्हणत लहानग्या दामोदरला पाठीशी बांधून इंग्रजसेनेशी निकराचा लढा देणारी रणरागिणी राणी लक्ष्मीबाई.

पौराणिक व ऐतिहासिक काळातील या विविध दुर्गांच्या तेजापुढे मन नतमस्तक होते.

या नंतरच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतमातेला पारतंत्र्याच्या शृंखलेतून मुक्त करण्यासाठी लढलेल्या स्त्री स्वातंत्र्य सेनानी या दुर्गादेवीचेच रणचंडीचे रुप घेऊन उभ्या ठाकतात. तुरूंगवास भोगलेल्या, प्राणाचे बलिदान देणाऱ्या, स्वातंत्र्यसैनिकांना घरात आसरा देणाऱ्या, तसेच जेवू खाऊ घालणाऱ्या, शस्त्रांची गुपचूप नेआण करणाऱ्या अशा असंख्य अनामिक स्त्री स्वातंत्र्यसेनानी. इतिहासात त्यांच्या नावाची नोंद सुद्धा नाही अशा तेजस्वी शलाका. त्याचबरोबर क्रांतिकारकांच्या अशा माता, भगिनी, पत्नी ज्यांनी एकटीने कुटुंबाचा भार खांद्यावर घेत धैर्याने कुटुंबाचा सांभाळ केला. अशा सर्वांना दुर्गा हेच नाव साजून दिसते.

इतिहासाला ज्यांची नावे ज्ञात आहेत अशा सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपध्याय, प्रेमाताई कंटक, प्रीतीलता, कल्पना दत्त, सुनीती व शांती घोष, बीना दास, उज्ज्वला मुझुमदार, अवंतिका गोखले, सरला

चौधरी, जानकीदेवी बजाज, मृदुला साराभाई, भक्तीबा देसाई, मणीबेन पटेल या क्रांतिकारक महिला स्वातंत्र्यासाठी लढल्या.

त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी ज्यांना त्यांच्या धडाडीच्या नेतृत्वामुळे, निर्णयक्षमतेमुळे पोलादी स्त्री म्हणूनच ओळखतात. राजकीय क्षेत्रात अमोघ वक्तृत्वपटू सुषमा स्वराज. महिला हक्कासाठी लढणाऱ्या नीलम गोऱ्हे ही नावेही आदराने घेतली जातात.

सामर्थ्यशाली पोलीस अधिकारी किरण बेदी. म्हणजेच महिलांच्या हक्कासाठी लढणारी समाजसेविका, विख्यात टेनिसपटू, तिहार कारागृहातील कैद्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणारी, त्यासाठी लढणारी तसेच क्रेन लेडी म्हणून ओळखली जाणारी, रेमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित अष्टपैलू रणरागिणी.

प्रशासकीय क्षेत्रातील मनीषा म्हैसकर,नीला सत्यनारायणन. सामाजिक क्षेत्रातील नर्मदा बचाव आंदोलन करुन पर्यावरण रक्षणासाठी लढणाऱ्या मेधाताई पाटकर, तसेच अनुताई वाघ, प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत हजारो अनाथांची मायमाऊली झालेल्या सिंधुताई सपकाळ. अशा विविध रूपात या दुर्गा शोभून दिसतात.

याचबरोबर देश रक्षणासाठी वीरमरण आलेल्या जवानांच्या माता, भगिनी व पत्नी, मुली, सुना तसेच देशासाठी सीमेवर कार्यरत असलेले सर्व सैनिक, सैन्यदलातील कर्मचारीवर्ग यांच्या कुटुंबातील स्त्रिया या देखील रोजची जगण्याची लढाई लढत असतात. अविवाहित प्रौढा, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, एकल माता याही आत्मबळावर खंबीरपणे उभ्या असतात. स्वतः अर्थार्जन करुन मुलांना शिकवत असतात. उत्तम संस्कार घडवतात. एवढेच नव्हे तर कुटुंबासाठी आधार बनून उभ्या राहणाऱ्या गृहिणी या सर्वजणी दुर्गा बनून परिस्थितीशी लढत असतात.

अशा दुर्गेचे रुप धारण करुन प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या स्त्रीशक्तीला नवदुर्गा हे बिरूद साजून दिसते.

मात्र आपण जेव्हा शक्तीदायिनी दुर्गेचा विचार करतो, तेव्हा शारीरिक, मानसिक, बौद्धीक व भावनिक सामर्थ्याचा विचार करावाच लागेल. सशक्त मनोधैर्य असेल, आत्मविश्वास असेल तरच प्रतिकूलतेशी झुंज देण्याचे बळ अंगी येऊ शकते.

अशा अतूट मनोबलाच्या जोरावर आपल्या ध्येयाच्या दिशेने अथकपणे चालत रहाणाऱ्या स्त्रियांना दुर्गाच म्हणावे लागेल.

शैक्षणिक क्षेत्रातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई राऊत यांनी शिक्षणप्राप्तीसाठी अडचणींच्या निबीड अरण्यातून स्वतःची वाट शोधली. विरोधाचे, पुरुषसत्ताक पद्धतीचे, अंधश्रद्धांचे दगडगोटे त्या वाटेवर होते.समाजातील विखारी नजरा, वाग्बाण व शेण गोळ्यांना त्यांना तोंड द्यावे लागले. या अग्निपरिक्षेच्या काळात त्यांच्या ध्येयावरच्या अतूट निष्ठेची, मनोधैर्याची कसोटी लागली. परिस्थितीशी चिवट झुंज देत जिद्दीने, आत्मविश्वासाने ध्येय साध्य करुन त्यांनी खडतर पाऊलवाटेची वहिवाट केली. आणि पुढील पिढ्यातील स्त्रियांच्या मनात आत्मचेतना

पान नं. २२ वर पुढे



# माझी भाषा
# माझी बोली
# माय मराठी

लेखन – डॉ. शुभांगी धारमळकर
मो.: ९५९५३४३४९७

महाराष्ट्रासाठी आजचा दिवस म्हणजेच ३ ऑक्टोबर २०२४ हा दिवस ऐतिहासिक दिवस म्हणून मानला जाणार आहे. कारण महाराष्ट्राची मान शान असलेली मराठी भाषा या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा आज मिळालेला आहे.

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी माय मराठीला मिळालेला हा बहुमान खूप मोलाचा आहे. महाराष्ट्रातीलच काय पण जगभरातील तमाम मराठी जणांचे तमाम मराठी बांधवांनी या मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात दर्जा चे स्वागत केले आहे.

सुमारे अडीच हजार वर्षे प्राचीन आणि समृद्ध वारसा असलेल्या मराठीला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी अनेक वर्षांचा संघर्ष करावा लागला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला देण्याकरिता केंद्र शासनाने काही निकष लावले आहेत या निकषांच्या आधारे संशोधन आणि अभ्यास करून मराठी भाषेला अभिजात भाषेच्या दर्जा मिळण्या संदर्भातला अहवाल सादर करण्यात आला. यासाठी ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ञ संशोधकांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीने अनेक प्राचीन ग्रंथ, जुने संदर्भ, पुरातन दस्तऐवज, प्राचीन ग्रंथ काही शिलालेख, कोरीव लेख इत्यादी प्राचीन दस्तऐवजांच्या आधारे तसेच ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु, लिळाचरित्र अश्या अनेक ग्रंथाचा आधार घेत एक परिपूर्ण असा अहवाल तयार करून त्या अहवालामध्ये सविस्तर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न केले आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मायमराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला.त्यामुळे मराठी जनतेला हा सोन्याचा दिवस आज बघण्यास मिळाला. मराठी बरोबरच पाली, प्राकृती, असामी, बंगाली, या भाषांनाही अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे.

देशाच्या इतिहासात मराठी भाषेचा मान सन्मान अजून उंचावला गेला आहे.

अभिजात भाषा या वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा आहे. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे निकष खालीलप्रमाणे ठरवलेले आहेत.

१. भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे.
२. भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे.
३. भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावेत.
४. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.

हा दर्जा ज्या भाषांना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या–त्या राज्याला भरीव अनुदान मिळते.

एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होतो

म्हणजे काय हे समजून घेण्याची वेळ आता खरोखरी आली आहे.

ज्या भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला आहे त्या भाषेचे विद्यापीठ सुरू करणे आणि त्या ठिकाणी भाषाविषयक संशोधनावर सर्वाधिक भर देणे.

मराठी भाषेचे व्याकरण त्यामधील नवे प्रवाह आणि संपूर्ण नव्या जगाची भाषा या दृष्टिकोनातून भाषेचा विकास कसा करता येईल याविषयीचा आराखडा तयार करणे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे अनुवादाची क्षेत्रे विस्तीर्ण होणार आहेत. त्यामध्ये मराठी मधील सर्वोत्तम अशा १०० ग्रंथांचे अन्य १४ भारतीय भाषांमध्ये भाषांतर करून घेणे आवश्यक ठरणार आहे.

त्याचप्रमाणे अन्य भारतीय भाषांमधील शंभर पुस्तकांचे मराठी मध्ये अनुवाद करणे आवश्यक ठरणार आहे.

आधुनिक युगातील मराठी भाषेची विस्तीर्ण क्षितिजे या विषयावर सविस्तर चर्चा संशोधन आणि अभ्यास घडणे आवश्यक ठरणार आहे.

अन्य भाषा विषयक उपक्रमांना संधी मिळणे हेही यामध्ये महत्त्वाचे ठरणार आहे

माय मराठीचा महिमा
गातो तना-मनातून
एकेक शब्द निघे
मायबोलीच्या सोनसळीतून
भावगीते, नाट्यगीते
यातून रंगती शब्द तराने
पोवाड्यातून वाहती
शहीदांना स्मृतीसुमने
प्रत्येक मैलावर बदलते
भाषेची बोलण्याची रीत
सुंदरतेचा शोभे तिला
अलंकारिक साज संगीत
सकळजनांची ही महाराष्ट्र माऊली
घेतले तिने या जननी सामावून
मराठी परंपरेचे उजळविले दीप
मराठी भाषेला आम्ही करितों वंदन.

पान नं. २० वरुन पुढे

जागवली. स्त्रीला सर्वार्थाने स्वयंपूर्ण करणारी ही वाट फुलांची केली, त्यांना कृतज्ञता फुले तर वहायलाच हवीत.

क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे व गोपाळराव जोशी यांनी केलेल्या अमूल्य मार्गदर्शन व खंबीर साथीमुळे त्यांच्या पत्नीला हे शक्य झाले. आजही स्त्रिया जेव्हा विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवीत आहेत, तेव्हा त्यांना पिता, बंधू, मित्र, सखा, पती, पुत्र, सहकारी, स्नेही, गुरु, मार्गदर्शकाच्या रुपात पुरूष शक्तीचे मोलाचे सहकार्य, कौतुक, सन्मान व मार्गदर्शन लाभत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

आता अक्षरदीप हाती घेऊन स्त्रिया नवनवीन क्षेत्रात स्वतःला सिद्ध करत आहेत. स्वतःमधील आत्मविश्वास जागवून निर्धाराने यशाचे शिखर गाठत आहेत. स्वतःबरोबरच कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा विकास साधत आहेत. हे करताना त्यांच्यामधील दुर्गा, सरस्वती व महालक्ष्मी रूपाचा संगम साधला आहे.

या सर्व दुर्गारुपातील स्त्रियांना मनोभावे वंदन करुन आपणही आपल्यातील आत्मशक्ती जागवूया.

# नि:संग



**लेखन – सौ. वृषाली बोरावके**
३४/बी, रागविलास सोसायटी, सी लेन,
नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क, पुणे ४११००१.
मो.ः ८९७५३३७२३८

कार्यालयातील गर्दी बऱ्यापैकी ओसरलेली. निवडक जवळची माणसे राहीलेली. कार्यालय जवळपास रिकामे झालेले. वातावरण गंभीर.. हिच्या निघण्याची तयारी... कुणाकुणाची कुठेकुठे मुसमुस चालु झालेली. ही जोडीने सगळ्यांच्या पाया पडत होती. तोपर्यंत ती शांत होती. पण आईवडील समोर आले, ती पाया पडायला वाकली व वडीलांचा हात तिला मस्तकावर जाणवला व तिला ब्रम्हांड आठवले... खूप भडभडुन आले.... 'दादाऽऽ' म्हणत ती वडीलांच्या गळ्यात पडली. वडीलांनी मान फिरवुन चष्मा काढला व डोळे पुसले...शब्द कुठेतरी पळुन गेले होते !

..मुकपणे रडले ते......मग ओळीने सगळ्यांचाच बांध फुटला... सासरी जाणे म्हणजे कायकाय सोडुन जाणे हे तिला आता नेमके ऊमगत होते..... जीव तिळतिळ तुटत होता. हे घर..ही माणसं...इथले लागेबांधे..इथले सवंगडी..इथले सगळे भलेबुरे...काय काय बांधुन तरी घ्यावे ना तिने पदरात? पदर अपुराच पडत होता तिचा सगळं बांधुन घ्यायला....ती यंत्रवत झाली होती. पावलं जड झाली होती. कुणीकुणी काहीबाही सांगत होते. ती सगळे करत होती पण .....तिचा जीव त्या ऊंबऱ्यातच रेंगाळत होता... मैत्रिणी लांब ऊभे राहुन मुसमुसत होत्या....

अशाकशा या सगळ्या माझ्यावरचा हक्क असा सोडू शकतात? ढसढसुन रडावंस तिला वाटत होत. पण...अंगावरच्या शेल्याला तिच्या शालुचा पदर बांधलेला..घट्ट गाठीने..तो जाईल तिकडेच तिला जावेच लागणार होते....सुखस्वप्नांच्या मखमली वाटेवरती असे निखारेही असतील असे तिला कधी वाटलेच नव्हते.

गेले कित्येक दिवसांची, महीन्यांची हुरहुर तिच्या मनात काठोकाठ भरुन आली होती. अश्रुंच्या रुपात ती ओसंडुन वाहुन जावी असे तिला प्रकर्षाने वाटत होते. पण..आज तिला काय झाले होते हे तिलाच कळत नव्हते... तिची आजी चक्कर येऊन पडलेली तिला कळली..ती धावली...आजीला पाणी पाजले...आजी सावध झाली..... डोळेभरुन तिच्याकडे पाहात आजीने तिच्या डोक्यावरुन हात फिरवला व सुखी राहा म्हणत तिला निरोप दिला. ती समजली..... तिला जायला हवे होते...

खुप मोठ्ठे वादळ मनात वागवात, त्या वादळात हेलपांडत ती एका अनिश्चित अनोळखी आयुष्याकडे निघाली.. गाडीत बसल्यावर मात्र तिला काही सुचेना... तिला न जुमानता तिचे डोळे वाहायला लागलेले... अविरत... हातातील रुमाल चिंब ओला झाला होता. ती खुप प्रयत्न करत होती आसवं थोपवण्याचा ... पण...... कितीही वाह्यले तरी जुने आयुष्य कशातही वाहुन जाणारे नव्हते,हे त्या आसवांना कळत नसावे का?

अशावेळी,

अशावेळी ज्याच्यासाठी आपण हे सगळं मागे सोडुन चाललोय त्याने दिलासा द्यावा,'मी आहे..रडु नकोस'असे तिला फार फार आतुन वाटत होते..... खप तीव्रतेने वाटत होते...

एखादी आधाराची नजर..ती ही तिला पुरेशी

पान नं. २७ वर पुढे



## प्रतिकारशक्ती

**श्रावण विशेष, उपवासासाठी विशेष**

**डॉ. सारिका सचिन आरु**
श्री आर्या आयुर्वेद, पंचकर्म, होमिओपॅथी क्लिनिक हडपसर.
श्री आरोग्यधाम आयुर्वेद हॉस्पिटल थेऊर, पुणे.
९६५७९८०७७०/९९२३०९९००६

### राजगिरा

राजगिरा हा पोषण घटकांचा (Nutrients) पॉवर हाऊस आहे. त्यामधे कॅल्शियम, प्रोटीन, अमायनो ॲसिड्स तसेच लोह, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ए, बी, सी भरपूर प्रमाणात आहेत.

राजगिऱ्याचे फायदे :-

१) ग्लुटीन फ्री राजगिरा:-

गहू, बारली, आटा, ओटस या धान्यांमध्ये ग्लुटिन नावाचे प्रथिनं असते. मात्र राजागिरा मधे हे प्रथिनं आढळून येत नाही. त्यामुळे सिलीयाक डिसीझ म्हणजे पचनाचा हा एक विकार असणाऱ्यांना राजगिरा हे एक वरदानच आहे.

२) सर्वात जास्त प्रथिनांचे प्रमाण:-

राजगिरामध्ये इतर धान्यांच्या मानाने प्रथिने जास्त असतात.

१ कप राजगिरा - २८.१ग्राम

१ कप ओटस - २६.१ग्राम

१ कप क्विनोआ - २४ग्राम

१ कप वाइल्ड राईस - २३.६ग्राम

१ कप बकव्हीट - २२.५ग्राम

१ कप मिलेट - २२ग्राम

१क प ज्वारी - २१.७ग्राम

१ कप ब्राऊन राईस - १४.७ग्राम

१ कप व्हाइट राईस - १३.१ग्राम

राजगिरामधील प्रथिने ही पूर्ण (complete) प्रथिने आहेत कारण लायसिन नावाचे इसेन्शिअल अमायनो ॲसिड ज्याचा इतर धान्यांमधे अभाव असतो ते राजगिरामध्ये आहे (राजागिरा हे प्रथिनांचे पॉवर हाऊस आहे)

राजगिरा मधील प्रथिने ही शाकाहारातील उत्तम प्रथिने आहेत. मांसाहारातील प्रथिने ही सर्वात उत्तम आहेत परंतु या प्रथिनांबरोबर अतिरिक्त फॅट आणि कोलेस्टरॉल ही भरपूर आहेत जे आरोग्याला हानिकारक आहेत.

लायसिन हे इसेन्शिअल अमायना ॲसिड आहे की जे शरीरामध्ये तयार केले जाऊ शकत नाही आणि ते आहारामधूनच घ्यावे लागते. लायसिन हे फॅटी ॲसिडसबचे एनर्जीमध्ये विघटन (Metolism) करायला मदत करते तसेच कॅल्शियम च्या शोषणाला (Absorbtion) लाही मदत करते आणि डोक्यावरील केसांचे आरोग्य वाढवते.

३) केस गळणे आणि पांढरे होणे:-

राजगिरा आहारामधे घेतल्याने आणि त्याच्या पानांचा रस केसांमधे लावल्याने केस गळणे, पांढरे होणे, केसांचा कोरडेपणा कमी होण्यास मदत होते.

४) कोलेस्टरॉल आणि हर्ट डिसीज कमी करण्यास मदत:-

राजगिरा बीया आणि तेल यामध्ये तंतूमय पदार्थ (fiber) असतात त्यामुळे कोलेस्टरॉल, बद्धकोष्ठता कमी होण्यास मदत होते. राजगिरामध्ये फायटोस्टेरॉल

नावाचा घटक असतो तो कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतो.

५) कॅल्शियमचा उत्तम स्त्रोत:–

दुधापेक्षा दुप्पट प्रमाणात कॅल्शियम राजगिऱ्यामध्ये आहे त्यामुळे कॅल्शियमच्या कमतरतेमुळे होणारे आजार (ऑस्टिओपोरोसिस) टाळता येतात.

६) अँटीऑक्सीडेंट्स आणि खनिजे यांचा उत्तम स्त्रोत:–

राजगिऱ्यामध्ये व्हिटॅमिन इ, आणि लोह (खीप), मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम ही खनिजे मुबलक प्रमाणात आहेत.

७) डोळ्याचे आरोग्य:–

हिरव्या रंगाचा राजगिरा डोळ्याचे आरोग्य, दृष्टी सुधारण्यास मदत करतो.

८) भूकेवर नियंत्रण:–

प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्याने ही प्रथिने रक्तामधील इन्सुलिनची पातळी कमी ठेवण्यास मदत करतात. तसेच या प्रथिनांमुळे असे हार्मोन्स रक्तामधे स्त्रवतात की ज्या मुळे भुकेवर नियंत्रण ठेवता येते आणि भुक कमी लागते त्यामुळे वजनावर नियंत्रण ठेवण्यासही मोठी मदत होते.

९) पचनास हलका:–

अमायनो ॲसिडस पूर्ण व भरपुर प्रमाणात असल्यामुळे राजागिरा पचायला हलका असतो. मोठ्या आजारातून बाहेर पडताना, उपवास असताना हा राजागिरा पचन व्यवस्थित करतो आणि आवश्यक प्रथिने, खनिज, जीवनसत्वही भरपूर प्रमाणात देतो त्यामुळे निरोगी अवस्था येण्यास मदत होते आरोग्य चांगले राहते.

१०) राजगिरामध्ये काही बायोऍक्टिव कम्पाउंडस असतात, त्यामुळे तो अँटी ऍलर्जिक म्हणुन ही उपयोगी पडतो.

११) डायबेटीसमध्ये उपयुक्त:–

रक्तातील वाढलेली अतिरिक्त साखर कमी करण्यास मदत करतो.

१२) मायग्रेन:–

राजगिरामध्ये मॅग्नेशियम असल्यामुळे रक्त वाहिन्या, धमन्यांचे आकुंचन होण्याची क्रिया कमी होते व त्यामुळे होणारा मायग्रेनचा त्रास कमी होतो.

१३) इरिटेबल बॉवेलस:–

राजगिरामध्ये फ्लेवोनॉइड्स असल्याने व ग्लुटिन नावाचे प्रथिनं नसल्याने पचनाच्या तक्रारी (irritable bowels) असणाऱ्यांना राजागिरा एक वरदानच आहे.

राजगिऱ्याच्या रेसिपी:–

राजगिरा लाडू, राजगिरा उपमा, राजगिरा शिरा, राजगिऱ्याच्या पिठाचे पराठे, राजगिरा पिठाची खिर इ.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**प्रा. सतिश नागनाथ भोंग**
M.Com., SET

वाणिज्य विभाग प्रमुख,
विद्या प्रतिष्ठानचे
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
इंदापूर



मु. पो. निमगांव केतकी,
ता. इंदापूर, जि. पुणे
संपर्क : ७७४३८ ०२२३५



# सत्याची ताकत

लेखन - डॉ. दत्ता कोहिनकर
माईंड पॉवर ट्रेनर

मो.: ९८२२६३२६३०

एक राजकुमार स्वतःच्या विवाहासाठी स्वयंवर घोषित करतो. या स्वयंवरात राजकुमारींच्या बरोबर एक नोकरदाराची मुलगी देखील सामील झालेली असते. कारण तिला तो राजकुमार खूप आवडत असतो.

राजकुमार, या स्वयंवरात प्रत्येक मुली जवळ जाऊन आपल्या जवळील पिशवीतील एक-एक बी प्रत्येकीला देतो आणि घोषणा करतो की, ''तीन महिन्यांनी ज्या मुलीच्या कुंडीमध्ये या बी पासून सुंदर रोप उगवेन. त्या मुलीशी मी लग्न करेन.'' तीन महिन्यानंतर अनेक राजकुमारी आपआपल्या कुंडीतील सुंदर रोप घेऊन त्याच्या समोर येतात. नोकराच्या मुलीतील कुंडीमध्ये तिने खूप प्रयत्न करुन देखील काहीच उगवलेले नसते. राजकुमार सगळ्यांच्या कुंड्या, त्यातील फुलांनी आच्छादलेली रोपे पाहतो व जिच्या कुंडीत काहीच उगवले नसते त्या नोकराच्या मुलीशी लग्न करण्याची घोषणा करतो. कारण त्याने सर्व तरुणींना दिलेल्या बीया या निर्जीव असतात. राजकुमाराशी लग्न करायच्या तीव्र लालसेने त्यांनी दुसरी आकर्षक रोपे कुंडित लावून आणलेली असतात. नोकरदाराच्या मुलीच्या आचरणातील सत्यता राजकुमाराला मोहित करते.

सत्याची ही केवढी मोठी ताकद.

स्वामी विवेकानंद म्हणतात ''सत्य हे एवढे प्रभावी असते की आकाशातून जमिनीवर फेकले, तरी ठामपणे त्वरित उभे राहते.'' लोक तुम्ही खरे बोलता म्हणून तुमचे घर पेटवू लागले तरी सत्याशी एकनिष्ठ रहा. पहा त्याच ठिकाणी तुम्हाला तुमची स्वतःची टोलेजंग इमारत उभी दिसेल. अब्राहम लिंकन म्हणाले होते फसवून आलेल्या यशापेक्षा सरळ आलेले अपयश श्रेयस्कर असते.

सत्यासारखे श्रेष्ठ तत्व नाही, बारा वर्षे जी व्यक्ती पूर्णतः सत्यवचनी असते तिला वाचासिध्दी प्राप्त होते असे अध्यात्मात म्हटले जाते,

धर्मराजानं 'नरो वा कुंजरो वा' असं द्रोणाचार्यांना सांगितिलं. हे अर्धसत्य असल्याने त्याचे परिणामही वाईटच आले. धर्मराज युधिष्ठिरासारखा नैतिक संघर्ष बऱ्याचदा आपल्या वाट्याला येतो. 'सत्यं ब्रुयात प्रियं ब्रुयात' असं वचन आहे. त्यातील सत्यापेक्षा प्रिय भागाकडे, खरं बोलण्यापेक्षा बर वाटेल असे बोलण्याकडे, दिवसेंदिवस आपला कल वाढत आहे. संत रामदास म्हणतात,

मना सर्वथा सत्य सांडू नको रे ।
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।
मना सत्य ते सत्य वाचे वदावे ।
मना मिथ्य ते मिथ्य सोडून द्यावे ।

ज्यामुळे समस्त मानवजातीचे हित किंवा कल्याण होते ती गोष्ट सत्य होय. सत्याच्या स्वीकृतीसाठी मन, बुध्दी आणि इंद्रिय अत्यंत शुध्द हवीत. विषययुक्त मन दुबळे असते, ते सत्याचा स्वीकार करु शकत नाही. आज तर व्यवहारामध्ये पदोपदी माणूस खोटे बोलतो. आज माणूस असत्याला निर्ढावला आहे. अनेकदा पालक मुलांना सांगतात, खोटे बोलू नका व त्यांच्याच समोर पदोपदी खोटे बोलतात. घरात

असणारे वडील मुलाला एखाद्याला टाळायचे असल्यास मी घरात नाही म्हणून सांग असे सुचवतात. कशी आपली मुले सत्याला जवळ करतील? वय कमी सांगणे, मार्क वाढवून सांगणे, हुद्दा वाढवून सांगणे या साध्या साध्या गोष्टीत पण आपण असत्याला जवळ करतो. ब्रम्हदेशातील विपश्यनाचार्य सयाजी उबाखीन गुरुजींकडे एक वकील साधना करावायास आला, पूर्ण सत्य मी बोलू लागलो तर माझी वकीली चालणार कशी? असा प्रश्न त्याने उबाखीन गुरुजींना विचारला. उबाखीन गुरुजी म्हणाले, ''धर्मावर विश्वास ठेवून पूर्ण सत्याला शरण जा, बघ काय चमत्कार होईल कालांतराने सत्यवचनी-न्यायवचनी म्हणून तो वकील प्रसिध्द झाला. न्यायाधीश त्याच्या या सत्यवचनाच्या प्रभावाने त्याच्या बाजूने न्याय देऊ लागले. शहरभर त्याची किर्ती पसरली.

बुध्द म्हणतात गुलाबाचा सुगंध वाऱ्याच्या दिशेने वाहतो. पण सत्यवचनी-शीलवान माणसाचा सुगंध चारही दिशेला पसरतो. म्हणून नेहमी सत्य बोला – सत्याने चाला. ज्यावेळेस एखाद्या प्रश्नाचे उत्तर देतेवेळी खोटं बोलण्याची वेळ येईल, त्यावेळेस मौन पाळा किंवा विषयांतर करा. खोटे बोलू नका. दुसऱ्याला बोलायला लावू नका, खोटे बोलणाऱ्याला अनुमोदन देऊ नका.

सत्यवचन हा मानव धर्म आहे. सत्य, अर्थ व धर्म यात प्रतिष्ठित असलेल्या संताचे हे अमृतबोल आहे. एका गाण्यातील या ओळी खूप काही सांगून जातात.

सजन रे झूठ मत बोलो – खुदा के पास जाना है ।<br>
न हाथी है, न घोडा है – वहाँ पैदल ही जाना है ।।

---

**होईल जीवनाची उन्नती । ज्ञानविज्ञानाची प्रगती**<br>
**ऐसीच हवी ग्रंथसंपत्ती । गावोगावी ।**

– संत तुकडोजी महाराज

पान नं. २३ वरून पुढे

झाली असती त्यावेळी.... तिने नजरेच्या कोपऱ्यातुन खुपवेळा पाहीले पण तिचे 'अहो' खिडकीतुन गाडीच्या बाहेर पाहात होते.. कोरडेपणाने...निर्विकारपणे..या सगळ्याशी आपला काही संबंध नसल्यासारखे...... तिला काय वाटते, तिला काय हवे आहे याचा मागमुसही त्यांच्या विचारातही नव्हता.

ती हिरमुसली. नाराज झाली.. पण निमुट राहीली... हा कोरडेपणा आता आपली जन्माची सोबत करणार आहे,याची तिला तेव्हा नाही पण नंतरच्या आयुष्यात वारंवार प्रचिती आली. 'मला ते पिक्चरमधल्यासारखं बोलता येत नाही. सांगुन ठेवतो'....खर्जातला तो आवाज...


तिने खालमानेने ऐकले व खुदकन हसली... नवेपणाचे नऊ दिवस होते..त्या कोरड्या स्वभावाची झळ लागण्याची ती सुरवात होती... पण..तिला हे अजुन उमगायचे होते....

.वेडीला ते ही प्रेमच वाटले होते की काय कोणजाणे...... ....मग मुलगा झाला... निसर्ग नियमाप्रमाणे.... पहील्यांदा बाळाला हातात घेऊन 'तो' खुप रडला...तिला अपरुप वाटले... तो बदलतोय.... नव्हे आपले प्रेम त्याला बदलायला लावतेय, या विचारांनी मोहरलेली ती तेव्हा.... त्याच्यात जागणारा हा ओलावा तिच्या अपेक्षा जागवित होता. पण.....

तसे बेरजावजाबाक्यांचे अनेक बारीकसारीक प्रसंग येऊन गेलेले..पण काही ठळकपणे मनात कोरले गेलेले... प्रदीर्घ आजाराने तिचे वडील गेले..त्याकाळात झालेली भावनांची पडझड.... आलेले जीवघेणे अनुभव.... एका दीर्घ ट्रॉमातुन ती बराच काळ गेलेली......

खूप दूरच्या. मृत्युचा वास असलेल्या त्या

पान नं. ३५ वर पुढे



# संत नामदेवांचे जन्म स्थान नर्सी

लेखन - दिलीप धामणे
हिंगोली (मराठवाडा)

मो.: ८२०८४५६७९३



भागवत धर्माची पताका घेऊन समतेचा संदेश आणि ज्ञानाचे महत्व पटवून सांगणारे संत नामदेव यांचे जन्मस्थळ, नर्सी नामदेव, ता. जि. हिंगोली. मंदिराचा जीर्णोद्धार २०१९ ला झाला. भाविकांच्या देणगीतून भव्य अशा नविन संगमरवरी मंदिराचे काम झाले आहे.

ज्यांची समाधी पंढरपुरला विठ्ठल मंदिराच्या पहिल्या पायरीला आहे व नामदेव पायरी नावाने ओळखतात त्या संत नामदेवांचा जिल्हा. येथे संत नामदेवांचे वास्तव्य राहिलेले आहे.

कयाधू तीरावर संत नामदेवांचे भव्य मंदिर आहे. तसेच येथील कयाधू नदीत अस्थींचे पाणी होते अशी आख्यायिका आहे. कयाधू नदी वर अस्थि विसर्जन कुंड बांधणे गरजेचे महत्वाचे आहे. आंघोळीसाठी स्नानगृह बांधायला हवेत.

नर्सी नामदेव येथे पापमोचनी एकादशी पासून मोठी यात्रा भरते. ही यात्रा मीठाची यात्रा म्हणूनही प्रसिद्ध आहे येथे मोठ्या प्रमाणात मीठाची विक्री होते.

अनेक भाविक यात्रेनिमित्त येथे दाखल होतात. निजाम काळात स्वतंत्र परगणा व परिसरातील एकमेव मोठी बाजारपेठ म्हणून नर्सीला स्थान होते.

संत शिरोमणी नामदेव महाराज (जन्म : २६ ऑक्टोबर १२७०, संजीवन समाधी : ३ जुलै १३५०) हे महाराष्ट्रातील वारकरी संतकवी होते. ते मराठी भाषांमधील सर्वाधिक जुन्या काळातील कवींपैकी एक होते. त्यांनी व्रज भाषांमध्येही काव्ये रचली. शिखांच्या गुरू ग्रंथसाहिबातहिले चरित्रकार, आत्मचरित्रकार आणि 'कीर्तना'च्या माध्यमातून भागवत धर्म पंजाबपर्यंत नेणारे आद्य प्रचारक होते. त्यामुळे पंजाबी मंडळी तसेच संबंधित मंडळी आज त्यांच्या जन्मस्थानाचा, नर्सी नामदेव या गावाचा विकास करण्यासाठी धडपडत आहेत.

दामाशेटी हे संत नामदेवांचे वडील व गोणाई त्यांची माता होती. दामाशेटींचा व्यवसाय कपडे शिवणे हा होता. म्हणजे ते शिंपी होते. नामदेवांचा जन्म प्रभव नाम संवत्सरात, शके ११९२ (इ.स.१२७०) मध्ये कार्तिक शुद्ध एकादशीस, रोहिणी नक्षत्रास, रविवारी झाला. संत नामदेवांना ८० वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांचे बालपण हे पंढरपुरात गेले. त्यांनी लहानपणापासूनच श्रीविठ्ठलाची अनन्यसाधारण भक्ती केली.

संत नामदेवांना विसोबा खेचर हे आध्यात्मिक गुरू म्हणून औंढा नागनाथ या ८ वे ज्योतिर्लिंग असणाऱ्या ठिकाणी लाभले.

स्वतःला 'नामयाची दासी' असे म्हणणाऱ्या संत जनाबाई या त्यांच्या परिवारातील एक सदस्य होत्या. त्या नरसी येथून जवळच असलेल्या पुसेगाव येथील मूळच्या होत्या असेही काही ज्येष्ठ मंडळींचे म्हणणे आहे.

संत नामदेवाची अभंगगाथा (सुमारे २५०० अभंग) प्रसिद्ध आहे. त्यांनी हिंदी भाषेत काही अभंग रचना (सुमारे १२५ पदे) केली. त्यातील सुमारे बासष्ट अभंग (नामदेवजीकी मुखबानी) शीख पंथाच्या गुरुग्रंथ साहेबमध्ये गुरुमुखी लिपीत घेतलेले आहेत.

'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते.

भागवत धर्माचे एक आद्य प्रचारक म्हणून संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे ५० वर्षे भागवतधर्माचा प्रचार केला. पंजाबमधील शीख बांधवांना ते आपले वाटतात. शीख बांधव 'नामदेव बाबा' म्हणून त्यांचे गुणगान गातात. पंजाबातील 'शब्दकीर्तन' व महाराष्ट्रातील 'वारकरी कीर्तन' यांत विलक्षण साम्य आहे. घुमान (पंजाब) येथे शीख बांधवांनी त्यांचे मंदिर उभारले आहे. बहोरदास, लढ्ढिष्णुस्वामी, केशव कलाधारी हे त्यांचे पंजाबी शिष्य होत. राजस्थानातील शीख बांधवांनीही नामदेवाची मंदिरे उभारलेली आहेत. 'संत शिरोमणी' असे यथार्थ संबोधन त्यांच्याबद्दल वापरले जाते. संपूर्ण भारत देशात नामदेव महाराज ओळखले जातात. शिखांचा पवित्र ग्रंथ गुरुग्रंथ साहीबमध्ये नामदेव महाराजांच्या गुरुवाण्या समाविष्ट आहेत.पंजाबी भाषेतील योगदानाबद्दल शीख बांधवानी नर्सी येथे गुरुद्वारा बांधला आहे.

संत नामदेव हे कीर्तने करत करत भारतभर फिरले. भगवद्भक्तांच्या व साधु-संतांच्या चरण धुळीचा स्पर्श व्हावा म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारी 'पायरीचा दगड' होण्यात त्यांनी धन्यता मानली. संत नामदेव हे आषाढ वद्य त्रयोदशी, शके १२७२ मध्ये (शनिवारी, दि. ३ जुलै, १३५० रोजी) पंढरपूर येथे पांडुरंगचरणी विलीन झाले.

## अभिजात मराठीसाठी 'टाटा मोटर्सचे माजी कर्मचारी 'हरी नरके' यांचे मोलाचे योगदान :



२५०० वर्ष जुनी असलेल्या मराठी भाषेला काल म्हणजेच ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला याबद्दल सर्व मराठी बांधवांचे मन:पूर्वक अभिनंदन.

महाराष्ट्र सरकार यासाठी २०१२ पासून केंद्र सरकार सोबत अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी पाठपुरावा करत होते. २०१२ साली रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक समिती स्थापन केली होती.

या समितीचे काही प्रमुख सदस्य होते प्राध्यापक हरी नरके, नागनाथ कोत्तापल्ले, श्रीकांत बहुलकर, मधुकर वाकोडे, सतीश काळसेकर, कल्याण काळे, आनंद उबाळे, परशुराम पाटील.

या समितीने प्राचीन शिलालेख, गद्य प्रकारातील प्राचीन मराठी ग्रंथ, पद्य प्रकारातील मराठी काव्य ग्रंथ, मराठी भाषेतील जुनी राजकीय पत्रे असा सविस्तर अभ्यास करत ४५० पानांचा अहवाल महाराष्ट्र सरकारला सादर केला. यासाठी अगदी २५०० वर्ष जुने मराठी भाषेचे संदर्भ समितीने शोधून काढले होते. या समितीचे प्रमुख सदस्य प्राध्यापक हरी नरके १९७९ ते २००० असे २२ वर्ष टाटा मोटर्सचे कर्मचारी होते. नाणे

पान नं. ३१ वर पुढे



# स्त्रीभ्रूणहत्या परिणाम

**शीला गिते**
बीए., बीएड, सातारा
दलित मित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र भूषण

जर मुलगा आहे वंशाचा दिवा
तर मुलगी आहे वंशाची पणती
जर विझवून टाकाल वंशाची पणती
तर कुठून आणाल वंशाला ज्योती

'स्त्रीभ्रूणहत्या' म्हणजे गर्भातच स्त्री गर्भाचा नाश करणे. हा आजच्या समाजातील ज्वलंत प्रश्न असून समाजाच्या अधःपतनाचा, स्त्री-पुरुष भेदभावाचा, प्रतिगामीपणाचा धडधडीत पुरावा आहे. 'पहिली बेटी-धनाची पेटी-तूप रोटी' असे दांभिकपणे म्हणणाऱ्या या समाजात कायद्याने स्त्री-भ्रूण हत्या गंभीर गुन्हा असूनही 'जळी स्थळी काष्ठी पाषाणी' वारंवार घडत आहे. याला कायद्यापेक्षा मनाचे बंधन व समाजसुधारणेचे कंकणच वेसण घालू शकते हे निर्विवाद सत्य आहे.

याची सुरवात आपल्या भारतात २० वर्षापूर्वी झाली. यासाठी वैद्यकशास्त्रातील सोनोग्राफी हे तंत्रज्ञान दुहेरी शस्त्र ठरले. ज्यामुळे स्त्रीच्या गरोदरपणात ४-५ महिन्याच्या बाळाच्या अवयवांची संपूर्ण वाढ झाली आहे का, ते निरोगी आहे का हे कळते, त्याच वेळी लिंगही कळते. याचाच फायदा वैद्यकीय व्यावसायिकांनी उचलला व गर्भलिंग निदानाचा व त्यातून स्त्रीभ्रूणहत्येचा राजरोस मार्ग सुरु करुन अवैध मार्गाने बक्कळ माया जमविली.

हा मार्ग आपल्याकडे एवढा यशस्वी होण्यामागे भारतीय समाजाची पुरुषप्रधान मानसिकता कारणीभूत ठरली. आपला समाज अनेक धर्मांनी बनलेला आहे. परंतु सर्व धर्म पुरुषाला मोठेपणा व स्त्रीला हीनपणाच देतात. मुलगा आपल्याकडे राहतो, तोच म्हातारपणी आपला सांभाळ करतो. तो वंशाचा दिवा, सर्व संपत्तीचे अधिकार त्याच्याकडे, तोच अंत्यविधीचा हकदार, तो हुंडा आणतो, समाजात वावरताना त्याला भिती नाही मग सगळ्यांना मुलगाच हवा. कारणं 'जे विकतं तेच पिकते' मुलगी 'परक्याचे धन'. लहानाची मोठी करा, तिच्या पालनपोषण, शिक्षण, लग्नाचा, विवाह खर्च करा व दुसऱ्याच्या घरी पाठवून द्या. परत सासरचे इतके तालेवाार की तिला छळण्यासाठीच यांचा जन्म. तिला जाळतील नाही तर मारतील वा परत माहेरी पाठवून देतील. त्यापेक्षा तिला जन्मालाच का घाला? सामाजिक असुरक्षितताही एवढी भयंकर की कधी अपहरण, बलात्कार वा खून होईल हे माहीत नाही. असल्या तीव्र सामाजिक असमतोल असलेल्या समाजात मुली जन्माला येत आहेत. हेच आठवे आश्चर्य नव्हे काय? म्हणूनच स्त्री भ्रूणहत्या होते आहे.

मात्र याचे गंभीर परिणाम आज समाजात दिसत आहेत. सासरच्या दबावामुळे इच्छा असून वा नसूनही स्त्रिया ४ ते ५ वेळा गर्भपातासारखा अनैसर्गिक गोष्टींना सामोऱ्या जात आहेत, त्यामुळे त्यांच्यामध्ये अनेक शारीरिक व मानसिक व्याधी दिसून येतात. तर दुसरीकडे स्त्री-पुरुष प्रमाणात प्रचंड असमतोल दिसून येतात. दर हजारी पुरुषांमागे ७०० वा त्यापेक्षाही कमी स्त्रिया असे प्रमाण भारतीतील अनेक राज्यात दिसून येत आहे. यासाठी मुली विवाहासाठी मिळेनाशा झाल्या. पण ज्या आदिवासी समाजात स्त्रीभ्रूणहत्या होत नाही तिथून लग्नासाठी मुली आणतात. पण त्यांचा वापर केवळ

लैंगिक इच्छा भागविणे व मुले जन्माला घालवण्यासाठी करुन घेतात, त्यांना सामाजिक दर्जा देतच नाहीत. तसेच समाजातील स्त्रियांचे प्रमाण कमी झाल्यामुळे त्या अधिक असुरक्षित होत आहेत, कारण पुरुषांच्या वासनांना त्या बळी पडत आहेत. अशा प्रकारे सामाजिक असमातेल व स्त्रिया वरील अत्याचार यात भरच पडत आहे.

म्हणूनच एक सुदृढ समाजाच्या निर्मितीसाठी याच्या मुळावरच घावा घातला पाहिजे, हे सरकारने ओळखले व त्यासाठी कडक कायद्याची अंमलबजावणी सुरु केली. गर्भलिंग निदान करणाऱ्या वैद्यकिय व्यावसायिकांवर सोनोग्राफी सेंटरवर कडक निर्बंध झातले आहेत. त्यांची वारंवार तपासणी होते आहे. त्यांना सर्व नोंदी ठेवाव्या लागत आहेत. मात्र आजवरच्या इतिहासात त्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण अगदी नगण्य आहे. दुसरीकडे मुलींच्या जन्म दरवाढीसाठी, शिक्षणासाठी, विवाहासाठी सरकारकडून आर्थिक मदतीच्या योजना चालू आहेत. यामुळे मुलींचा जन्मदर वाढण्यात मदत होत आहे.

सरकारबरोबरच ही समाजाचीही जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व धर्मप्रमुखांनी स्त्री-पुरुष समानतेचे आवाहन करणे आवश्यक आहे. समाजावर कायद्यापेक्षाही धर्माचा पगडा जास्त आहे. स्त्रियांना सामाजिक सुरक्षितता हवी. हुंडा प्रथेचे पूर्ण निर्मूलन, विवाहात मुलगा मुलगी यांनी समान खर्च करणे अश्या गोष्टींचखी सुरुवात व्हायला हवी. स्त्रियांना पोलिस, शासन व न्यायालयात मोफत व त्वरित न्याय मिळायला हवा. तसेच कायदा तोडणाऱ्या डॉक्टरांना कडक शिक्षा हवी, तरच मुली वाचतील कारण

'कुणा घरी होतात मुली,  
कुणा घरी होतात मुले  
मुलगा मुलगी निसर्गाचे देणे,  
स्वीकार करुया आनंदाने..'


पान नं. २९ वरुन पुढे

घाटातील ऐतिहासिक मराठी संदर्भ शोधुन काढण्यात हरी नरके यांची मोलाची भूमिका होती.

टाटा मोटर्स मधील नोकरी पश्चात ते सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथे प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते. हरी नरके भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे उपाध्यक्ष देखील होते. हरी नरके यांनी मराठी भाषेसह महाराष्ट्रातील महापुरुषांवर ३७ ग्रंथ लिहिले होते.

दुर्दैवाने २०२३ साली हरी नरके यांचे निधन झाले आणि त्यांच्या पश्चात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. प्राध्यापक हरी नरके आज जिवंत असते तर त्यांना या गोष्टीचा नक्कीच खूप आनंद झाला असत.

**- राहूल बोर्डे**  
**पुणे**




स्वर्गापेक्षा मी चांगल्या पुस्तकांचे स्वागत करीन कारण पुस्तक जिथे असेल तिथे स्वर्ग निर्माण होईल.

– लोकमान्य टिळक

# गुडघेदुखीवर करा मात !



**ॲड. भालचंद्र कोद्रे**
माजी सदस्य,
कबीरबाग संस्था, पुणे
मो.: ९८२२३७०९२७

नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणानुसार, २०२५ मध्ये भारतात एक नंबरला मधुमेह, क्रमांक दुसरा रक्तदाब व त्या खालोखाल तिसऱ्या क्रमांकावर गुडघेदुखीचे रुग्ण असतील. हे भयावह सत्य आहे. तशी गुडघेदुखी वरवर किरकोळ वाटते; पण ती झाली व काळजी घेतली गेली नाही, तर अतिशय त्रासदायक व दुर्बलता आणणारी व्याधी आहे. गुडघेदुखीमुळे आपल्या दैनंदिन व्यवहारावर खूपदा मर्यादा येतात.

सांधेदुखी वा गुडघेदुखीच्या तक्रारींचे प्रमाण सध्या वेगाने वाढत चालले आहे. गुडघेदुखी म्हणजे वयोपरत्वे अथवा एखाद्या अपघाताने होणारी व्याधी असली, तरी तरुण वयात खेळताना दुखापत झाली, तरी गुडघ्याला मार बसू शकतो. तसे हे दुखणे किचकट व खूप काळ छळणारे आहे. योग्य डॉक्टरांचा सल्ला घेतला नाही, किंवा निदान चुकले, तर गंभीर अशा शारीरिक परिणामांना सामोरे जावे लागते.

गुडघेदुखी म्हणजे गुडघ्यातील घटकांच्या कार्यात अडथळा निर्माण होणे. त्यांना दुखापत झाल्यास झीज होऊन असह्य त्रासाला सामोरे जावे लागते. आपल्या शरीराचा सर्व भार गुडघा सहन करतो; पण अवास्तव वजन वाढले, तरी गुडघ्यावर जास्त दाब पडून ते झिजतात व गुडघ्याची कार्यक्षमता हळूहळू घटते. शेवटी तर नाईलाज म्हणून गुडघे बदलण्याची खर्चिक, तसेच खात्री देता येत नसलेली शस्त्रक्रिया करावी लागते. आता शास्त्र खूपच पुढे गेलेले आहे. हल्ली गुडघे प्रत्यारोपण करणे खूपच सोपे झाले आहे. नेमके काय झाले आहे, याकरिता अनेक चाचण्या उपलब्ध आहेत. सी. टी.स्कॅन, एमआरआय यांसारख्या खर्चिक चाचण्यांतून गुडघेदुखीचे नेमके कारण समजते व त्यानुसार उपचार केले जातात. ऑर्थोस्क्रोपी नावाचे बहुगुणी तंत्र हल्ली विकसित झाले आहे. व तज्ज्ञ डॉक्टरांकडून त्याचा उपयोग केला, तर गुडघ्याच्या आतील दोष समजतो व त्यानुसार पुढील उपचार करणे डॉक्टरांना सोयीचे जाते.


गुडघेदुखीला ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपथी, मॅग्नेथेरपी असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. प्रत्येकजण प्रेमापोटी आपला अनुभव सांगतो पण प्रत्येकाची तब्येत व गुडघेदुखीचे कारण व तीव्रता वेगळी असते. तेव्हा असे उपचार तज्ज्ञांकडून करून घेणे योग्य असते. 'शास्त्रोक्त' मालीशसुद्धा गुडघेदुखीला तारक ठरू शकते. वेदनाशामक गोळ्या, निरनिराळी तेले व मलम हे तात्पुरते व वरवरचे उपाय आहेत. त्रासदायक व किचकट तसेच खूप काळ घेणाऱ्या दुखण्यातून तात्पुरती मुक्ती मिळू शकते. तरीही दुखणे वाढतच गेले. तर डॉक्टरांच्या सल्ल्याने शस्त्रक्रिया वा पूर्ण गुडघा प्रत्यारोपण करून घेणे योग्य ठरते. गुडघेदुखी विकार खूपच कष्टदायक आहे. रोज नियमित पर्वती चढणारा माणूस जिन्याच्या चार पायऱ्यासुद्धा आरामात चढू वा उतरू शकत नाही. बराच प्रयत्न केला, तर दुखणे गंभीर होऊ शकते. अशा सणांना मांडी घालून बसता येत नाही. खुर्चीचा वापर अनिवार्य ठरतो. या विकाराला कंटाळून काहीजण तर वैतागून सर्वच उपचार बंद करतात. तेही योग्य नाही. गुडघे दुखीत येणारा सांध्यांचा ताठरपणा कमी करण्यासाठी योगासनाचा खूपच फायदा होऊ शकतो. हे योग


तज्ज्ञांकडून शिकणे जरुरीचे आहे. या तीव्र वेदनादायक (गुडघे विकारांमध्ये पारंपरिक योगसाधनेचा नक्कीच फायदा होऊ शकतो.) सकाळी व संध्याकाळी सोसवेल तेवढे चालावे; कारण जर 'चालाल तर वाचाल ! हे खूप फायदेशीर आहे. प्रसंगी 'नी कॅप' ही लाभदायक ठरते. ती जरूर वापरावी. शिवाय डॉक्टरांच्या सल्ल्याने कॅल्शियमयुक्त आहार घ्यावा.

गुडघेदुखीत सांध्यांच्या तीव्र अशा वेदनेने चालणे किंवा इतर दैनंदिन व्यवहार करणे अशक्य होते; म्हणूनच रक्तप्रवाह व्यवस्थित राहावा व सांध्यातील कडकपणा कमी राहावा, सांध्यातील कडकपणा कमी होण्यासाठी रोज जमेल तसे चालावे. या गुडघेदुखीत नाराज न होता चिकाटीने योग्य ते प्रयत्न करून मात करता येते. मात्र त्यासाठी योग्य ते प्रयत्न आणि मनाचा तोल ढळू न देण्याची गरज आहे. न घाबरता जाणीवपूर्वक प्रयत्न करून गुडघेदुखीवर मात करा. तंदुरुस्त रहा आणि खुशीत जगा ।


सर्व समाज बांधवांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!

शुभ
दीपावली





ॲड. भालचंद्र कोद्रे
सनसिटी रोड, आनंदनगर,
पुणे ४११०५१.
मो.: ९८२२३७०९२७


## ❖ कठपुतली ❖



पाच वर्षाच्या बालिकेला
आशा दाखवून खाऊची
मरणप्राय यातना देत
वाट दाखवितात देवाघरची,

कॉलेजमधील गुलाबी जीवन
पुरुषी एकतर्फी प्रेमाने
संपविले जाते राक्षसीपणाने
ॲसिड तलवारीच्या वाराने...

मानवी रक्षकांचेच होते भक्षण
अमानवीय लालसी कृत्याने
माणसातल्या या राक्षसाला
कठोर शिक्षेनेच संपवावे....

विनेश फोगट, मनु भाकर बनावे
प्रत्येक स्त्रीलाही वाटत असते
पुरुषी राक्षसी वृत्तीने मात्र
तिला कायमचे संपविले जाते....

– ॲड. भालचंद्र कोद्रे
पुणे



# जगणं उथळ होत चाललंय

**डॉ अभिनय दरवडे**
सुप्रसिध्द बालरोगतज्ञ, व्याख्याते, समुपदेशक,
अध्यक्ष, प्रबोधन फाऊंडेशन,
संचालक, संगोपन बालरुग्णालय, धुळे
मो.: ९९७०८४२१५०

एखाद्या धरणात जसा वर्षानुवर्षे गाळ साचल्यावर ते उथळ होतं तसं जगणं पण उथळ होत चाललंय काही हजार मिळतात म्हणून ज्याच्याशी साधी ओळख सुद्धा नाही अशा माणसाला मारायला तयार होणारी अल्पवयीन मुलं पहा!

मोबाईल गेम्स खेळायला आईने मज्जाव केला म्हणून आईला कोयत्याने मारणारा अल्पवयीन मुलगा पहा. अभ्यास का करत नाही? असं विचारल्याचा राग आला म्हणून वडिलांच्या डोक्यात बॅट घालणारा मुलगा पहा. प्रेम नाकारणाऱ्या मुलीवर ऍसिड फेकणारा माथेफिरु पहा. लहानग्या चिमुकलीवर अतिप्रसंग करणारा नराधम पहा, आपल्या भावनांवर आपला ताबा हरवत चाललेल्या समाजात आपण राहतो आहोत याची सारखी जाणीव होते.

अपघात ग्रस्तांचे व्हिडीओ काढणाऱ्या समाजात राहतो आपण. स्वयंपाक घरात ताजी पोळी भाजी खाणाऱ्या घरांना मागास ठरवणाऱ्या नव्या स्ट्रीट फूड संस्कृतीचे पाईक बनलो आहोत आपण. शिवराळ आणि उद्धट समाजाचं प्रतिनिधित्व करणारे आपले पुढारी सुद्धा तीच भाषा बोलतात. बीभत्सतेचं जाहीर प्रदर्शन मांडणाऱ्या वेबसिरीज आपण आवडीने ड्रॉईंग रूम मध्ये बसून पाहतो आणि बलात्कार झाला की घरात बसल्या बसल्या आरोळी ठोकतो, बाता मारतो आणि मेणबत्ती लावून पुढे सरकतो.

पण बदलणाऱ्या समाजाला कारणीभूत असलेल्या गोष्टींकडे मात्र कानाडोळा करतो पैसे भेटवस्तू घेतल्याशिवाय मतदान करत नाहीत आपण, आणि देश बदलण्याच्या बाता मारतो. मार्कांसाठी शाळेत जाणारी आणि स्पर्धेत टिकण्यासाठी महागडे क्लास लावणारी पिढी तयार केली आपण. मातृभाषा नाकारून इंग्रजीत फाडफाड बोलणारे व्यवहारज्ञान शून्य पोपट तयार केले आपण. शेताच्या बांधावर डोलणाऱ्या बाजरीच्या कणसांना 'ओह वाव! ओनिअन ट्री' म्हणणारी पिढी घडवली आपण!

समाज उथळ बनणारच होता ! टू मिनिट्स वाली मॅगी खाणारे २० सेकंदांच्या रिल्सला अंगठ्याने पुढे ढकलतात, कशाला तासभर लेक्चर ला वर्गात बसतील? शिक्षक बोअरिंग वाटणारच त्यांना. उपदेश आवडत नाहीत आजकाल ! पालक म्हणून चुकत गेलो आपण. आम्हाला मिळालं नाही म्हणून जग आणून ठेवलं आम्ही आमच्या चिमुकल्यांच्या पुढ्यात! आणि तिथेच चुकलो, त्यांनी न मागता त्यांना सुखवस्तू तर आणून दिल्या पण आम्ही स्वतः मात्र त्यांच्यापासून दूर गेलो कामाच्या नादात! त्यांना पडणारे प्रश्न मग त्यांनी त्यांच्या पद्धतीने सोडवले.

मग तान्हुल्या बाळाला अंगाई गीत म्हणण्याचं कष्ट कोण घेणार, मोबाईल त्याच्या कानाशी लावून गाणी ऐकवली की पोरगं पण झोळीत झोपू लागलं!

आम्ही पिढी घडवली की बरबाद केली? पर्यायाने समाज नासवला!

कोडगी अप्पलपोटी, स्वार्थी, स्वमग्न, उथळ, भडक, बेदरकार जनावरं तयार केली, ज्यांना देश

नावाची संकल्पना फक्त १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीलाच कळते! याच प्रकारे संवेदना हरवलेल्या निरस समाजाची पायाभरणी केली आम्ही!

इतके पाश्चात्य झालो की, वेस्टर्न कमोड पेक्षा भारतीय बैठक बरी होती हे तिकडच्यानी सांगितलं की पटतं आम्हाला! तिकडच्यानी हाय फायबर म्हटलं म्हणून अमच्याकडचे भरड धान्य महाग होतं आमच्या देशात, चकाचक जगण्याच्या नादात व्याधी जडल्या की बिनसाखरेचा हरबल चहा प्यायला लागतो आणि मऊ गादीवरून पुन्हा खाली फरशीवर झोपावं लागतं आहे.

जगण्याच्या तऱ्हा आम्ही वेळ निघून गेल्यावर गिरवतो आहोत हेच दुःख ! आपल्या कडच्या जुन्या जाणत्यांनी सांगितलेल्या so called outdated गोष्टीच महत्वाच्या होत्या हे वेळीच पटलं असतं तर नसता झाला उथळ हा समाज! भानावर येऊन सावरू या, आपल्या चांगल्या जुन्या साध्या जीवनशैलीला स्वीकारू या, आपल्या मुलांना वेळ देऊ या, त्यांना आपल्या मातीतल्या गोष्टी शिकवू या!

पान नं. २७ वरुन पुढे

प्रदेशातील खाचखळग्यांच्या, दरीखोऱ्यांच्या, अंधाऱ्या लचकेतोडीच्या त्या प्रवासात ती एकटिच होती....तिचा जोडिदार?

तो होता...पण फक्त फिजिकली... त्या प्रसंगात तिने अनेकदा त्याच्याकडे पाहीले.. तिचे वडील अनंताच्या प्रवासाला निघालेले असताना,तिला चार धीराच्या शब्दांची नितांत गरज होती....'मी आहे.. तु एकटी नाहीस..मी आहे.' हे सांगणारा.. एखादा स्पर्श.. एखादा कटाक्ष तिला पुरला असता.. तिने पुरवुन पुरवुन वापरला असता तो क्षण जन्मभर!.... तो भ्रमही तिने वर्षानुवर्षे जपला असता.. त्या भ्रमाच्या आधारे ती तरून गेली असती...

त्या क्षणाची तिने नंतरही वर्षभर वाट पाहीली....कधीतरी तो म्हणेल...,'मी आहे...काळजी करु नकोस'.....

पण ....

त्याची कमअस्सल दानत तिला अजुनही पटवुन घ्यायची नव्हती.... तो चांगला आहे... सकारात्मक राहा.... या व अशा अनेक विचारांसोबत तिने वर्षे काढली....

त्याचा रुक्ष व्यवहार तिला अजुनही मनवळणी पडत नव्हता... तो 'कोरडा' आहे हे ती अजुनही मनोमन स्विकारायला तयार नव्हती.. माया, आस्था, जिव्हाळा या शब्दांशी त्याचा दुरदुरपर्यंत काहीच संबंध नव्हता हे अनेक प्रसंगांमधुन सिद्ध झाले तरी त्या खुणगाठींना ती मान्यच करीत नव्हती. यथावकाश मुले मोठी झाली.आपापल्या विश्वात ऊडून गेली. निसर्ग नियमाप्रमाणे सगळे घडत होते...

वयोमानाप्रमाणे येणारे थकलेपण तिच्याही शरीरात आले व विसावले... तो ही तसाच... थकल्यासारखा...पण अंगातली रग.. तशीच... तिशितल्या माणसासारखी....

तिला सांभाळुन घेणे..तिच्या मनावर फुंकर घालणे, तिची भावनिक गरज ओळखुन तिला आधार देणे, हे असले काही त्याच्या गावीही नव्हते. अशा क्षणांसाठी ती आयुष्यभर तरसली पण तिने त्याला कधी दोष दिला नाही.. मनाच्या एका कोपऱ्यात खुप कोवळ्या वयात मांडलेली त्याची मुर्ती..त्याची प्रतिमा...त्याला ती धक्का लागुन द्यायला ती तयार नव्हती. कदाचित त्या प्रतिमेचे भंगणे ती सहन नसती करु शकली....

कदाचित म्हणुनच....

ती जपत राहीली....सांभाळत राहीली... सगळेच...खुप विदिर्ण करणाऱ्या अनुभवांनंतरही.... रडलीकढली पण ते तेवढ्यापुरतेच.... तिला स्वतःलाही

पान नं. ४३ वर पुढे

## ❖ शक्य आहे शक्य आहे, तुला सर्व काही शक्य आहे. ❖

आयुष्यात सर्व शक्य आहे,
खचू नकोस तू तुला सर्व शक्य आहे,
असत्यातही काही सत्य आहे,
दुःखातही काही सुख शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

आयुष्याच्या वाटेवर येतील असंख्य अडचणी,
पावलोपावली त्या तुला भयभीत करतील,
ठाम राहून एक करशील तू प्रयत्न,
तर तुला योग्य मार्ग मिळणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

धावता धावता लागेल ठेच तुला,
त्याने होशील तू रक्तबंगावा१,
परंतु त्या रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा दाम मिळणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

होईल दुःख, होईल त्रास,
होतील यतना, येईल अपयश,
परंतु आस तू सोडू नकोस, मिळेल नवा अनुभव,
त्याच अनुभवातून नवी सुरुवात शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

कष्टाच्या मागावर असताना, उडेल झोप,
येतील मनात शंका, दुरावतील जवळची नाती,
परंतु खचू नको तू,
कारण तुला त्या कष्टाचे फळ मिळणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

तळपत्या उन्हामुळे अंगाच्या लाह्या होतील,
पडतील टिपटिप घामाच्या धारा,
त्या कष्टच्या अंगाचा घाण वास येईल,
परंतु त्या कष्टात आनंदाचा गंध शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

थकव्याने जाईल झोप,
नाही तर पडतील विद्रावी स्वप्ने, असह्य होईल रात्र,
तरही रात्री नंतर दिवस शक्य आहे, घाबरू नकोस तू
आयुष्याच्या अंधारा नंतर उजेड शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

नकोसे वाटेल आयुष्य, येईल प्रत्येक क्षणाला नैराश्य,
ठेऊनी संयम थोडासा, जा सामोरे धैर्याने,
येईल आशेचा किरण कारण,
तुला हवे असणारे आयुष्य मिळणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

नसेल मिळत माया, नसेल मिळत आपुलकी,
नसेल मिळत प्रेम, नसेल मिळत आदर,
ठेव विश्वास निर्मात्यावर,
कारण तुला सर्व मिळणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

नसतील तुला असंख्य सारथी,
नसेल तुला श्रेष्ठ वारसा,
खचू नकोस तू कारण श्रीकृष्णासारखा
एकच सारथी शक्य आहे,
स्वकर्तृत्वावर श्रेष्ठ वारस होणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

करावे लागतील असंख्य प्रयत्न, मिळतील तुला असंख्य
टोमणे, होतील मनाला असंख्य वेदना,
पण ठाम राहून गडया तू करशील कष्ट,
तर त्या कष्टाचे फळ मिळणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे.

शेवटी जरी रक्ताचं पाणी केलं,
तरीपण अपयश आलं,
सर्व स्वप्ने धुळीस मिळाली,
तरी गड्या जगणे शक्य आहे,
नवी सुरुवात शक्य आहे,
विश्वास ठेव कर्मावर,
विश्वास ठेव स्वतःच्या
प्रामाणिकपणावर,
विश्वास ठेव देवावर,
कारण देव मिळणे शक्य आहे,
शक्य आहे शक्य आहे सर्व काही तुला शक्य आहे.

– सतिश नागनाथ भोंग
**(M.Com,SET)**
(स.प्राध्यापक – VPCSC इंदापूर)



# असे दिवस...
# अशी माणसे....

**गोविंद बभुता मोरे**
सेवानिवृत्त मुख्याध्यापक,
मविप्र समाज, नाशिक.

इंग्रजी आमदानी संपून गेल्यानंतरचा काळ. २६ जानेवारी १९५० ला आपला देश प्रजासत्ताक झाला. १९५२ ला आपल्या देशात आपल्या देशाच्या घटनेनुसार पहिल्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. अनेक लोक कल्याणकारी योजना राबविण्यास सुरुवात झाली होती. आपल्या देशात निरक्षर लोकांचे प्रमाण प्रचंड होते. ज्योतीबा आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणासाठीचे खूप महान कार्य आधीच करून ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण जास्त वेगाने झाले. लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटंत गेले. बहुजन समाज आणि आदिवासी समाजातील मुलेही शाळेच्या पायऱ्या चढू लागली. परंतु तरीसुद्धा ग्रामिण भागातील मुलांना शिक्षण घेणे एवढे सोपे नव्हते.

धुळे तालुक्यातील चौगांव गाव हे खेडेगाव असले तरी तेथे सातवी पर्यंत प्राथमिक शाळा होती. चौगावच्या आजुबाजुला लांबलांब पर्यंत भरपूर जंगल होते. शेतीबरोबरच म्हशी पाळणे हा येथील लोकांचा मुख्य व्यवसाय होता. मुलांचे पालक अडाणी असायचे. ते आपल्या मुलांना शेतीव्यवसायात अडकवून द्यायचे किंवा गुरे वळायला जंगलात पाठवायचे. पारंपारिक पद्धतीने शेती करत असल्याने शेतीत फारसे पिकायचे नाही. दरवर्षी दुष्काळ ठरलेला असायचा. नाही म्हटले तरी शिक्षणासाठी खर्च यायचाच. मुलांना शाळेतून काढून घेवून शेतीकामात गुंतविण्याकडेच पालकांचा कल असायचा.

काही मुले ही मुळातच हुशार असतात, जिद्दी असतात. ही कथा आहे अशाच एका जिद्दी मुलाची व त्याला शिकविणाऱ्या आदर्श गुरूजीची.

श्रीराम बोरसे हा नावाप्रमाणेच एक आदर्श विद्यार्थी. शाळेत अतीशय हुशार. पहीला नंबर त्याने कधी सोडलाच नाही. पण घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची. पुर्वी कुटुंब मोठी असायची. श्रीरामला अजून पाच सहा भावंडं होती. सगळ्यांना शिक्षण घेणे शक्य नव्हते. आज शाळेत जाणाऱ्या मुलांना भरपूर कपडे असतात. तो काळ असा होता की धड एक गणवेश मिळणेही मुष्कील असायचे. एकच चड्डी आणि सदरा स्वत:च्या हाताने धुवून, वाळवून परत अंगात घालावा लागायचा. गरीबीमुळे श्रीरामचे शिक्षण होणे कठीणच होते. पण श्रीरामला सर्वतोपरी मदत करणारे गुरू मिळाले ते तानाजी पाटील गुरूजी. तानाजी मास्तरचे गाव चौगावपासून जवळच असलेले गाव गोताणे. तानाजी भिका पाटील गुरूजी एक आदर्श व्यक्तिमत्व. आपल्या विद्यार्थ्यांवर ते पुत्रवत प्रेम करायचे. विद्यार्थ्यांच्या कल्याणाची त्यांना तळमळ असायची. मुलांमधील गुण ओळखून ते त्यांना प्रोत्साहन द्यायचे. प्रसंगी पदरमोड करून ते विद्यार्थ्यांना मदत करायचे. आपले विद्यार्थी भविष्यात आदर्श नागरिक घडावेत या दृष्टीने ते विद्यार्थ्यांवर संस्कार करायचे.

पुर्वी सातवीला केंद्र परीक्षा असायची. तिला व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा म्हणायचे. या परीक्षेचा निकाल किती लागतो यांवर त्या शाळेची गुणवत्ता ठरायची. तालुक्यातील शाळांमध्ये जास्त निकाल लावण्याची स्पर्धा असायची. त्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी दिवस रात्र एक करायचे. सातवीचे मुले रात्रीचा

अभ्यास कंदील चिमणीच्या उजेडात शाळेतच करायचे. गुरूजी रात्री उशिरा पर्यंत मुलांना शिकवायचे, त्यांच्याकडून अभ्यास करून घ्यायचे. पहाटे लवकर अभ्यासाला उठवून द्यायचे.

श्रीरामला पाचवी, सहावी, सातवीला गोताण्याचे तानाजी मास्तर हे वर्गशिक्षक म्हणून लाभले. १९५१-५२चा तो काळ असावा. तेंव्हा फायनलच्या परीक्षेला फार महत्त्व असायचे. फायनल झालेल्यांना मराठी शाळेत मास्तर (गुरूजी) ची नोकरी मिळायची. तेंव्हा जिल्हा परिषद नव्हत्या. त्याऐवजी लोकल बोर्ड असायचे. लोकल बोर्डच्या मराठी शाळा असायच्या. मराठी शाळेत नोकरीला लागलेल्या शिक्षकांना नंतर ट्रेनींगसाठी शासनाच्या खर्चाने स्टायपेंड देवून धुळ्याला पाठवले जायचे. धुळ्याला स्वस्तीक टाकीच्या समोर शासकीय इमारतीत शिक्षक ट्रेनींग स्कुल होते. तानाजी पाटील गुरूजी नुकतेच धुळ्याला ट्रेनींग घेऊन आले होते. ते अतीशय कनवाळू स्वभावाचे होते. आदर्शवादी होते. श्रीरामची हुशारी त्यांनी हेरली होती. श्रीरामचा उल्लेख ते 'खडकावरील अंकुर' असा करायचे. गुरूजींना पुस्तके वाचण्याची खुप आवड होती. एखाद्या पुस्तकातील चांगले विचार ते मुलांना वाचून दाखवायचे. मुलांवर सुसंस्कार करण्याची एकही संधी ते सोडत नसंत. ते कधी आपल्या डब्यातला डबा प्रेमाने श्रीरामला खायला द्यायचे. श्रीराम सातवीला असतांना तानाजी गुरूजी कधी कधी रात्रीसुद्धा गोताणेहून चौगावला शाळेत यायचे. मुलांच्या रात्रीच्या अभ्यासावरही त्यांचे बारीक लक्ष असायचे. दिवाळीच्या सुट्टीत तानाजी मास्तर चौगाव आणि उडाणे येथील सातवीच्या मुलांना गोताणे येथे बोलवून घ्यायचे. महीनाभर विनामोबदला मुलांचे ज्यादा तास घेऊन शिकवायचे. जास्तीत जास्त मुले केंद्र परीक्षेत पास कसे होतील यासाठी शिक्षक प्रयत्न करायचे. कॉपी हा प्रकार तेंव्हा कुणाला माहीत नव्हता. परीक्षा या तेंव्हा खऱ्या अर्थाने परीक्षा होत्या. खरोखर बुद्धीवान विद्यार्थी असेल त्यालाच साठ टक्केच्या वर मार्क मिळंत. १९५६ साली श्रीरामला त्यावर्षीच्या फायनलच्या परीक्षेत सत्तर टक्केच्या वर मार्क मिळाले. डिस्टींगशन ही तेंव्हा दुर्मीळ गोष्ट होती. जिल्हा मेरीट यादीत श्रीरामचे नाव झळकले. आण्णा (श्रीराम बोरसे सर) तेंव्हाची एक गमतीशीर आठवण सांगतात. फायनलच्या परीक्षेत डिस्टींगशन मध्ये आल्याने जिल्हाभर माझे नाव गाजत होते. पण आमच्या घरच्यांना त्याचा गंधही नव्हता. उलट नेमका त्याच दिवशी आमचा एक बैल मेला. शेतकऱ्यांच्या दृष्टीने बैल म्हणजे जीव की प्राण. बैल गेला हे एक फार मोठे संकट होते. सर्व जण त्या दु:खात गढून गेले. डिस्टींक्शन मध्ये पास झाल्याबद्दल कुणीही एका शब्दानेही कौतुक केले नाही. समाज एवढा अडाणी की कुणीही श्रीरामच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली नाही. शाब्बासकीची थाप देणारे एकच होते ते म्हणजे तानाजी गुरूजी.

श्रीरामचे आई वडील अशिक्षित होते. त्याकाळी शिक्षणाचा प्रसार जास्त झालेला नव्हता. वडीलांना मार्गदर्शन करतील असे गावात कुणीच नव्हते. वडीलांनी श्रीरामचे शिक्षण बंद केले आणि त्याला गावातीलच त्यांचे भाऊबंद झगा बेपारी (बोरसे) यांचेकडे सालाने कामाला लावून दिले. त्यावेळच्या रिवाजानुसार साल होते खाता पिता, कपडा लत्ता, प्रसंगी दोन लाथा २५ रूपये. श्रीरामला सालदार म्हणून कामाला लावून दिले म्हणजे घरातील एक खाते तोंड कमी होईल व थोडी फार पैशांचीही मदत होईल असा श्रीरामचे वडील बारकू महाजनचा बारीक हिशोब असावा. झगा बेपारी (बेपारी म्हणजे व्यापारी. हे गावातील टोपणनाव) व त्यांची पत्नी जानका माय हे प्रेमळ कुटुंब. जानकामायचा प्रेमाचा अनुभव मी ही लहानपणी घेतला आहे. माझी माय रूपामायवर जानकामायचे खुप प्रेम होते. रूपामाय बऱ्याचदा जानकामायच्या शेतात कामाला जायची. मी नेहमी मायच्या मागे मागे रहायचो. जानकामाय मला

नेहमी चिडवत रहायची आणि तेवढेच माझे लाडही करायची. श्रीरामाने झगा बेपारीकडे काही दिवस सालदार म्हणून काम केले. सालदारकीची ही खबर तानाजी गुरूजींच्या कानावर गेली. केवळ अज्ञानामुळे एका हुशार मुलाचे आयुष्य बरबाद होत आहे हे पाहून तानाजी गुरूजींचे सात्त्विक मन कळवळले. त्यांनी मनाशी एक निश्चय केला आणि बारकू महाजनची घरी जाऊन भेट घेतली.

गुरूजींनी बारकू महाजनचे मन जाणून घेतले. 'मी असे ऐकले की तुम्ही श्रीरामची शाळा बंद करणार आहेत.?'

मंग काय करानं गुरूजी? गावमा जवपावत शाया व्हती तवपावत मी त्याले शिकाडं. घरनी परीस्थिती दखवो ती आशी. बरं तो मना एकटा पोरगा नहीं. त्याना दुसरा भाऊ बहीणीबी शेतंस. मी कोणकोणले शिकाडू ? मण मण कर्ज व्हयी जायेल शे. ते फेडू का पोरेसले शिकाडू? श्रीरामले पुढे शिकाडानं म्हणजे त्याले दुसरा गावले धाडनं पडी. त्याना बाहेर गावना खर्च माले परवडावू नहीं. वडीलांचे म्हणनेही बरोबरच होते.

' अहो, तुम्हाला माहित नाही तुमचा मुलगा किती हुशार आहे तो. सातवी फायनल परीक्षेत तो जिल्हा गुणवत्ता यादीत आलेला आहे. शिकून तो फार मोठा होईल. तो तुमचे सर्व पांग फेडील.' नाना परीने गुरूजींनी श्रीरामच्या वडीलांना समजावून सांगितले. श्रीरामचीही शिकण्याची खुप इच्छा होती पण वडीलांपुढे त्याचाही नाईलाज होता.

चौगावपासून हायस्कूलचे जवळचे गाव म्हणजे पाच किलोमीटर अंतरावरील कुसुंबा. बुधवारच्या बाजाराचे गावही तेच. गेल्याच वर्षी तेथे विकास माध्यमिक विद्यालयाची स्थापना झाली होती. शाळेला देणगी म्हणून शाळेत नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शाळा तेव्हा ५१ रुपये घेत असंत. तानाजी गुरूजींनी श्रीरामच्या प्रवेश फी चे ५१ रुपये परस्पर भरून दिले. श्रीरामचा हायस्कूलचा मार्ग सुकर झाला. चौगाव ते कुसुंबा असा पायी ये-जा करून माध्यमिक शिक्षण सुरू झाले. मराठी शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांकडेही मराठी शाळा शिक्षक तानाजी भिका पाटील गुरूजींचे लक्ष असायचे. पाटील गुरूजी हे हाडाचे शिक्षक होते. एक आदर्श शिक्षक होते.

श्रीरामच्या अंगावरचे कपडे फाटलेले असायचे. पण फाटलेल्या कपड्यांची त्याने कधीही लाज बाळगली नाही. अभ्यासावरच त्याने आपले लक्ष केंद्रित केले. चिमणीच्या अंधुक आणि धुरकट प्रकाशात अभ्यास करणाऱ्या श्रीरामचे कौतुक करणारी एकच व्यक्ती चौगावमध्ये होती. त्या व्यक्तीचे नाव धुडकू तानाजी बोरसे. त्यांनी ॲग्रीकल्चर डिप्लोमा केला होता व ते बाहेर गावी नोकरीला होते. श्रीराम दहावीत असताना विकास शाळेच्या पहील्या बॅचचा अकरावी (एस.एस.सी.)चा निकाल लागला. पहिल्याच वर्षीचा शाळेचा निकाल खुप कमी होता. तनमनधनाने शिक्षकी पेशात कार्यरत असलेल्या पाटील गुरूजींना वाईट वाटले. श्रीरामच्या भवितव्याची त्यांना चिंता वाटू लागली. बोरसे कुसुंब्यालाच राहीला तर कदाचित त्याचे नुकसान होईल हे गुरूजींच्या लक्षात आले. त्यांनी श्रीरामला बोलवून घेतले. ते म्हणाले,'श्रीराम, मला असे वाटते की तू अकरावीसाठी एक वर्ष धुळ्याला शिकायला जावे. धुळ्यात तुझे कुणी नातेवाईक आहेत का की ज्यांच्याकडे तुला एक वर्ष शिक्षणासाठी थांबता येईल?' सुदैवाने श्रीरामचे मामा देवपूर धुळ्याचे होते. पण धुळ्याला डायरेक्ट अकरावीला प्रवेश मिळणे जरा मुष्कील होते. प्रत्येक शाळा अकरावीच्या निकालाच्या बाबतीत जागरूक असायच्या. आठवी पासूनच ते विद्यार्थ्यांची चांगली तयारी करून घ्यायचे. निकालावर वाईट परिणाम होवू नये म्हणून अकरावीला मधूनच नवीन

विद्यार्थ्याला सहसा प्रवेश द्यायचे नाहीत.

धुळ्याच्या मध्यवर्ती ठिकाणी जे.आर.सिटी हायस्कूल आहे. तेथे तानाजी गुरूजींचे लहान बंधू गोमा भिका पाटील हे शिक्षक होते. गुरूजींनी आपल्या बंधूला श्रीरामविषयी सांगितले. दोन्ही पाटील बंधूंच्या प्रयत्नातून अपवादात्मक केस म्हणून श्रीरामचा जे.आर.सिटी हायस्कूलमध्ये अकरावीला प्रवेश झाला. येथेही श्रीराम जुनी अकरावी एस.एस.सी. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. श्रीराम बारकू महाजन (बोरसे) सर यांचे जीवन एका सेवाभावी आदर्श गुरूजींनी घडवले. सरांनी गुरूजींच्या आठवणी आपल्या काळजात आदरपूर्वक जपून ठेवल्या आहेत. देव आपण कुणी पाहीला नाही. पण तानाजी गुरूजींसारखी माणसे ही निदान काही लोकांच्या जीवनात प्रकाश पेरणारी देवमाणसंच असतात.

पुर्वी सातवी व त्यानंतर अकरावी पास झालेल्यांना शिक्षकाची नोकरी मिळत असे. नोकरीला लागलेल्या शिक्षकांना सरकार नंतर पगारी रजेवर ट्रेनिंगसाठी पाठवायचे. श्रीरामने नोकरीसाठी अर्ज केले. गुणवत्ता यादीत असल्याने त्यांचा नंबर सहजपणे तालुक्यातील लोकल बोर्डच्या शाळेत लागला. तशी त्यांना ऑर्डरही आली. पण ऑर्डर येण्याच्या आधी लोकल बोर्डच्या एका नेत्याने बारकू महाजन कडून त्यांच्या गावातील एका नवीन शाळेसाठी शंभर रूपयांची वर्गणी घेतली. श्रीरामचा गैरसमज झाला. त्याला वाटले लोकल बोर्डच्या नेत्याने नोकरी साठी आपल्या वडिलांकडून लाच घेतली. मुलाला नोकरी लागली या आनंदाच्या भरात वडीलांनी मुलीच्या हातातील गोठ पाटल्या विकून शंभर रुपये भरले. श्रीरामच्या मनाला ही गोष्ट रूचली नाही. गुणवत्तेनुसार आपला नंबर लागला असताना नोकरीसाठी वडीलांना शंभर रुपये द्यावे लागले याचे वाईट वाटले. 'कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला आपल्या जीवनात थारा देऊ नका' अशी तानाजी गुरूजींची आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण होती. श्रीरामने त्या शाळेत रूजू न होण्याचे ठरवले. भ्रष्ट मार्गाने नोकरी मिळत असेल तर आपण ती स्विकारायची नाही असे त्यांचे मन त्यांना सांगत होते. विचारांची प्रचंड घालमेल झाली. त्यातच ते आजारी पडले. वास्तविक त्यांचा त्यावेळी गैरसमज झाला होता. त्यावेळी त्यांचा मोठा भाऊ चिंधा दादा गुजरातमध्ये पोलीस दलात नोकरीला लागला होता. श्रीराम मोठ्या भावाकडे गुजरातला निघून गेला. येथून पुढे श्रीरामच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली.

येथे आल्यावर वेगवेगळ्या ठिकाणी अर्जफाटे करणे सुरू झाले. त्यातच त्यांचा नंबर इंडीयन टिचर्स डिप्लोमासाठी(T.D.) अहमदाबाद येथे लागला. वरून दरमहीना ४८ रुपये स्टायपेंडही मिळाली. सातवी पासूनच सरांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती मिळायला सुरुवात झाली होती. एक वर्षाचा डिप्लोमा यशस्वीपणे केल्यानंतर त्यांना मेरीटच्या आधारावर नगरपालिकेच्या शाळेत लगेच शिक्षकाची नोकरी मिळाली. पगार सुरू झाला. जीवनाला काहीशी स्थिरता आली. पण सरांच्या मनाला अजुनही शांतता नव्हती. लहानपणापासून पाहीलेले गरीबीचे दशावतार ते विसरले नव्हते. घरची गरीबीची परीस्थीती सतत डोळ्यासमोर फिरत रहायची. आई वडील आणि आपल्या भावंडांना सुखी झालेले पाहणे हे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी ते काहीही त्याग करायला तयार होते.

चौगांव हे तेव्हा कोरडवाहू गाव म्हणून ओळखले जायचे. कोरडबोंडे गाव म्हणून या गावात कुणी लवकर मुली द्यायलाही तयार होत नसंत. गावात पाच दहा सधन लोक सोडले तर बहुतेक जण कायमच कर्जाच्या विळख्यात अडकलेले असायचे. श्रीराम सरांचे गावातील माळीवाड्यातील घर भरपूर मोठे होते. पण घराचा

बराचसा भाग काही जणांकडे गहाण म्हणून पडला होता. ज्यांच्याकडे घर गहाण म्हणून ठेवले होते त्यापैकी एक जण घराचा वापर चाऱ्यांचा कोठा म्हणून करायचे तर दुसरा गुरांचा गोठा म्हणून करायचा. घरात कुणाचे लग्न कार्य असेल तर त्यासाठी कर्ज काढण्यावाचून गत्यंतर नसायचे. कर्ज काढायचे तर घर किंवा शेती गहाण ठेवावी लागायची. शेती गहाण ठेवली तरी काढलेल्या कर्जावरचे सावकारी व्याज वाढत रहायचे. कर्ज इतके वाढायचे की ते फेडणे मुष्कील व्हायचे. श्रीराम लहान असताना त्यांची सात एकर जमीन केवळ सहा सात हजार रुपयांत त्यांना विकावी लागली. त्यांनी ती जमीन कुसुंब्याच्या एका वाण्याकडे गहाण ठेवली होती. पैसे परत मिळत नाहीत असे पाहून वाण्याने ती जमीन विक्रीस काढली. सरांच्याच काही भाऊबंदांनी ती स्वस्तात विकत घेऊन टाकली. शेती म्हणजे शेतकऱ्यांचा काळजाचा तुकडा असतो. काळजाचा तुकडा कापला गेल्याचे दुःख बारका महाजनने पचवले. पण श्रीरामच्या काळजावर गरीबीमुळे पडलेले चरे तसेच राहिले.

नगरपालिकेच्या शाळेत नोकरीला लागलेले असतांनाही सर अतीशय साधेपणाने आपले जीवन जगत राहीले. पगारातील पै न पै ते घरी पाठवत राहीले. गहाण पडलेले घर, शेती सोडवणे, घरच्यांना कर्जातून मुक्त झालेले पाहणे हे त्यांचे ध्येय होते. दहा वर्षे त्यांनी गुजरातमधील ही नोकरी केली. त्याचवेळी त्यांनी आपले पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणेही चालूच ठेवले. शिक्षणासाठी त्यांना नेहमीच शिष्यवृत्ती मिळत गेली. घरच्यांना कर्जमुक्त केल्याशिवाय आपण लग्न करायचे नाही असा त्यांनी निश्चय केला होता. घरच्यांना यापुढे एक नया पैसा कर्ज काढू न देता त्यांनी आपल्यापेक्षा लहान बहीण भावांची लग्ने करून दिली. स्वत:साठी नाही पण घरच्यांसाठी आपल्या पगाराचे पैसे ते खर्च करत राहिले.

दहा वर्षांनंतर उच्च शिक्षण घेऊन ते आपल्या गावाकडे परत आले. श्री. श्रीराम बारकू महाजन हे आमच्या चौगावमधील पहीले पदवीधर , पहीले पोस्ट ग्रॅज्युएट आणि पहीले डॉक्टरेट पदवी मिळविणारे. धुळ्याच्या एसएसव्हीपीच्या कॉलेजमधे त्यांनी मुलाखत दिली. शैक्षणिक अर्हतेनुसार त्यांची संस्थेच्या दोंडाईचा कॉलेजला सिनियर विभागात प्रोफ़ेसर म्हणून निवड झाली. प्रोफ़ेसरची नोकरी लागूनही दोन वर्षे त्यांनी लग्न केले नाही. त्यांना घराची आणि शेतीची घडी नीट बसवायची होती. अनेक स्थळे त्यांच्यासाठी सांगून आली. भरपूर हुंडा द्यायलाही पुष्कळजण तयार होते. पण सरांचे एकच म्हणने होते. 'मी लग्नात एक पैसाही हुंडा घेणार नाही.' गावातील भाऊबंद सरांना वेड्यात काढत होते. ' एवढा मोठा प्रोफेसर व्हयना. चांगला पगार शे. पोरवालां व्हयीसनी हुंडा देवाले तयार शेतंस. मंग आपुनले लेवाले काय हरकत शे? पण हावू ऐकालेच तयार नहीं. शिकेल तेव्हडा हुकेल म्हणतंस ते खरंच शे.' भाऊबंद असे टोमणे मारायचे. हा परस्पर गुजरात मधील एखाद्या मॅडमशी लग्न लावून मोकळा होईल असेही काही जण सरूमायजवळ बोलायचे.

पण सरांनी आई वडीलांनी सुचवलेल्या नात्यातल्या मुलीशी लग्न केले. अतीशय साध्या पद्धतीने कानबाईच्या उत्सवात सार्वजनिक विवाह सोहळ्यात सरांचे आणि निजामपूर जैताणे येथील इंदिरा ताईंचे लग्न पार पडले. लग्नानंतर काही दिवसांतच सरांनी आपल्या शेतात नवीन विहीरीचे खोदकाम हाती घेतले. विशेष म्हणजे विहीरीच्या कामात स्वत: प्रोफेसर, त्यांची पत्नी इंदिराताई आणि घरचे इतर सदस्य यांनी हातभार लावला. घरच्या घरी त्यांनी पाणी लागेपर्यंत विहीरीचे काम केले. त्यावेळी आमच्या चौगावमध्ये हा कौतुकाचा विषय होता. प्रोफेसर, त्यांची एवढी सुंदर पत्नी इंदिराताई विहीरीचे काम करतात याची गावभर चर्चा व्हायची.

सरांचा व्यासंग वाढतंच गेला. हिंदी विषयात त्यांनी डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. धर्म, अर्थ, काम मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी काम या विषयावर संशोधन करून त्यांनी पुणा युनीव्हरसिटीत आपला प्रबंध सादर केला. पुणे येथील सच्चीदानंद परूळेकर सर हे त्यांचे गाईड होते. शहादा, तळोदा, दोंडाईचा येथील कॉलेजमध्ये त्यांनी प्राचार्य पद भूषविले. त्यांनी ग्रामदैवतांचा अभ्यास करून पुस्तके लिहिली. नोकरी करत असताना समाजसेवेचे कामही चालू असायचे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही चौगावला ग्राम विकास मंडळाची स्थापना केली होती. मी, ओंकार पाटील, मगन पवार, काशिनाथ बोरसे गुरूजी असे आम्ही काही जण त्यामध्ये होतो. मंडळाचे एक वाचनालयही आम्ही सुरू केले होते. मंडळामार्फत चांगल्या व्याख्यात्यांची व्याख्याने आम्ही संत सावता महाराज मंदिरात ठेवायचो. पण ग्राम विकास मंडळाचे कार्य आम्हाला पुढे चालवता आले नाही.

२००२ मध्ये सर सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी पांडुरंग शास्त्री आठवलेंच्या स्वाध्याय कार्याला वाहून घेतले. मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान हे सरांचे अभ्यासाचे आणि आवडीचे विषय. भारतीय तत्त्वज्ञान जगात कसे श्रेष्ठ आहे हे त्यांना आठवले शास्त्रींची पुस्तके वाचून समजले. स्वामी रामदेव बाबांच्या पतंजली योग कार्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. रामदेव बाबांबरोबर ते अनेक सहविचार सभेत सहभागी झाले. योगासनांचे केंद्र चालवले. दोंडाईचा गावात मोफ्फत वाचनालय काढले. आजही सरांची तब्येत ठणठणीत आहे. आजही फ्फिरणे सतत चालू असते. आजारी माणसांना समुपदेशन देण्याचे काम ते करत असतात. आपल्या सत्वशिल विचारांची शिदोरी ते लोकांमध्ये वाटत असतात. आयुष्यात अनेक संकटांना तोंड देवूनही ते मानसिकरीत्या शांत आणि सुदृढ आहेत.

तानाजी भिका पाटील गुरूजी आणि माजी प्राचार्य श्रीराम बारकू महाजन (बोरसे) सर या गुरू शिष्याची कहानी एका विशिष्ट पिढीचे प्रतिनिधीत्व करते. गुरूजींच्या घराशी सरांचा असलेला कौटुंबिक जिव्हाळा आजही टिकून आहे. तानाजी मास्तरच्या घरातील एक घटक असेच सरांचे आजवरचे वावरणे राहीले आहे. गुरूजींनी आपल्या शिष्यावरचे प्रेम मरेपर्यंत कायम ठेवले. मृत्यूसमयी गुरूजी बोरसे सरांसाठी एक बंद लिफाफा सरांच्या नावे मागे ठेवून गेले. सरांसाठी 'प्रसाद' असे पाकीटावर लिहिले होते. पाकीटात पाच हजार रुपये निघाले. त्या पैशातून सरांनी दोंडाईचा येथील वाचनालयातील पुस्तके ठेवण्यासाठी एक कपाट घेतले. गुरूजींची आठवण म्हणून सौजन्य पुर्ण गुरूजींचे नाव कपाटावर टाकले. गुरूजींची आठवण कायम राहणार आहे. गुरूजींचे विचार पुस्तक रूपाने पुढच्या पिढीला मार्गदर्शन करत राहतील.

एक पिढी होती ज्यांनी आपल्या घरादारासाठी खुप त्याग केला. ऐन उमेदीच्या काळातील काही वर्षे घराच्या अडचणी सोडविण्यात घालवले. नंतर नंतर तेही आपापल्या प्रपंचात रमले. गाव सोडून नोकरीच्या गावी घरे बांधून तिकडेच स्थायिक झाले. पण गावाकडची ओढ मात्र कायम राहीली. वडीलोपार्जीत शेतीत वाटा मिळाला. पण आयुष्यभर त्या शेतीचा खरा उपभोग त्यांना घेताच आला नाही. भावाभावांच्या वाटणीत काहींना घराचे काही खण वाट्याला आले, काहींच्या वाट्याला ते ही आले नाहीत. भावांनी आपल्या वाट्याची मातीची घरे पाडून तेथे आलिशान सिमेंट कांक्रीटची घरे उभी केली. नोकरीवाल्यांची पडलेली घरे इतकी आक्रसत गेली की तेथे बांधकाम करणे अवघड व्हावे. नोकरीसाठी बाहेर गावी गेलेल्या आपल्याच घरातील व्यक्तीने तिकडेच रहावे, गावाकडे घराकडे परतून येवूच नये अशी ग्रामिण भागातील काही लोकांची प्रवृत्ती झाली आहे. नवीन पिढीला जुन्या लोकांच्या त्यागाची आठवण

राहीली नाही. घर सोडून बाहेर गेलेला माणूस बाहेरचाच होवून गेला. गावातील किंवा घरातील माणसांनी त्याला मनापासून स्विकारलेच नाही. बाहेरगावी नोकरी करणारा माणूस सेवानिवृत्तीनंतर जेव्हा आपल्या गावी आपली शेती कसायला येतो तेंव्हा गावातील लोक त्याच्याकडे उपहासाने बघतात. 'याले काय कमी शे ? आणि हावू काय शेती करी?' असे टोमणे ते मारतात. नेमके स्वार्थी कोण? हे ठरविणेही कठीण होऊन जाते.

बोरसे सरांना शेतीची आवड पहिल्यापासून आहे. आजही त्यांच्या वाट्याला आलेली शेती ते करतात. चौगावला आणि दोंडाईचाला त्यांनी थोडी जमीन घेतली आहे. शेतीची आणि शेतीकामाची आवड त्यांना पहील्यापासून आहे. मी इकडे सिन्नरला राहतो. ते दोंडाईचाला राहतात. कधीतरी आमची गाठभेट होते. जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. आमच्या सारखे असे अनेक असतील जे गाव व घरदार सोडून लांब कुठेतरी राहतात. आई वडील आणि भावंडांबरोबर ज्या घरात व गावात लहानाचे मोठे झाले त्या घरच्या आठवणींनी बेचैन होतात. त्याग करायचे दिवस संपले आहेत असा आजचा काळ आहे. जुन्या पिढीने जगण्यासाठी जो संघर्ष केला सुदैवाने नवीन पिढीला तेवढा करावा लागत नाही. संघर्ष करून जुनी पिढी आता स्थिरस्थावर झाली आहे. नवीन पिढीकडून त्यांना केवळ प्रेमाची अपेक्षा आहे. नवीन पिढीने जुन्या पिढीशी निदान कृतज्ञ रहावे एवढीच माफक अपेक्षा करून मी माझ्या लेखनाला विश्रांती देतो.

पान नं. ३४ वरुन पुढे

आश्चर्य वाटायचे तिच्या या वागण्याचे!.... आधी त्याला तिच्या भावनिक गरजा समजल्या नाहीत ..नंतर तिच्या थकलेपणाच्या...तिचे औषधोपचार त्यासाठी लागणारे पैसे..त्याने कायम रागरागच केला सगळ्याचा... तिचाही.... मग मात्र आता ती काहीशी सावध झालेली.... गेली तीस वर्ष आपण या घरात काय करतोय कोण आहोत आपली किंमत असली प्रश्नांची भुतावळ तिला छळायला लागलेली..... मग ती अजुनच थकल्यासारखी झाली...वृद्धत्व तिच्याकडे फार लवकर चाल करुन आले असे तिला कायमच वाटायचे....गोळ्या औषधे खात, इतर काही करण्यासाठी नसल्यासारखे ती संसार नावाचा गाडा रेटत राहीली...मनाविरुद्ध आयुष्यात रमत राहीली...

ती थकत चाललेली..त्याला दिसत होते.. तिची शारीरीक ताकद अशक्तपणा..पण तिला दिलासा द्यावा...अशी त्याची मानसिकता नव्हतिच कधी...तिला ही आता आशा नव्हतीच त्याच्याकडुन !....

एक दिवस ती घरातच पडली...त्याला बऱ्याच वेळाने लक्षात आले म्हणे. दवाखान्यात नेले. तिच्या मेंदुला दुखापत झाली होती. सगळ्या तपासण्या, सलाईन इंजेक्शन नाकातोंडात नळ्या, मुलांना फोन सगळे केले गेले.. पण यश आले नाही...

हं...विझण्याआधी वातीने एकदा डोळे उघडलेले व शेजारी ऊभ्या असलेल्या कोरड्या ठक्क डोळ्यांकडे, हाताच्या घडीकडे व सपाट चेहऱ्याकडे आशेने, अपेक्षेने पाहीले.

तिची परत निराशा झाली...काहीच नव्हते तिथे...तिला हवे ते.... त्या थंडगार नजरेने तिच्यातली जगण्याची ऊर्मी जणु हिसकावुन घेतली...एक चुकार थेंब परत तिच्या डोळ्याच्या कडेने तडफडुन झिरपला.... ज्याच्या नावावर आयुष्य केले होते त्याने तिला बऱ्याच गोष्टी नाकारल्या होत्या. हा जळता निखारा पदरी बांधुन ती अनंताच्या प्रवासाला मागे न बघता निघाली. नेहमीप्रमाणेच हिरमुसली होऊन.. रुसल्यासारखी.....जाताना पदरात काही कोरडे' क्षण तिची परत निराशा झाली...काहीच नव्हते तिथे...तिला हवे ते.... त्या थंडगार नजरेने तिच्यातली जगण्याची ऊर्मी जणु हिसकावुन घेतली...एक चुकार थेंब परत तिच्या डोळ्याच्या कडेने तडफडून झिरपला....

ज्याच्या नावावर आयुष्य केले होते त्याने तिला

पान नं. ७६ वर पुढे



# सत्यशोधक विवाह

**श्री. सुदाम दगडू घाडगे**
स.नं. ८२/३/९ के अजिंक्य समृद्धी, सी-२
सावंतविहार फेज -२, मोरेबाग, कात्रज, पुणे-४४.
मो.: ९९२२६०७३३७

<u>सत्य शोधक पद्धतीने विवाह का करावा?</u>

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक कार्यातून १८ व्या शतकात इतिहास घडविला. त्यामुळे महाराष्ट्र नव्हे तर जगभर फुले दांपत्याचे सामाजिक इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. हे आपण सर्वजण जाणत आहोत. महात्मा जोतीराव फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ साली केली.  इ.स. पूर्व तीन हजार वर्षापासून ज्या वैदिक धर्म परंपरेने आपल्या तत्वज्ञानाच्या पोलादी चौकटीत येथील समाजाची नाकेबंदी केली. ती मोडीत काढण्याचे ऐतिहासिक कार्य फुले दांपत्यानी केले तसेच सत्यशोधक समाजाचे अनेक सभासद व इतर मंडळींनी देखील केलेले आहे.

या देशातील पहिला सत्यशोधक विवाह महात्मा जोतीराव फुले यांनी पुरोहिताशिवाय २५ डिसेबर १८७३ रोजी लावला. त्या वराचे नाव सिताराम जबाजी आल्हाट. वधूचे नाव राधा बजूबाई निबंनकर असे होते. ह्या विवाहाचा खर्च स्वतः महात्मा जोतीराव फुले यांनी केला. तरी देखील त्यांच्यावर त्यावेळी खटला भरण्यात आला, मात्र ज्योतीबा फुले व सावित्री जरा ही डगमगले नाहीत. त्यामुळे सत्यशोधक विवाहाची परंपरा पुढे बराच काळ चालू राहिली. आजच्या काळात धार्मिक विधीची परंपरा जोरात चालू असली तरी देखील अनिष्ट रूढी तसेच अंधश्रद्धेवर आधारलेली विधी यामुळे धार्मिक विवाह अत्यंत खर्चिक बनत चालले आहे. तर दुसरी पद्धत कायदेशीर रजिस्टर आहे. त्यामध्ये वधुवरांच्या संमतीने दोन्हींकडील दोन साक्षीदारांच्या मदतीने कायदेशीर विवाह होतो. परंतु यामध्ये देखील विलंब प्रक्रिया तसेच कौटुंबिक व सामाजिक विवाहाचा आनंद समाज मान्यता मिळत नाही. समाजाच्या चालीरीती व संस्कार विधी ज्याप्रमाणे बदलत्या काळानुसार बदलत गेल्या पाहिजे त्याप्रमाणे समाजाला प्रगतीकारक ही ठरल्या. ह्या सर्व दृष्टीने महात्मा फुले यांनी १४५ वर्षापासून सुरू केलेली सत्यशोधक विवाह पद्धत सर्वांनाच सामाजिकदृष्ट्या आणि २१ व्या शतकात विज्ञान युग असताना अत्यंत हितावही आहे.

आजच्या विज्ञान युगात केवळ कॉम्प्युटर व रोबोची संख्या उपयुक्त नसून आपली विचार सरणी व नित्य दैनंदिन आचरण वैज्ञानिक असले पाहिजे, विवाह हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा संस्कार असल्यामुळे तो तात्विक वैज्ञानिक दृष्टीकोनातून झाला पाहिजे. यासाठी हुंडा सारख्या अनिष्ट चालीरिती, अवैज्ञानिक कर्मकांड व विषमता यांना थारा न देणारी विज्ञाननिष्ठ समतावादी सत्यशोधक विवाह पद्धतच योग्य आहे. या पद्धतीचा समाजात जास्तीत जास्त प्रसार होणे ही काळाची गरज आहे.

यासाठी आमची संस्था फुले शाहू आंबेडकर एज्युकेशनल व सोशल फौंडेशनच्या बहुउद्देशीय सत्यशोधक केंद्रातर्फे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, पंडिता रमाबाई, न्यायमुती रानडे, अशा अनेक महापुरुषांच्या आदर्श डोळ्यासमोर ठेऊन सर्व जाती धर्मातील, सर्व समाजातील वधूवरांना विवाहाचा आनंद आपापल्या नातेवाईक, सगेसोयरे, मित्रपरिवारासह

अत्यंत कमी खर्चात, अनिष्ठ रुढी, परंपरा या गोष्टींना फाटा देऊन काळानुरूप योग्य त्या बदलासह सर्वांना सामाजिकतेचे भान देणारे कार्य करून आर्थिक खर्चाची उधळपट्टी, नाहक अन्नपाण्याची नासाडी थांबवून सामाजिक ऋण म्हणून अंध, अपंग निराधार गरजवंतांना ह्या विवाहप्रित्यर्थ जमल्यास मदत करून आपला आनंद द्विगुणीत करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. तसेच आम्ही हे सत्यशोधक विवाह लावले नंतर रजिस्टर नोंद करून त्यांना विवाह झाल्याचे सत्यशोधक विवाह प्रमाणपत्र आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देत असतो.

### सत्यशोधक विवाहाची वैशिष्ट्ये व फायदे

वर्षातील ३६५ दिवसांपैकी कोणत्याही दिवशी आणि सोईस्कर वेळी विवाह होऊ शकतो. या पद्धतीत आंतरजातीय, आंतरधर्मीय, स्वजातीय विवाह करण्यास परवानगी असल्याने जाती व्यवस्था व धर्मभेद नष्ट होण्यास मदत होते. या पद्धतीत ज्योतिष शास्त्र, कुंडली याला फाटा दिल्याने आर्थिक खर्च होत नाहीत. हुंडासारख्या अनिष्ठ प्रथा नष्ट झाल्याने हुंडा बळी अत्याचार इत्यादी प्रकार थांबण्यास मदत होते. या विवाहात रूसने फुगणे, मान-अपमान इत्यादी प्रकारांना पूर्णपणे बंदी असल्याने लग्नात कोणतेही विघ्न निर्माण होत नाहीत. या विवाहात कमी वेळी व कमी पैसा खर्च होत असल्याने वेगवान विज्ञान युगात तसेच महागाई युगात ही पद्धती सोपी व सोईस्कर आहे. या विवाहात वराने हुंड्याला केलेला त्याग व वधूने केलेल्या दागदागिन्यांचा त्याग हे सामाजिक दृष्टीने महत्त्वाचे असून सहजीवनाची सुरूवात त्यागाने होत असल्याने पति-पत्नीमध्ये खरे प्रेम निर्माण होते. त्यामुळे भावी संसार सुखाचा आनंदाचा व भरभराटीचा होण्यास मदत होते.

### सत्यशोधक विवाहास आवश्यक साहित्य

अक्षता ऐवजी फुले, सुगंधी फुलांच्या पाकळ्या किंवा नुसत्त्या टाळ्या सुद्धा चालू शकतात. यामुळे पायी तुडवले जाणारे तांदळाची नासडी होत नाही. वधुवरांसाठी दोन मोठे हार तसेच महापुरूषांच्या फोटोंना हार वधुवर व त्यांचे आई-वडील आणि त्यांचे मामा-मामी यांची बैठक व्यवस्था यासाठी खुर्च्या आणि साहित्य ठेवण्यासाठी व फोटो ठेवण्यासाठी एक-दोन टेबल. स्टेजवर माईक, स्पीकर तसेच फुले-आंबेडकर व इतर महापुरूषांच्या ध्वनी मुद्रीका व इतर सत्यशोधक विवाह प्रित्यर्थ जमलेल्या महापुरूषांचे, शैक्षणिक, सामाजिक, ग्रंथ वाटप तसेच फुलं, फळं व इतर झाडे वाटप सोय करावी. जेणेकरून वाचन संस्कृती, ज्ञानसंवर्धन आणि पर्यावरण यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न करणे.

वधू-वरांचे स्वागत स्टेजवर स्थानापन्न झाल्यानंतर मान्यवर ज्येष्ठ व्यक्तीने वधू वरांचे स्वागत करून त्यांचे व मान्यवरांच्या हस्ते महापुरूषांच्या फोटोंना हार घालावे. * प्रस्तावना - समारंभाच्या प्रस्तावनापर भाषणात सत्यशोधक विवाह पद्धत्ती मागील पार्श्वभूमी, तात्त्विक व सामाजिक भूमिका इत्यादी सविस्तरपणे मांडणे आवश्यक आहे. हे काम कोणीही सत्यशोधक मंडळी करू शकतात. * वधू-वरांचा परिचय - यात दोघांच्या कुटुंबाविषयी थोडक्यात माहिती तसेच वधू-वरांचे व्यक्तिगत, शैक्षणिक पात्रता व्यवसाय नोकरी, इत्यादी माहिती व वधुवरांचे सामाजिक विचार व कार्य हे काम वधू- बराकडील कोणीही सुज्ञ व्यक्ती, नातेवाईक व मित्र करू शकतो. * प्रत्यक्ष विवाह विधीस सुरूवात - पुरोहिताचे काम कुणीही सुशिक्षित स्त्री-पुरुष करू शकतो. तसेच कोणत्याही जाती धर्माची व्यक्ती हे काम पुढील सत्यशोधक विवाह पद्धतीने तसेच गरज पडल्यास त्यात थोडा फार बदल करून बेळेनुसार लावू शकतात. * मंगलाष्क - महात्मा फुले यांनी रचलेल्या वधुवरांच्या मंगलाष्क्क वधू-वरांनी न म्हटल्यास इष्ट मित्राने मदत करावी एकूण चार मंगलाष्टक झाल्यानंतर शेवटची पाचवी मंगलाष्टक झाल्यावर वधू वरांनी एकमेकांना हार

घालावे. (अंगठी, मंगळसूत्र वेळेनुसार) आणि सर्वांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करावी. ✻ वधू–वर प्रतिज्ञा वधू–वर यांनी आपल्या जोडीदाराचा स्विकार करून भावी आयुष्य सुखा समाधानाने भांडण तंट्याखेरीज व्यतीत करणे तसेच आई–वडील, सगेसोयरे, नातेवाईक यांचा मानसन्मान राखून सहजीवनाची सुरूवात करीत आहे. त्याच्या पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा आहेत त्या वदवून घेणे. ✻ मान्यवरांच्या हस्ते विवाह झाल्याचे प्रमाणपत्र तसेच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देणे. विवाहास उपस्थित असलेले सामाजिक कार्यकर्ते, नेते, दृष्ट आप्त मित्रांनी सत्यशोधक विवाह संबंधी प्रतिक्रिया, भाषण करायला हरकत नाही. ✻ बघू किंवा वराने आपले मनोगत व्यक्त करावयाचे असते. ✻ आभार प्रदर्शनाचे काम वधू–वरांच्या पालकांनी करावे. अल्पोपोहार/ भोजन वगैरे.

खालीलप्रमाणे साधी सोपी पद्धत सर्व समाजाने विवाह प्रसंगी अंमलात आणावी.

(माझे (विधीकर्ता) सोबत पाठोपाठ बधु–वरांनी म्हणावे)

अ. सत्यशोधक वंदन –

१. शेतकरी राजा बळीराजाला बंदन करतो, आम्ही दास्यप्रथा मोडणाऱ्या महागौतमास वंदन करतो, आम्ही स्वराज्य संस्थापक जिजामाता व छत्रपती शिवरायास वंदन करतो. आम्ही सत्यशोधक जोतीराव फुले व सत्यशोधक सावित्रीबाई फुले यांना आम्ही वंदन करतो, आम्ही सत्यशोधक शिक्षिका फातीमाबींबींना वंदन करतो, आम्ही बहुजन नायक राजर्षी शाहूंना वंदन करतो, आम्ही राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वंदन करतो, स्वातंत्र्य व समतेसाठी झगडलेल्या ज्ञात अज्ञातांना नायकांना वंदन करतो.

यानंतर वधु–वरांनी एकमेकांना अंगठी घालावी.

२. आता माझे सोबत सर्वांनी पाठोपाठ महात्मा फुले रचित 'सत्याचा अखंड' सर्व उपस्थित सत्यजनांमार्फत म्हणावा.

''सत्याचा अखंड''

सत्य सवांचे आदीघर ।। सर्व धर्माचे माहेर ।।धृ।।
जगामाजी सुख सारे ।। खास सत्याची ती पोरे ।।१।।
सत्य सुखाला आधार ।। बाकी सारे अंधकार ।।२।।
आहे सत्याचा बा जोर ।। काढी भंडाचा तो नीर ।।३।।
सत्य आहे ज्याचे मूळ ।। करी धुर्ताची बाराळ ।।४।।
बळ सत्याचे पाहुनी ।। बहुरूपी जळे मनी ।।५।।
खरे सुख नटा नोव्हे ।। सत्य ईशा वर्ज्य पाहे ।।६।।
जोती प्राथी सर्व लोका ।। व्यर्थ डंभा पेटू नका ।।७।।

यानंतर फुलांच्या पाकळ्यांचे वाटप उपस्थितांना करावे आणि वधू–वरांना आईवडिलांना नमस्कार करण्यास सांगावे आणि विवाहाच्या पहिल्या मंगल ओर्वींचे गायन करावे.

'पहिले आमचे नमन, पालनकर्त्या माय बापांना
कष्ट हाल सोसून, शिकवले आम्हाला'
सत्यशोधक विवाह, आपण येथे करूया
समतेचे स्वप्न हो, मनी आपल्या धरू या

विधीकर्ते दोघेही आजपासून आपल्याला साक्षी ठेवून सुरूवात करत आहेत. वधु–वराला म्हणणं आहे.

'अभिवचन दे मला सत्यशोधक राहशील,
भांडण–तंट्याखेरीज आयुष्य हे जाईल

विधीकर्ते–आता वराने लक्षपूर्वक ऐकावे आयुष्यभर दोघांनी सत्याच्या मागनि जायचे आहे. तुटले इतक ताणायचं नाही.

दोघांच्या मतांनी, संसार करू या
समतेनं, ममतेनं, प्रेमाने राहूया !!

विधीकर्ते कोणताही जात धर्म आयुष्यात न करता

प्रेमाने राहण्याचा संकल्प दोघांनी केला आहे. यानंतर सत्यशोधक शपथविधी सोहळा –

यानंतर सत्यशोधक विधीकर्त्याने आशीर्वाद पर अखंड म्हणावा.

विधीकर्ता

स्त्री पुरुष सर्व कष्टकरी व्हावे
कुटुंब पोसावे आनंदाने आनंदाने
नित्य मुली मुलांशाळेत घालावे
अन्नदान द्यावे विद्यार्थ्यांस ।।
सार्वभौम सत्य स्वतः आचरावे ।
सुखी वागवावे पंगू लोका ।।
अशा वर्तनाने सर्वा सुख द्याल ।
स्वतः सुखी व्हाल । जोती म्हणे ।।

२) मंगलाष्टक

(वर)

निर्मिकाचे नियमांप्रमाण धरूनी, चाले तुझे कूळ गे ।।
सत्याने अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच हे त्वत्संगे ।।
अज्ञान्या समदृष्टीने शिकविशी, तू ज्ञान त्या दाविशी ।।
प्रीतीने वरितो तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी ।।
सत्य शुभमंगल सावधान ।।१।।

(वधू)

मानीशी जरि त्वां दिले, अनुतिर्नी कर्त्या समाधानसे ।।
आम्हा सर्व स्त्रियां असे बहु पिडा, हे नेणाशी तू कसे ।।
स्वतंत्र्यानुभवाचि ओळख आम्हा, झाली नसे मानसीं ।।
यासाठी अधिकारी देशिल स्त्रियां, घे आण त्याची अशी।।
सत्य शुभमंगल सावधान ।।२।।

(वर)

स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा ।।
खर्चाया मर्नि भी न मी किमपिही, सर्वस्व माझें कदा ।।
मार्नीतो सकला स्त्रियांस बहिणी, तूं एकली मत्प्रिया ।।
कर्त्याचें भय मी मनात तुजला, ठेवीन पोसावाया ।।
सत्य शुभमंगल सावधान ।।३।।

(वधू)

बंधुवत्मजला समस्त असती, त्वदभिन्न जे कीं नर ।।
आज्ञाभंग तुझा करीन न कदा मी सत्य कर्त्यावर ।।
ठेवोनी अवघाचि भर झटुया, लोकां कराया हिता ।।
हाताला धरूनी तुला वरितसे, सर्वापुढे मी अतां ।।
सत्य शुभमंगल सावधान ।।४।।

सर्व स्त्रीपुरुषांनी म्हणावयाचे

आभार बहु मानिजे आपुलिया, मातापित्यांचे सदा ।।
मित्रांचे तुमच्या तसेच असती, जे इष्ट त्यांचे वदा ।।
वृद्धा पंगु सहाय्य द्या मुलिमुलां, विद्या तया शीकवा ।।
हर्षवृष्टिकरा फुलांची अवघे, टाळी अतां वाजवा ।।
सत्य शुभमंगल सावधान ।।५।।

३) उपस्थितांनी वधु–वरांना पुष्पवृष्टी करावी. वाद्य/टाळ्यांच्या गजरात विवाहितांचे अभिनंदन करावे.

४) सत्यशोधक शपथविधीनंतर वराने वधुला व वधुने वराला पुष्पहार अर्पण करावा.

५) प्रतिज्ञा (वर–वधु यांनी प्रतिज्ञा घ्यावी.)

प्रतिज्ञा वधु/वर

मी.........तथागत गौतमबुद्ध, विश्व सम्राट बळीराजा, बहुजन छत्रपती शिवाजी महाराज, सामाजिक क्रांतीचे जनक सत्यशोधक महात्मा फुले, भारतीय स्त्री शिक्षणाच्या आद्यप्रणेत्या सत्यशोधक ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, सामाजिक न्यायाचे जनक छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच पंडिता रमाबाई, न्वायमुर्ती रानडे, यांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करून आईवडिलांच्या व सर्वांच्या साक्षीने आज दिनांक रोजी................ येथे आम्ही या सत्यशोधक विवाह प्रसंगी प्रतिज्ञा घेते/घेतो की,

१) मी ......... हिचा/यांच्याशी महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेल्या सत्यशोधक पद्धतीने विवाह करून जीवनसाथी म्हणून स्विकार करीत आहे.

२) मी यापुढे तुमच्या स्वतंत्र व्यक्तीमत्त्वाचा आदर करीन, व्यक्तिगत- कौटुंबिक सार्वजनिक जीवनात अखंडपणे समतेचे परस्पर सहकार्याने वागेन व बागवेन आणि तुझ्या/तुमच्या सर्व सुखदुःखात सहभागी होऊन तुला/तुम्हाला सदैव सुखी ठेवेन.

३) व्यक्तीगत कौटुंबिक सार्वजनिक जीवनात अखंडपणे समतेने परस्पर सहकार्याने वागेन व वागवेन

४) मी तुमच्या सर्व सुख-दुखात सहभागी होऊन तुम्हाला सदैव सुखी ठेवेन.

५) मी अंधश्रद्धा मानणार नाही आणि फुले दांपत्यांची शिकवण आत्मसात करेन.

६) मी माझ्या पतीसाठी / पत्नीसाठी धम्मेण, अर्थेण, कामेण या तत्वांची परिपूर्ती करेन.

७) मी कुटुंबाची व समाजाची मानहानी होईल असे कोणतेही गैर कृत्य करणार नाही.

८) मी व माझे पती/पत्नी फक्त फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांशी एकनिष्ठ राहूनच आनंदाने संसार करेन/करीन व येणाऱ्या पिढीला त्यांचीच शिकवण देईन.

९) निर्मिकाच्या व सर्वांच्या साक्षीने आम्ही दोघे पती-पत्नी म्हणून आजपासून कौटुंबिक जीवनाला प्रारंभ करीत आहोत.

सत्यकी जय हो। जय जोती । जय क्रांती ।

*भूक आहे तेवढे खाणे ही प्रकृती,*
*भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणे ही विकृती,*
*आणि वेळप्रसंगी स्वत: उपाशी राहून,*
*दुसऱ्याची भूक भागवणे ही संस्कृती.*

## ❖ माथा ❖

बाप रांगडा रांगडा
त्याच्या हातात पाभरं
बीजं पेरतो नव्याने
फुलवितो हे शिवार....

बाप रांगडा रांगडा
त्याच्या हातात फावडं
पाणी कमी पडे तेंव्हा
घेतो खांद्याव कावडं ....

बाप रांगडा रांगडा
त्याच्या हातात कुदळं
कुदळतो तो आयुष्य
मनी उठते वादळं ....

बाप रांगडा रांगडा
त्याच्या हातात खुरपं
खुरपतो तो देहाला
होते पायाला कुरूप....


बाप रांगडा रांगडा
घेतो हातात शिवळं
दोन बैलांना जुंपतो
आहे आतून मावळं....

बाप रांगडा रांगडा
हाती घेतो जेव्हा दोर
भीती वाटते जीवाला
मना लागतोया घोर....

बाप रांगडा रांगडा
त्याच्या हाती आहे विळा
विळा लागे जो मानेला
भोगी मरणाच्या कळा....

बाप रांगडा रांगडा
हाती घेतो जेव्हा गाथा
बापाकडे पाहताना
झुकतोया माझा माथा....

**श्री.परशुराम लडकत**
मो. नं.८१४९४७४९६१



# बायको, ब्रेकिंग न्यूज आणि न्यूटनचा सिद्धांत

**सुरेशचंद्र वाघ**
फ्लॅट नं. ४०३/४०४, सिल्व्हर ओक, रहेजा विलोवज,.
महिंद्रा गेट नं. ४ जवळ, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व),
पिन ४००१०१ मो.: ९२७००६४०५६ (फक्त व्हॉटसअॅप)
ईमेल : sureshchandrawagh@gmail.com




आजकाल मीडियावर चोवीस तास ब्रेकिंग न्यूज चालू असतात. मला वाटते चोवीस तास तोंडपट्टा चालू असणाऱ्या बायकोशीच त्यांची बरोबरी होऊ शकते. ब्रेकिंग न्यूजमध्ये तीच तीच न्यूज दर दहा मिनीटांनी दाखवतात. बायकोही दर दहा मिनिटांनी तीच तीच बडबड करीत असते. या न्यूजमध्ये खरं तर ब्रेकिंग असं काहीच नसतं. तुमचं लक्ष वेधण्यासाठी चाललेला आटापिटा असतो. बायकोच्या बोलण्यातही दम नसतो. पण तुम्ही मिचं ऐकावं लक्ष वेधण्यासाठी तिचा आटापीटा चालू असतो. साध्या बातम्यांना कव्हरेज द्यायला मीडियावाल्यांना वेळच नसतो. बायकोलाही साध्या भाषेत बोलायला वेळ नसतो.

बायकोचे टुमणे चालू असले आणि तुम्ही दुर्लक्ष करत असाल तर टोमणे मारायला सुरुवात करते. टोमण्यांना टोलवायचा प्रयत्न केला तर ती थेट टोचून बोलायला लागते. टोचूनही आपण निर्ढावल्यासारखे वागलो तर ती ''टो'' वरून ''ठो'' वर म्हणजे ठोस्यांवरही येते.

बायकोला सर्वात जास्त टी.आर.पी, मिळवून देणारी ब्रकिंग न्यूज म्हणजे तिची ''माहेरी जाण्याची धमकी''. झूठ बोले कौवा काटे... साले कौवेसे डरियो... मै मायके चली जाऊंगी, तुम देखते रहियो... पणे हे फक्त सिनेमात असतं. प्रत्यक्षात बायको कधीही लाडाने गाऊन अशी धमकी देत नाही.

ती बॅग भरण्याचे नाटक करते असा माझा अनुभव आहे. खरे तर रोजच्या कपड्यांच्या घड्याच ती घालत असते. आदळआपट करताना कपबशांचा आवाज वाढतो. पण त्या फुटणार नाहीत याची ती नक्कीच काळजी घेते.

नाश्ता बोगस करुन निषेध व्यक्त करणे हा यातलाच प्रकार असतो. जेवणातल्या भाज्या तिखट जाळ, वरणाची फोडणी देखील जळालेली, कढी असेल तर आंबट तुंबट, लोणच्याची फोड असेलच तर ती वाळलेली म्हणजे साल नसलेला बाठा, कच्चा अर्धवट भाजलेला पापड हा रुसल्याचा निशाणी अंगठा असतो. एखादा पदार्थ अळणी म्हणून मीठ मागावे तर ते संपले म्हणून जाहीर करते. राफेल व्यवहारात जशी लपवा छपवी झाली तसेच ही मिठाची दडवा दडवी असावी असा माझा दाट संशय आहे.

आज सकाळी सकाळीच स्मिताचं काहीतरी बिनसलं होतं. त्यामुळे ब्रेकिंग न्यूज दतच स्मिता म्हणाली, ''यावेळी मी माहेरी जाणार आहे दिवाळीला. फराळाचे अजिबात काही करणार नाही. लाडू, करंज्या, चकल्या, शंकरपाळ्या तुमचे तुम्ही बघा.''

''काय सांगतेस काय... तर मग ही दिवाळी धुमधडाक्यात साजरी करतो. फटाक्यांची जोरदार खरेदी करुन अॅटम बॉम्बचे बारच उडवतो. जया होऽऽऽ.'' आनंदात हसून मी म्हणलो ''यावर्षी बहुतेक साऱ्या मित्रांच्या बायका पण आपापल्या माहेरी जाणार

आहेत अशी युनायटेड न्यूज आणि पी.टी.आय.ची बातमी आहे. पत्त्यांचा अड्डा आपल्याच घरात लावतो, जय श्रीराम.''

ही जय श्रीराम म्हणण्याची वेळ नव्हती पण अलीकडे वेळी अवेळी कोणी कुठेही जय श्रीरामचा नारा देऊन दबाव आणण्याचा घाट घालतो. तसाच माझा अयशस्वी प्रयत्न.

दिवाळी जवळ आली की बायका नवऱ्याला ब्लॅक मेलिंग करण्याचा प्रयत्न करतात. विषय असतो दिवाळीची खास खरेदी. यात साडी असतेच. साडी म्हणजे अविभाज्य खरेदी असते. पण याशिवाय तिला आणखी काही बोनस हवा असतो.

''तुमच्या लाडली बहनाला दिवाळसणाची भाऊबीज भेट देणार असालच. पण बायकोला काय देणार आहात हे आधी स्पष्ट करा.'' स्मितानं धूर्तपणे प्रश्न विचारला.

''अगं लाडली बहना तशी तू लाडली बायको आहेसच.'' मी प्रेमानं म्हणालो.

'' ते लाडे लाडे अजिबात बोलू नका, मला दिवाळीसण काय देणार आहात ते सांगा.'' स्मिता म्हणाली.

''अगं मी सांगून काय उपयोग, मी सांगणार काचेच्या बांगड्या, तू मांगणार सोन्याच्या बांगड्या, असं उखाण्यात अडकवण्यापेक्षा काय हवं ते सांगून मोकळी हो ना.''

नाहीतरी मध्यम वर्गीय आपण रीन काढून सण साजरे करतो हे उघड सत्य आहे. बाजारात फायनान्स कंपन्या त्यासाठी टपूनच बसलेल्या असतात. मार्केटींगच्या नाड्या बायकोच्या हातात असतात. हे ओळखून हप्त्यावरच्या आणि ई.एम.आय. वरच्या नव्या नव्या स्किमस् बाजारात आणतात. मग पहिली महागडी वस्तू शेजारणीच्या घरात आणून टाकतात. ती पाहीली रे पाहीली की बायको आदळ आपट करायला लागते. याचा पुढला अंक म्हणजे आपल्या घरातही तसलीच वस्तू येते. आणि मग घरोघरी त्या वस्तू दिसायला लागतात.

आजकाल यूट्यूब, फेसबूकमध्ये देखील जाहिरातींचा संसार मांडलेला असतो. डिस्काउंटचा महापूर येतो. जाहिरात सादर करणारी युवती किंवा महिला त्या प्रॉडक्टचा महिमा असा काही चढवून सांगते की बायको लगेच ऑर्डर देऊन मोकळी होते. कॅश ऑन डिलीव्हरी. मग काय, तिचे मनी लाँडरींग केलेले पैसे ती तिथे वापरते.

मग स्मिता पी.एन.जी. किंवा रांका, चंदूकाका सराफ, लागू बंधू अशा ज्वेलर्सची नावे घेते. याचा अर्थ दागिन्यांची खरेदी करण्याचा भरगच्च दौरा होणार हा तिचा इरादा स्पष्ट असतो.

ठरल्या दिवशी नेमके मला वरिष्ठांनी ताबडतोब बोलावल्याने ऑफिसच्या कामासाठी निघावे लागते. माझा स्मिताला तसा काहीच उपयोग नसतो. त्यामुळे पडत्या फळाची आज्ञा तिच्या पथ्यावर पडते. होते काय पण... तिची दिव्य (खरं तर दिवटी) फास्ट फ्रेंड ''दिव्व्या'' नेमकी साडीच्या शॉपमध्ये तिला भेटते आणि त्यांची तिथे खरेदीची जुगलबंदीच सुरु होते. कोण किती श्रीमंत... एकमेकांवर मात करण्यासाठी दोघीजणी बाजार लुटून आणातात.

मी ऑफिसात जरी कामात व्यग्र असलो तरी माझ्या मोबाईलवर दर तासाला ब्रेकिंग न्यूजचे एसेमेस आणि इमेल यायला लागतात.

मी ऑफिसात सविस्तर बातमी सांगायलाच हवी. ''पेशवाई'' मध्ये उलगडलेल्या साड्यांच्या ढिगातून भरजरी साड्यांचे पदर अंगावर घेऊन ती मला सेल्फी मागून सेल्फी पाठवते.

''अहोऽऽऽ यातली कुठली पैठणी तुम्हाला पसंत पडतेय ते झटपट सांगा पाहू.''

मी आलेल्या सर्व सेल्फी वरखाली करीत झटपट करतो. वेळ मारुन न्यायची म्हणून मी तिला म्हणतो, ''ती अमुक तमुक घे. फारच छान. अगदी माधुरी दिक्षीत सारखी खुलून दिसतेस.'' ती फणकाऱ्यात लगेच व्हॉटसअॅप बंद करते. थोड्याच वेळात माझ्या खात्यातूनपस्तीस हजार रुपये कापल्याचा स्टेट बँकेचा ब्रेकिंग न्यूजचा मेल येतो. तिने तिसरीच कुठली तरी ''आसाम टसर'' साडी घेतलेली असते.

मग काय दर तासाला एक ब्रेकिंग न्यूज. आय.सी.आय.सी.आयच्या खात्यातून लागू बंधू ज्युवेलर्स मधल्या खरेदीचे लाख रुपये कापल्याचे कळले. बाजीराव मस्तानीतील दीपिका पदुकोनच्या कानातल्या सारख्या इयरिंग्ज तिने खरेदी केलेल्या असतात. डोळे फाडफाडून मी ऐसमेस वाचतो. तोंड दाबून बुक्क्यांचा मार काय करणार. दात ओठही खाता येत नाहीत कारण आपलेच दात नि आपलेच ओठ.

पुढे पी.एन.जीमधून ''सुईदोरा'' घेतल्याचा मेसेज होता. या ब्रेकिंग न्यूज अशी की माझ्या अॅक्सिस बँकेतील खात्यातून पन्नास हजार कापल्याचे कळवण्यात आले होते. आता सराफाकडून सुईदोऱ्यासाठी एवढी मोठी रक्कम मोजावी लागली ह्याचा उलगडा मला काही होत नव्हता. सोन्याची सुई असावी आणि चांदीच्या दोऱ्याने ओवलेला दागिना असावा असा माझा समज. झाकली मूठ सव्वा लाखाची.

पुढील ब्रेकिंग न्यूज ब्युटी पार्लरमध्ये केलेल्या हेयर स्टाईलची. माझ्या जनता सहकारी बँकेच्या खात्यातून झालेली वसूली. एकूणच बिंदी पासून मेंदीपर्यंत, मेकपच्या तऱ्हेतऱ्हेच्या क्रिम्स, फेशियल पॅक्सचा बाजार करताना दुर्गेपुढे बकऱ्यांचा बळी पडावा तशी माझ्या वॉलेटमधली सारी डेबिट, क्रेडिट कार्डस् बळी पडत होती. आणि एसेमेस, मेलने ब्रेकिंग न्यूज मोबाईलमध्ये येऊन धडकत होत्या. माझ्या सर्व बँक खात्यातील सुफडा साफ झाला.

अशा ब्रेकिंग न्यूजमुळे मेंदूचा भुगा होणार नाही तर काय. यावर उपाय आहे कां. याचा मी विचार करीत होतो. योगायोगाने असाच भुगा झालेल्या एका मित्राची नि माझी गाठ पडली. ''फ्रेंड इन नीड इज ए फ्रेंड इंडीड'' ही म्हण उगाच नाही. त्याची बायको जळी स्थळी काष्ठी पाषाणी त्याच्या सासरकडच्यांचा उद्धार करीत होती, सासूचा उद्धा...ब्रेकिंग न्यूज. नणंदेचा उद्धार...ब्रेकिंग न्यूज. दिराचा उद्धार...ब्रेकिंग न्यूज. मावस सासू... आत्ये सासू. सर्व प्रकारच्या सासवा, मावश्या... मावस मावश्या... यांचा उद्धार...ब्रेकिंग न्यूज. या साऱ्यांना कंटाळून मित्राने समुपदेशकाचा सल्ला घ्यायचे ठरवले. आणि गोळी बरोबर बसली की... समुपदेशकाने त्याला न्यूटनचा सिद्धांत सांगितला. अॅक्शन इक्वल टु रिअॅक्शन. प्रत्येक क्रियेला समान आणि विरुद्ध प्रतिक्रिया असते.

समुपदेशकाने मित्राच्या बायकोच्या माहेरच्यांची यादी तयार करुन आणायला सांगितली. त्यांचे नाते, त्यांचे स्वभाव, त्यांचे उद्योग, त्यांचे विचार, आचार यांची संपूर्ण माहिती गोळा करुन त्याचा चार्ट तयार केला. मग प्रत्येक नातेवाईकांची स्तुती करणारे डॉयलॉग्ज लिहून दिले. रोज एका नातलगांची स्तुती करायची आणि पाठ केलेला डायलॉग म्हणायचा. याचा परिणाम इतका चांगला झाला की बायकोने सासरच्यांचा उद्धार करायचे थोड्याच दिवसात थांबवले.

आता माझा प्रॉब्लेम वेगळाच होता. खरेदीच्या नावाखाली माझी बँक खाती रिकामी होत होती त्याने मी खूप त्रस्त होतो. बरं सासऱ्यांनी पण काही हुंडा दिला नव्हता. माझाच पैशांचा हंडा मोकळा होत होता. मित्राच्या सल्ल्यानुसार मी त्याच्याच समुपदेशकाकडे गेलो. म्हटले मलाही न्यूटन नाही तर आइन्स्टाईनचा सिद्धांत पचनी पडून स्मिताच्या खर्चांना कात्री लागेल.

समुपदेशक श्री. आगलावे यांच्यापुढे मी माझी कैफियत मांडली. त्यांनी मला सर्व बँक खात्यांची यादी मागितली. खाते क्रमांक, खात्यातील गेल्या तीन वर्षांचे

स्टेटमेंट, चालू आर्थिक वर्षाचे भरलेले आयटी रिटर्न माझ्या आधार कार्ड आणि पॅन कार्ड, रेशन कार्डची झेरॉक्स, सर्व क्रेडिट, डेबिट कार्डसची इथंभुत माहिती, प्रॉपर्टी ॲसेटस्‌ची माहिती. प्रॉपर्टी टॅक्सच्या पावत्या. बापरे ऽऽऽ ही एवढी माहिती कशाला हवी याला.

म्हणजे इन्कम टॅक्स, ईडी, सीबीआय यांना माझी माहिती कळवून मला ब्लॅकमेल तर करणार नाही ना हा. व्हायचं असं की बायको ऐवजी हाच मला एखाद्या व्यवहारात फसवून लुटायचा. हे आगलावे आधी आग लावून देतात आणि मग आग विझवून देतात असा माझा ग्रह होणे साहजिकच होते.

'' सर, ही एवढी माहिती तुम्हाला कशाला हवी. मी काही धनाढ्य उद्योजक नाही. साधा पगारी नोकर आहे. वेळच्या वेळी इमाने इतवारे आयकर भरणारा पापभिरु आहे. ना कुणाच्या आध्यात ना मध्यात.'' मी म्हणालो.

''मिस्टर धनेश, बायकोला वय विचारू नये आणि नवऱ्याने पगार सांगू नये असं म्हणतात. पण तुम्ही इथेच घोडचूक केली. बायकोला अलिबाबाची गुहाच उघडून दिली. सर्व माहिती बायकोला दिल्याने तुम्ही असे उघडे पडलात. आता माझा सल्ला हवा तर सर्व डेटा गोळा करुन तोडगा तयार करणे हे माझं काम आहे. रोगनिदान करायचं तर डॉक्टरला सर्व तपासण्या करायला लागतात. तसंच समुपदेशक म्हणून मला सॉफ्टवेअरमध्ये तुमची माहिती भरावी लागेल. त्यातूनच मग ऑनलाईन तोडगा सुचवला जाईल.''

पहिली कन्सलटेशन फी एक हजार रुपये मोजावी लागली. आलिया भोगासी असावे सादर... दैवावर भार ठेवोनिया. त्यांनी मागितलेली सारी माहिती कागदपत्रांसहित नेऊन दिली. चार दिवसांनी मला आगलाव्यांनी भेटायला बोलावले.

मी त्यांच्याकडे मोठ्या दडपणातच गेलो. कोणता उपाय सुचवतात या विचारांनी मी काळजीत होतो. मनात नको नको ते उपाय येत होते. काही समुपदेशक देवर्ष्यासारखे अघोरी उपाय पण सांगतात असे ऐकले होते. बायकोवरुन लिंबू मिरच्या ओवाळून टाकणे, उलट्या परांची कोंबडी कापणे किंवा बोकड कापणे. देवीला रेडा कापतात तसं बायकोपुढे रेड्याच्या बळी देणे.

संकटात असताना सुटका करुन घेण्यासाठी मनुष्य वाटेल ते उपाय करायला एका पायावर तयार असतो.

आगलावे म्हणाले, '' तुम्हाला न्यूटनचा जडत्वाचा पहिला नियम माहित आहे का ? ''

''नाही...'' मी नंदीबैलासारखी मुंडी हलवली. लग्नानंतर बायकोचे नियम पाळण्याची इतकी सवय झाली की बाकी सारे नियम... नियम बाह्य झाले.

''ठीक आहे. समजावून घ्या.'' आगलावे म्हणाले, ''बाह्य बल लावल्याशिवाय स्थिर असलेली वस्तू स्थिर राहते आणि गतिमान असलेली वस्तू स्थिर वेगाने सरळ रेषेत गतिमान राहते. ''

''सर, बायकोची बडबड सुरु झाली की स्थिर मेंदू गतिमान होतो. ब्रेक लावणे अशक्य होते.'' मी डोके गच्च धरुन साभिनय म्हणालो.

''अगदी बरोबर... आपल्याला बल देऊन ही गती रोखायची आहे. थोडक्यात आपल्याला शून्य गुरुत्वाकर्षण कक्षेत शिरायचं आहे. याला वजन विरहित अवस्था म्हणतात.''

''म्हणजे सुनिता विल्यम्स जशी सध्या अंतरात गेली आहे तसे माझ्या बायकोला वजनविरहित अवस्थेत नेऊन ठेवायचंय की काय ?'' मी विचारले.

''नाही... तुमची सर्व बँक खाती शून्यात नेऊन ठेवायची. खात्यातले व्यवहार आपोआप थांबतील. म्हणजे तुमच्या बायकोला त्यांचे गुरुत्वाकर्षण वाटणारच नाही.''

'' पण हे कसं शक्य आहे सर... ती फार चतूर आहे.

खिसे तपासते तसं माझे वॉर्डरोब, ड्रॉवर्स धुंडळणारच.''

''तसे काही होणार नाही. माझ्याकडे प्लॅन ए, प्लॅन बी सारे तयार आहेत. तुम्ही फक्त मी सांगतो तसं नाटक वठवासचं बस्स''

आगलावेंनी फॉलोअप फी म्हणून वीस हजार रुपये घेतले. मला सर्व प्लॅन समजावून सांगितला.

मी माझ्या सर्व खात्यातील पैसे काढून घेतले. सर्वत्र झीरो बॅलन्स केला. एबीसी बँकेत नवे खाते उघडून सारी रक्कम त्यात जमा केली.

दुसऱ्या दिवशी माझ्या घरी ईडीची धाड पडली. पाठोपाठ आयकर अधिकारी येऊन धडकले. मग सी.बी.आय. आली. घराची त्यांनी झाडाझडती घेतली. त्यांनी बँक खात्याची सर्व पासबुक्स आणि क्रेडिट कार्डस् जप्त करुन चौकशीसाठी ताब्यात घेतले. अर्थात ठरल्याप्रमाणे रिकामी सापडली. बाकी चौकशी चालू आहे. मी जामिनावर आहे.

त्या दिवसापासून आजतागायत स्मितानं जी धास्ती ती एकदम वजन विरहित अवस्थेत असते.

माझे एबीसी बँकेतील घर खर्चाचे फक्त आवश्यक व्यवहार ऑनलाईन होतात. त्यातले ''ओ की ठो'' तिला समजणार नाहीयांची मी सर्वतोपरी काळजी घेतो. हे खाते ईडीच्या अधिकाऱ्यांना माहीत आहे. मित्रहो... आलेले ईडी, आयकर आणि सी.बी.आय.चे अधिकारी म्हणजे महाराष्ट्राच्या हास्यजत्रेतील कलाकार होते. आपापली भूमिका छानपैकी वठवून गेले.

सध्या तरी स्मिताचे ब्रेकिंग न्यूज थांबले आहे.

---

ही दिवाळी तुमच्यासाठी नवीन संधी,
नवीन यश आणि नवीन स्वप्न घेऊन येवो.
तुम्ही ताऱ्यासारखे आणि
हिऱ्यासारखे चमकावे हिच सदिच्छा !
दिवाळीच्या शुभेच्छा!

## ❖ गाठणं ❖

दूरची शेतं ओलांडून शाळेत पोचलो
बाहेर उभं राहून, वर्गात बसल्यावरही चालतच राहिलो
प्रार्थनेला मागं, साफसफाईला पुढं सरलो
काट्याकुट्याचे संदर्भ शिकताना
पायातले काटे ठसठसले
हुबेहूब वर्णनातनं भेटवलं
शिक्षक, आईवडील, शाळा, पिकं, दोस्तांना

वरच्या वर्गात जातजात बाहेरगावी निघून गेलो
इकडं आई म्हणलं की तिकडं उचक्या लागल्याआईला
बाबांनी मारलेल्या हाका ऐकू आल्या
बक्षीसं घेताना शाळा, गाव अभिमानानं उच्चारलं
ओढा, दगडगोटे, शेवाळं येत राहिलं स्वप्नात
पोटदुखी, पानफुटीसह जडीबुटीचे संदर्भ जुळवले वारंवार
पाणी खराब झाल्याच्या तक्रारी ऐकल्या नदीच्या
ढाब्यावरच्या ताटात ओळखीचे मासे बघून
भूकमोडीचं कारण सांगितलं नाही

दूर, खूप दूर संधींनी बोलवलं
किती निरोपानंतर निघालो माघारी
तर घरापर्यंत अवघं पालटलेलं सगळं
अंगणात वलणीवर जुने तुणलेले विरलेले तेच कपडे
एकेका रूपायासाठी तीच घासाघीस
सामानाची तशीच काटकसर
भूक लागली असेल जाणणारी तीच आस्था
तेच विचारणं, बरं चाललंय का नव्या ठिकाणी
बराय का पैसापाणी.
माघारी फिरताना, सुखात रहाण्याचे हळवे आशीर्वाद
मग गाठलेलं ठिकाण गाठणं
जत्रेत हरवणं, कधीही न सापडणं

नंतर एकटं पडत गेल्याच्या गोष्टीच गोष्टी

- कल्पना दुधाळ
मु.पो. बोरीभडक, ता.दौंड
जि. पुणे. ४१२२०२, मो.९९२३६२७२१८



# जय जोती

**पदमाकर वाघमारे**
संस्थापक, अध्यक्ष
माळी सेवा संघ, महाराष्ट्र
मो.: ९४०५६१३४८५

माळी समाजाची परिस्थिती काल, आज आणि उद्या याविषयी बोलणार आहोत. माळी समाजाचा जर इतिहास पाहिला तर आपण सर्वांना गरजेच्या असणाऱ्या पोषक गोष्टी पुरवणारे आलुतेदार आहोत आणि त्यामुळे प्रत्येक गावामध्ये, शहरामध्ये आपले घर आणि जमीन आपल्या वाड-वडिलांपासून गावकरी आहेत. ज्या आता काही प्रमाणात आपणाला आढळतात. भारताच्या इतिहासामध्ये ज्या विकासाच्या गोष्टी घडल्या त्यामध्ये आपली महत्वाची भूमिका आहे हे निश्चित.

माळी जात शेतीवर आधारित असलेल्या व्यवसायावर उपजीविका भागवणारी होती आणि आजही आहे. साधारणतः माळी समाजाच्या फुलमाळी, फुले, हळदीमाळी, जिरेमाळी, मिरेमाळी, कासेमाळी, काचा, कडू, बावने, अध्दप्रभू, मरार, मराळ, कोसरे, गासे, वनमाळी, वडवळ, सगर, चौकळशी, पाचकळशी, सोमवंशी, पाठारे, क्षत्रिय, सास्टिकर, उंडेमाळी, लिंगायत माळी या जवळपास ९६ जाती त्या त्या कामावरून निर्माण झालेल्या आढळतात. गावातील मंदिरांना फुले पुरवणे, राजाचे मळे सांभाळणे, उत्तम दर्जेदार भाजीपाला पिकवणे यामुळे माळी समाज नेहमीच सर्वांच्या जवळ सहवासात राहिला आणि विश्वासास पात्र ही झाला. आपल्या मळ्यात व्यस्त असणारा माळी समाज नेहमीच व्यसन, भांडण-तंटा यापासून दूर राहिला आणि त्यामुळे आज सुद्धा आपल्या समाजामध्ये व्यसनाचे व हिंसाचाराचे प्रमाण फार कमी दिसते. इंग्रजांनी सुद्धा 'माळी समाज शांत आणि कष्टाला महत्व देणारा समाज आहे' असे वर्णन केले आहे. संत शिरोमणी सावता महाराज, क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले, क्रांतीजोती सावित्रीबाई फुले, नारायण मेघाजी लोखंडे यांचा वारसा आपणाला आहे. राजकीय अस्तित्व फार कमी प्रमाणात आहे पण भक्कम आहे.

आता आपण २०२४ मध्ये आहोत आपली संख्या राज्यामध्ये ८ टक्के आहे. आता आपली परिस्थिती आणि अवस्था काय आहे असा जर प्रश्न पडला किंवा कोणी विचारला तर आपण काय उत्तर देणार.....? आपला समाज बऱ्याच पैकी शिकलेला आहे, आपण शिकत आहोत, पुढील पिढी ही शिकणार आहे. यात शंका नाही. शिक्षण हे अंत्यत महत्वाचे आहे ते मिळालंच पाहिजे तेही उत्तम दर्जाचे.... क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांनी जो संकल्प केला तो आपण खऱ्या अर्थाने आपण पूर्ण करत आहोत असे म्हणालो तर ते वावगे होणार नाही. पण तरीही अजून आपण खूप मागे आहोत. आपले खूप प्रश्न अपूर्ण आहेत ज्यांची उत्तरे कोणीही द्यायला तयार नाही. आपण कधी विचार केला आहे का? आपण ज्या जातीमध्ये जन्म घेतला त्याचा इतिहास काय आहे? का फक्त माळगणांनी सांगितलेले कुळ एवढंच लक्ष्यात ठेवायचं..? तर, असं नाही, आपणाला भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या तिन्ही काळाचा विचार करावा लागेल.

भूतकाळ तर घडून गेला मग त्यामधून आपण काय शिकलो ? मला असं वाटत यातून आपल्या पूर्वजांची जिद्द, चिकाटी, मेहनत आपण लक्ष्यात घ्यायला हवी. वर्तमानकाळात आपण जगतो आहोत खरे पण, आताची आव्हाने, धावपळ, आर्थिक उत्पन्न वाढवणे, स्वतः कर्तृत्व निर्माण करणे, एक चांगले आयुष्य जगण्यासाठी

रस्सीखेच या व अशा अनेक गोष्टीमध्ये आपण व्यस्त आहोत. पण यामध्ये आपण एक विसरून जात आहोत ते म्हणजे सामाजिक जबाबदारी. कदाचित आपणाला असे वाटेल आम्ही काय जवाबदारी विसरलो का? आम्ही तर सर्वांच्या सुखात दुःखात जातोय, पारिवारिक नाते संबंध जोपासतोय, इतरांना मान सन्मान देतोय. तर आपलं खरं आहे, आपण हे नक्कीच करतात. पण यापेक्षाही अजून काही सामाजिक प्रश्न आहेत ज्याकडे आपण डोळसपणे पाहणे आवशक आहे.

कधी असा विचारा केलाय का? जेंव्हा आपण सर्व समाजातील बांधवासोबत फिरतो त्यावेळेस त्या सर्वांमध्ये माझ्या समाजाचे काय स्टेटस आहे? हा समाज आपल्याकडे काय म्हणून पाहतो आहे? आपण अनेक जयंत्यामध्ये उत्साहाने सहभागी होतो, पण महापुरुषांची जयंती असेल तेंव्हा मी व माझा समाज कोठे असतो? दुसरा समाज आपल्या प्रमाणे आपल्याकडे येतो का? आज आपली राजकीय परिस्थिती काय आहे? आणि याला कोण जवाबदार आहे? का आपल्याला प्राधान्य मिळत नाही? का आपल्याला विचारात घेतलं जात नाही? जेंव्हा आपल्या एखाद्याला अडचण असेल, काही संकट असेल, काही प्रश्न असतील, समस्या असतील मग ती शिक्षणात असेल, नोकरीची असेल, वैद्यकीय असेल, शासकीय कार्यालयातील असेल किंवा अन्य कोणतीही समस्या असेल ! असा कोण आहे जो आपले हे सर्व प्रश्न सोडवू शकेल? असं कोण आहे ज्याच्याकडे आपण जाऊन आपल्या समस्या मांडू शकेन? तो आपल्यासाठी धावत- पळत येईल, आपल्यासाठी कोणाला फोन लावेल ! आपणाला आधार देईल ! मला असे वाटते याचे उत्तर ६० ते ७० टक्के नाही असेच असेल. मग तोच प्रश्न पुन्हा एकदा, याला जबाबदार कोण.... ?

आता राहिला भविष्यकाळ...! आपण काय म्हणून पाहतो भविष्य काळाकडे ? काय आहेत आपल्या अपेक्षा भविष्याकडून? माझे मुले शिकावे, चांगली परिस्थिती व्हावी, समाजात मान सन्मान मिळावा, एक चांगले आयुष्य जगायला मिळावे. (असा विचार असणे काही वाईट नाही, नक्कीच हा आपला अधिकार आहे आणि तो मिळाला पाहिजे.) पण हे सर्व करत असताना आपण सामाजिक जवाबदारी सुद्धा लक्ष्यात घेणे गरजेचे आहे. आपल्या मुलांप्रमाणे समाजातील गरीब घरचे मुले ही शिकली पाहिजेत, प्रशासनामध्ये आपले मुले असली पाहिजेत, शेती/उद्योग/व्यापार वाढला पाहिजे आणि तो दर्जेदार असला पाहिजे, संत शिरोमणी सावता महाराज यांचे अरण तीर्थस्थान बलस्थान बनवणे, आपले सामाजिक, राजकीय स्थान वाढणे गरजेचे आहे. इतर समाजाप्रमाणे आपणालाही मनाचे स्थान मिळणे आवश्यक आहे.


आता हे सर्व होणे शक्य आहे का? तर नक्कीच शक्य आहे. यासाठी सर्वात महत्वाचे आहे आपण स्वतः स्वतःला सांगितले पाहिजे 'मी माळी आहे आणि याचा मला अभिमान आहे.' आणि मग खऱ्या अर्थाने आपणाला समाजाकडे पाहण्याच्या दृष्टीकोन मिळेल. मला असे वाटते आपण सर्वजण कदाचित माझ्यासह असा कधी विचारच करत नाही की माझ्या कुटुंबाच्या नंतर मला माझ्या समाजाची काळजी घेणे गरजेचे आहे. (प्रत्येक समाजातील बांधव आपल्या समाजाची काळजी घेतचं असतात... एक कुटुंबं प्रमुख आपल्या परिवाराची काळजी घेतो तस आपण आपल्या समाजाची काळजी घेणे म्हणजे जातीवाद नाही हे लक्ष्यात घेणे गरजेचे आहे.) आपण आपल्यातील असणारे बांदाचे वाद, भाव-भावकीतील वाद, प्रॉपर्टीचे वाद, आप-आपसातील मतभेद, एकमेकांचे पाय ओढण्याची सवय हे व असे असणारे अनेक वाद आपण सोडवणे गरजेचे आहेत. पूर्वी गावातील वाद मिटवण्यासाठी जे पंच असत त्यात एकतरी माळी असायचा कारण माळी व्यक्तीने दिलेला न्याय हा निपक्षपात दिलेला न्याय आहे असे मानले जायचे. आपण एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होणे गरजेचे आहे, आपल्या मुलांना आपल्या जातीचा

इतिहास व संस्कार आपण समजावून सांगितला पाहिजे, घरामध्ये संत सावता महाराज, क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले, क्रांतीजोती सावित्रीबाई फुले, नारायण मेघाजी लोखंडे या महामानवांचे फ्फ़ोटो, पुस्तक असले पाहिजेत आणि ते मुलांना वाचता आले पाहिजेत, सार्वजनिक उत्सव, जयंती मोठ्या प्रमाणात साजऱ्या झाल्या पाहिजेत, संत शिरोमणी सावता महाराजांनी आपणाला आपल्या कष्टाने भगवंत कामात आहे हे दाखवून दिले तो आदर्श आपण घ्यावा, पुढे होऊन काम करणाऱ्या बांधवांना प्रेरणा आणि आर्थिक ताकत दिली पाहिजे, आपला वेळ आपण दिला पाहिजे, राजकारणात जो आपला उमेदवार किंवा प्रतिनिधी असेल त्यांना आपला ठाम पाठींबा असला पाहिजे, आपले आणखीन लोकप्रतिनिधी कसे वाढतील याकडे लक्ष दिले पाहिजे, लोक प्रतिनिधिनी आपल्या समाजाचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी लक्ष दिले पाहिजे. आपला कारभार निःस्वार्थ, पारदर्शक व प्रामाणिकपणे केला पाहिजे, एकमेकांच्या झालेल्या चुका आपण माफ्फ़ केल्या पाहिजेत. उद्योगामध्ये जो आहे त्याला सर्वानी साथ दिली पाहिजे अशा अनेक गोष्टी आहेत ज्या आपण जर पाळलो आणि प्रामाणिकपणे वापरलो तर मग तयार होईल एक सक्षम तरुण, समाज, नागरिक, शेतकरी, व्यापारी, राजकारणी.

मला आपणाला सांगायला आनंद वाटेल वरील सर्व तत्वे घेऊन माळी सेवा संघ, महाराष्ट्र व राज्य महिला आघाडी काम करत आहे. ही फक्त संघटना नाही तर विचारधारा आहे. जो समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन चालत आहे. एखाद्या राजकीय पक्षाला सुद्धा हेवा वाटावा असा हा परिवार आहे. यामध्ये माळी सेवा संघ, महाराष्ट्र अनेक वेगवेगळ्या विभागामध्ये काम करते. त्याच कारण आहे, समाजातील वेगवगेळ्या घटकांना काम करता आले पाहिजे आणि त्यांना न्याय मिळाला पाहिजे. यासाठी शेतकरी मित्र, पोलीस बांधव, डॉक्टर परिवार, विविध विभाग, मुख्याध्यापक विभाग, पेन्शर्न्स विभाग (हा सर्वात ऍक्टिव्ह विभाग आहे), वधू-वर परिचय विभाग, गुणवंत विशेष व्यक्ती विभाग व महाराष्ट्रातील एका सामाजिक किंवा कर्तव्य दक्ष अधिकाऱ्यास माळी समाजरत्न पुरस्कार, अधिकारी/कर्मचारी विभाग, कला विभाग, राजकीय विभाग, ओबीसी विभाग, संत सावता महाराज मंदिर विभाग, वारकरी विभाग, माळी मिशनसाठी योगदान आणि सर्वात महत्वाचे म्हणजे महिला आघाडी यांच्या वतीने महिलांचे प्रश्न, मेळावे, महिला दिन, महिला सक्षमीकरण, संक्रांतीला विविध उपक्रम राबवले जातात.

यावेळी मला आठवण येते कै. प्रा. दयानंद चोपणे सरांची. माळी सेवा संघ, महाराष्ट्राचे राज्य मार्गदर्शक म्हणून त्यांनी फार चांगले काम केले. आज ते आपल्यात नाहीत पण त्यांची जाणीव नेहमी राहील. माळी सेवा संघ, महाराष्ट्रचे सचिव आदरणीय भारत काळे साहेब व माळी सेवा संघांचे सर्व पदाधिकारी व महिला आघाडीच्या पदाधीकारी या सर्वांच्यामुळे माळी सेवा संघांचे काम वेगाने पुढे जात आहे.

चला तर आज पासून ठरवूया आपल्यातला माळी जागा झाला पाहिजे. आपल्या व देशाच्या प्रगतीत हातभार लागला पाहिजे. जे ही स्वप्न बघायचे ते मोठेच बघायचे आणि त्याला पूर्ण करण्यासाठी ताकत ही सर्वांनी मिळून तेवढीच लावायची. कधीच रडत बसू नका मला कोणी मदत केली नाही, कोणाचं आमच्याकडं लक्ष नाही, कोणाला आमची गरज नाही.... तुम्ही सुरुवात करा बाकीचे आपोआप करतील आणि एक महान समाज व एक महान राष्ट्र निर्माण होईल ! धन्यवाद...!





# पॉपकॉर्न ब्रेन सिंड्रोम

**डॉ. कारभारी रा. खरात**
एम.डी., डी.पी.एच., पी.जी.डि.एच.क्यू.एम.
वरिष्ठ सल्लागार, युनिसेफ, मुंबई महाराष्ट्र
मो.: ९५९७१११६२७

पॉपकॉर्न घ्या ! मेंदूचं पॉपकॉर्न !! करुन घ्या आपल्या मेंदूचं पॉपकॉर्न !!! स्वस्तात बनवून देतो तुमच्या मेंदूच्या लाह्या या आवाजाने सकाळची साखरझोप मोडली आणि बघतो तर काय, माझं स्मार्ट फोनुलं अलार्म वाजवायचं सोडून ओरडत होतं. पॉपकॉर्न घ्या, पॉपकॉर्न ! मी देखील मग उत्सुकतेने विचारलं, काय हुशारराव, हे आणखी काय नवीन काढलंत आज? हुशारराव म्हणताच स्मार्ट फोनुल्याची स्वारी एकदम खुशीत आली अन् म्हणाली, होय मी बनवतो तुमच्या मेंदूच्या लाह्या. कारण तुम्ही मला सतत हातात किंवा इअरफोननं जखडून ठेवला. रिल्स दाखव, सोशल मिडीयावर सतत काम कर अशा या ना त्या सूचना देऊन खूप काम करुन घेता. मग मी पण अति काम करताना वैतागतो आणि तुमच्या मेंदूचा पॉपकॉर्न बनवतो; वैद्यकीय परिभाषेत याला म्हणतात पॉपकॉर्न ब्रेन सिंड्रोम.

पॉपकॉर्न ब्रेन ही एक मानसिक अवस्था आहे. सन २०११ मध्ये वॉशिंग्टन विद्यापीठातील डेव्हिड लेव्ही या संशोधकाने या अवस्थेचे पॉपकॉर्न ब्रेन असे नामकरण केले. पॉपकॉर्न मक्याच्या लाह्या बनवताना गरम भांड्यात टाकलेले मक्याचे दाणे सतत तडतड उडत असतात, काही सेकंदही हे दाणे एका जागेवर स्थिर राहू शकत नाहीत. पॉपकॉर्न ब्रेन सिंड्रोममध्ये देखील असेच घडत असते. या मानसिक अवस्थेत अशा व्यक्तिचे विचार स्थिर राहत नाहीत. डोक्यातील विचार सतत काही सेकंदांनी बदलत असतात. अशा व्यक्ति आपले लक्ष एका वेळी एकाच विषयावर केंद्रित करु शकत नाही.

पॉपकॉर्न ब्रेन कशामुळे होतो? याची कारणमिमांसा जाणून घेणे महत्वाचे आहे. सध्याच्या संगणकीय तंत्रज्ञानाने आपल्या मेंदूवर फार मोठा प्रभाव टाकलेला आहे. डिजिटल जीवनशैलीचा सर्व भार वाहत असताना आपल्या मेंदूच्या, त्यातील विचार शक्तीच्या लाह्या म्हणजेच पॉपकॉर्न बनत आहेत. डिजिटल उपकरणांचा उपयोग करताना सोशल मिडीयाचा अतिवापर हे पॉपकॉर्न ब्रेन बनण्याचे प्रमुख कारण आहे. त्याचप्रमाणे संगणकावर (आणि त्याची भावंडे) काम करत असताना एकाच वेळी एकापेक्षा जास्त कामे करण्याची घाई (मल्टीटास्कींग) हे पॉपकॉर्न बनण्याचे आणखी एक महत्वाचे कारण आहे. डिजीटल माध्यमांतून मेंदूवर सतत माहितीचा भडिमार होतो. त्यामुळे मेंदू सतत उत्तेजित अवस्थेत राहतो व हळूहळू पॉपकॉर्न ब्रेनकडे वाटचाल होते.

व्हॉटस्‌अ‍ॅप, ट्विटर, फेसबूक, इंस्टाग्राम आदि विविध समाजमाध्यमे आपणास सतत त्यातध्ये खिळवून ठेवतात. ह्यामुळे आपल्या मनाची एकाग्रता नष्ट होते. आपण एका कामावर आपले लक्ष केंदित करु शकत नाही. सतत/जास्त वेळ ऑनलाईन राहिल्यामुळे दर काही मिनिटांनी नविन विषय, रिल्स, व्हिडीओ, मेसेजेस, विविध इशारे (अलर्ट) आपण बघतो. आपण बघत असलेले दर काही मिनिटांनी/सेकंदांनी बदलणारे हे विषय आपल्या मेंदूवर आदळत असतात. त्यामुळे मेंदूची एका विषयावर पूर्ण लक्ष केंद्रित करण्याची क्षमता हळूहळू कमी होत जाते.

आपण ऑनलाईन नेहमी उपलब्ध असले पाहिजे याचे मनावरील दडपण आणि याबाबत इतरांबरोबर आपली तुलना केल्याने मनावरील ताण व चिंता वाढते. त्यामुळे सोशल मिडियाच्या व्यवसायाकडे वाटचाल सुरु

होते. मेंदूला पुरेशी विश्रांती मिळत नाही. झोप कमी होते आणि यामुळे पॉपकॉर्न ब्रेनच्या तीव्रतेत वाढ होते.

पॉपकॉर्न ब्रेन कसा ओळखावा?

आपल्या मेंदूचा पॉपकॉर्न ब्रेन झाला आहे का? हे जाणून घेण्यासाठी पुढील लक्षणांचा विचार करावा. १) पॉपकॉर्न ब्रेनची व्यक्ती एका कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करु शकत नाही. एका विषयावर जास्त वेळ लक्ष टिकवू शकत नाही. लक्ष सतत एका कामावरुन दुसऱ्या विषयाकडे/कामाकडे वळत राहते. गरम भांड्यात/ ओव्हनमध्ये मक्याच्या लाह्या तडतडाव्यात तसे विचार इकडून तिकडे उड्या मारत असतात. मनाची एकाग्रता कमी होते. २) वारंवार मोबाईल उघडून मेसेजेस, रिल्स, अलर्ट आदि बघताना त्याची तलफ लागून जाते. ३) विसराळूपणा सुरु होतो व वरचेवर वाढत जातो. ४) आपले आपल्या भावनांवर नियंत्रण राहत नाही. ५) मानसिक ताणतणाव निर्माण होऊन हळूहळू नकळत वाढत जातो. ६) सतत बदलणाऱ्या विचारांमुळे निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. ७) आपण सतत कामात गुंतलेले असल्याची भावना तयार होते व एकही काम नीटपणे पूर्ण होत नाही.

पॉपकॉर्न ब्रेनचे परिणाम :

आपल्या दैनंदिन कामकाजावर पॉपकॉर्न ब्रेनचे परिणाम दिसून येतात. १) पॉपकॉर्न ब्रेनमुळे आपली उत्पादकता घटते. २) मानसिक तणाव निर्माण होतो. ३)जीवनमानाची गुणवत्ता ढासळत जाते. ४) विसराळूपणा वाढत जातो. ५) वारंवार सोशल मिडियात काय आलंय, काय चाललंय हे पाहण्याची वाईट सवय लागते. ६) परस्परातील संबंधावर विपरित प्रभाव जाणवतो. एकटेपणाची भावना वाढीस लागते. हळूहळू नातेसंबंध दुरावल्याची भावना तयार होते. आंतरव्यक्ती संवादातील रस निघून जातो व मनुष्य एकलकोंडा बनतो. ७) एकंदरित जीवनातील, जगण्यातील आनंद कमी होतो. अशी व्यक्ती असमाधानी बनते व भावनांवरील नियंत्रण गमावते.

पॉपकॉर्न ब्रेनमुळे लहान वयात देखील मोठे विपरीत परिणाम दिसून येतात. लहान बालकामध्ये पॉपकॉर्न ब्रेनमुळे वर्तणूकीत बदल दिसून येतात. एका विषयावर पूर्ण लक्ष केंद्रित करण्यात अडचणी येतात, चंचलता वाढते. नीट झोप येत नाही किंवा अवेळी झोप येते. चिडचिडेपणा वाढतो. वारंवार मनात विचार बदलत असल्यामुळे अभ्यासांवर लक्ष केंद्रित होत नाही. मोबाईल फोन व इतर डिजिटल, इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधून निघणाऱ्या रेडिएशन लहरींमुळे कर्करोगाचा धोका संभवतो. शारीरिक क्रियाकलाप, हालचाल कमी झाल्याने स्थूलता वाढते. शिकण्याची क्षमता कमी होते, आत्मविश्वास व धैर्याची कमतरता दिसून येते. या सर्वांचा बालकांच्या आत्मविश्वास आणि शारीरिक, मानसिक व भावनिक विकासावर विपरित परिणाम होतो.

पॉपकॉर्न ब्रेन वरील उपाय :

पॉपकॉर्न ब्रेनवर उपाय / उपचार करण्यासाठी सर्वप्रथम आपणास मोबाईलचे (अथवा त्याच्या मोठ्या भावंडांचे म्हणजे गॅझेटसस्, लॅपटॉप, संगणक, आयपॉड इ.) व्यसन जोडले आहे हे मान्य करणे आवश्यक आहे. पॉपकॉर्न ब्रेनच्या मानसिक व्याधीतून बाहेर पडण्यासाठी आपल्या जीवनशैलीत पुढीलप्रमाणे बदल केल्यास त्याचा नक्की फायदा होतो. यामध्ये १) आपल्या फोनमधील/इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील अनावश्यक ॲप्स काढून टाकवीत. २) स्वतःला डिजिटल माध्यमांवर द्यावयाच्या वेळेची मर्यादा ठरवावी. त्यासाठी एक ठराविक वेळ/कालावधी निश्चित करावा. साधारणतः तीन-चार तासांच्या अंतराने काही मिनिटे समाजमाध्यमांवरील मेसेजेस, रिल्स इत्यादी पाहण्यासाठी द्यावेत. ३) झोपण्यापूर्वी किमान एक तास आणि झोपेतून जाग आल्यावर किमान एक तास मोबाईल फोन/त्याची भावंडे बंद ठेवावीत व झोपताना आपल्या अथरुणांपासून मोबाईल फोन दूर ठेवावीत. जेणेकरुन आपल्याला ते सहज हाती घेता येणार नाहीत.

४) काही आवडी, छंद जोपासावेत, जेणेकरुन त्यात आपला अधिक वेळ गेल्याने स्क्रीन टाईम आपोआपच कमी करता येईल. ५) अनावश्यक स्क्रोलिंग करीत बसणे टाळावे. स्क्रीन टाईमचा अतिवापर टाळण्यासाठी 'स्क्रीन टाईम ॲप्स' चा वापर करता येतो. ६) काम करत असताना फोनवर स्क्रोलिंग करत राहणे बंद करावे. एका वेळी एकच काम करावे. ७) मनाचा व शरीराचा व्यायाम करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. ध्यान-धारणा करावी. योगासने व श्‍वसनाचे व्यायाम करावेत. ८) एका कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करण्याठी ते काम करताना २५ मिनिटांचा टाईम सेट करावा. या २५ मिनिटांच्या कामानंतर ५ मिनिटे विश्रांती घ्यावी व पुन्हा २५ मिनिटे ते काम असे चक्र सुरु ठेवावे. असा आपल्या कामाचा दिनक्रम ठरविणे फायद्याचे ठरते. यालाच 'फेमोडोरो' तंत्र असे म्हणतात. ९) दैनंदिन कामाचे वेळापत्रक ठरवावे. त्यात सोशल मिडीया वापरासाठी ठराविक, मर्यादित वेळ द्यावा. दुसऱ्या दिवशी करावयाच्या कामाची यादी आदल्या दिवशीच बनवावी व त्यानुसार कामाचे वेळापत्रक ठरवावे. १०) न थांबता सतत काम करीत राहण्यापेक्षा काम करत असताना मधूनमधून विश्रांती, फेरफटका मारणे, गप्पा-मनोरंजन यासाठी वेळ रोखून ठेवावा व त्यानुसार ते वेळापत्रक पाळावे. ११) डिजिटल डिटॉक्सचा सराव करावा. यामध्ये आठवड्यातून काही दिवस शक्यतो आठवड्याचे शेवटचे किंवा दोन दिवस मोबाईल फोन व त्यांच्या भावंडांचा वापर पूर्णपणे बंद ठेवावा.

हे सर्व उपाय सांगतांना, वाचतांना, ऐकतांना सोपे वाटत असले तरी ते दैनंदिन आचरणात आणतांना कसरत करावी लागते. पण ते अशक्य नक्कीच नाही. यासाठी आपणास अगदी लहान सुरुवात करुन हळूहळू वेळ वाढवत नेणे व त्याचा नियमित सराव करणे आवश्यक आहे. कारणे शेवटी ''असाध्य ते साध्य करिता सायास / कारण अभ्यास तुका म्हणे.'' या संत तुकोबाच्या शिकवणुकीचा नक्कीच फायदा होईल.

## फासं

बाप कुदळतो रानं
फोड हातावर येतो
धारं घामाची अंगाला
गंध मातीला लागतो...

आई वेचते दगडं
ठेचं पायाला लागते
रक्त बंभाळते बोट
आत काळीज फाटते...

येतो रानाला वापसा
बाप पेरणी करतो
लेकराच्या मुखातला
घास जमिनीला देतो...

आई काढते गवतं
अंगी फफाटके लुगडे
फाटलेल्या लुगड्याला
नशिबाची हो ठिगळे...

पीक येता काढणीला
बाप करतो राखणं
आई पाहते दुरून
रूप शेताचं देखणं...

लागे पिकाला वनवा
पीकं झाले राखं राखं
बाप पळतो कडनं
काळजातं होते आग...

मुखातला लेकरांच्या
नेला नशिबाने घासं
माझ्या बापाच्या गळ्याला
लागे करजाचा फासं...

– श्री.परशुराम लडकत
मो. नं.८१४९४७४९६१

# भारतातील रुग्णांचे हक्क



**डॉ. धनंजय मानकर** (M.D होमिओपॅथी तज्ञ)
सहायक प्राध्यापक, स्कूल ऑफ हेल्थ सिस्टम्स स्टडीज,
टाटा सामाजिक विज्ञान विज्ञान संस्था, मुंबई.
मो: ०९३७२०९००१६

भारतीय कायद्यानुसार 'रुग्ण' या शब्दाची व्याख्या कुठेही केलेली नाही. तथापि, हा शब्द अशा लोकांना समाविष्ट करतो जे डॉक्टर किंवा वैद्यकीय व्यावसायिकांकडून आरोग्य सेवा घेतात. आरोग्य सेवा देणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्य सरकारांसह सरकारचे कर्तव्य आहे.

<u>रुग्णांच्या हक्कांवर नियंत्रण करणारे कायदे :-</u> भारतातील हेल्थकेअर आस्थापने किंवा वैद्यकीय व्यावसायिकांशी संपर्क साधणाऱ्या लोकांच्या हक्कांचे नियमन करणाऱ्या कायद्यांमध्ये हे समाविष्ट आहे :

१. भारताचे संविधान, १९५०
२. इंडियन मेडिकल कौन्सिल (व्यावसायिक आचरण, शिष्टाचार आणि नीतिशास्त्र) नियम, २००२
३. औषधे आणि सौंदर्य प्रसाधने कायदा , १९४०
४. क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट (नोंदणी आणि नियमन) कायदा, २०१०
५. भारतीय दंड संहिता , १८६० आणि फौजदारी प्रक्रिया संहिता , १९७३.

हे कायदे वैद्यकीय आरोग्य व्यावसायिकांना रूग्णांची काळजी आणि उपचारांचे मानक राखण्यासाठी मार्गदर्शन करतात. भारतात रुग्णांच्या हक्कांसाठी कोणताही विशिष्ट कायदा नसल्यामुळे, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने रुग्ण हक्कांची सनद जारी केली. पुढे, यात वैद्यकीय सेवेत प्रवेश करणाऱ्या रूग्णांचे संरक्षण करणारे अधिकार आहेत. यामध्ये हे समाविष्ट आहे :

<u>भारतात रुग्णाला कोणते अधिकार आहेत ?</u>

रुग्ण म्हणून, जेव्हा आम्हाला वैद्यकीय सेवा मिळते तेव्हा आमचे अधिकार जाणून घेणे आणि त्यांचा वापर करणे महत्त्वाचे असते. एक माहितीपूर्ण आणि व्यस्त रुग्ण बनून, तुम्ही तुमच्या आरोग्यसेवा निर्णयांमध्ये सक्रियपणे सहभागी होऊ शकता.

कोणताही भेदभाव न करता सर्व आरोग्यसेवा प्रदात्यांकडून आदर, सन्मान, सौजन्य आणि संवेदनशीलतेने वागणे हा तुमचा हक्क आहे. तुमची वैद्यकीय माहिती गोपनीय ठेवली पाहिजे आणि केवळ अधिकृत आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी प्रवेशयोग्य असावी. वैद्यकीय तपासणी दरम्यान गोपनीयता राखली पाहिजे.

तुमच्या वैद्यकीय सेवेला गुणवत्ता, सुरक्षितता आणि परिणामकारकतेच्या योग्य मानकांचे पालन करावे लागेल. तुम्हाला तुमची आरोग्य स्थिती, निदान, उपचार पर्याय आणि अपेक्षित परिणामांबद्दल संपूर्ण आणि अद्ययावत माहिती प्राप्त करण्याचा अधिकार आहे. प्रश्न विचारण्यास आणि लिखित निदानाची विनंती करण्यास अजिबात संकोच करू नका.

तुमच्या आरोग्यसेवेबाबत निर्णय घेण्यामध्ये सहभागी व्हा आणि तुम्हाला शंका असल्यास दुसरे मत घेणे हा तुमचा अधिकार आहे. तुमच्या उपचारादरम्यान किंवा रुग्णालयात दाखल करताना तुम्हाला सुरक्षित आणि सुरक्षित वातावरण प्रदान केले जावे. तुम्ही चिंता व्यक्त करू शकता, अभिप्राय देऊ शकता, तुमचे अनुभव

सामायिक करू शकता आणि काळजी वितरण, उपचार, बिलिंग, सहाय्यक सेवा किंवा कर्मचाऱ्यांच्या वर्तनाबद्दल भेदभावाच्या भीतीशिवाय रचनात्मकपणे तक्रारी करू शकता. तुमचे अधिकार चांगल्या आणि जबाबदारीने वापरा, कारण ते तुम्हाला तुमच्या आरोग्य सेवा प्रवासात सक्रिय आणि माहितीपूर्ण सहभागी होण्यासाठी सक्षम करतात.

भारतातील रुग्णांच्या हक्कांची यादी :

भारतातील रुग्णालये ही जितकी आशेची, दुसऱ्या संधीची आणि पुनर्प्राप्तीची ठिकाणे आहेत, तितकीच ती अनेकांसाठी गंभीर चिंतेचे आणि आर्थिक भाराचे कारण बनू शकतात. जेव्हा एखादी प्रिय व्यक्ती गंभीरपणे आजारी किंवा जखमी असते, तेव्हा आपण संशयाची छाया न ठेवता रुग्णालय आणि त्याच्या डॉक्टरांवर पूर्णपणे विश्वास ठेवतो. आता, आम्ही असे म्हणत नाही की कोणीतरी या परिस्थितीचा फ़ायदा घेऊ शकते, परंतु प्रत्येकासाठी प्रत्येक ठिकाणी त्यांच्या हक्कांची माहिती असणे अत्यंत महत्वाचे आहे.

हे लक्षात घेऊन, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने (MoHFW, Delhi) आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने अलीकडेच 'रुग्णांच्या हक्कांची सनद' जारी केली आहे जी भारतीय राज्यघटनेत नमूद केल्यानुसार कायदेशीर अधिकारांचे संकलन करते. हे १७ अधिकारांची गणना करते ज्याचा भारतातील सर्व रुग्णांना हक्क आहे. यामध्ये हे समाविष्ट आहे. ही यादी आहे :

१. माहितीचा अधिकार –

रुग्णाला त्यांची वैद्यकीय स्थिती किंवा आजार, पद्धती आणि उपचारांसाठीच्या पर्यायांबाबत प्रामाणिक माहिती मिळवण्याचा अधिकार आहे. डॉक्टर किंवा त्यांच्या पात्र सहाय्यकांनी तुमचा आजार, त्याचे निदान (तात्पुरती किंवा पुष्टी, जसे ते असू शकते), प्रस्तावित तपासणी आणि रुग्णाला संभाव्य गुंतागुंत याबद्दल पुरेशी माहिती प्रदान करणे आवश्यक आहे. जर रुग्ण हे समजण्याच्या स्थितीत नसेल तर, डॉक्टर किंवा त्यांच्या सहाय्यकाने काळजीवाहू व्यक्तीला माहिती प्रदान करणे आवश्यक आहे.

हे रुग्ण किंवा काळजीवाहू यांना समजेल अशा सोप्या भाषेत करावे लागेल. याशिवाय रुग्णांना प्रत्येक डॉक्टर आणि सहाय्यक तसेच त्यांच्यावर उपचार करणाऱ्या प्राथमिक डॉक्टरांची ओळख आणि व्यावसायिक स्थिती जाणून घेण्याचा अधिकार आहे. उपचारांच्या खर्चाची माहिती लिखित स्वरूपात देणे आवश्यक आहे.

२. नोंदी आणि अहवालांचा अधिकार –

सर्व रुग्णांना किंवा त्यांच्या काळजीवाहूंना वैद्यकीय नोंदी आणि अहवाल प्रदान करणे हॉस्पिटल अधिकार्यांचे कर्तव्य आहे. रुग्णांना किंवा त्यांच्या संबंधित काळजीवाहकांना केस पेपर्स, इनडोअर पेशंट रेकॉर्ड्स आणि तपासणी अहवालांच्या मूळ किंवा प्रतींमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार आहे. तपासणी अहवाल त्यांना प्रवेशाच्या २४ तासांच्या आत किंवा डिस्चार्जच्या ७२ तासांच्या आत उपलब्ध करून द्यावा लागेल. मृत्यूच्या बाबतीत, रुग्णाच्या काळजीवाहू किंवा नातेवाईकांना तपासाच्या मूळ प्रतींसह डिस्चार्ज सारांश किंवा मृत्यूचा सारांश प्रदान करण्यासाठी रुग्णालय जबाबदार आहे.

३. आपत्कालीन वैद्यकीय सेवेचा अधिकार –

कोणत्याही रुग्णाला सरकारी किंवा खाजगी रुग्णालयातून आपत्कालीन वैद्यकीय सेवा मिळण्यापासून परावृत्त करता येणार नाही. आपत्कालीन परिस्थितीत, तुम्ही कोणत्याही सरकारी किंवा खाजगी रुग्णालयात वैद्यकीय सेवा घेऊ शकता. राज्यघटनेच्या कलम २१ अन्वये, जे प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा आणि

वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे याची खात्री देते, तुम्हाला गुणवत्ता किंवा सुरक्षिततेशी तडजोड न करता आणि हॉस्पिटलला पूर्ण किंवा प्रगत शुल्क न भरता डॉक्टरांकडून आपत्कालीन काळजी घेण्याचा अधिकार आहे.

४. <u>सूचित संमतीचा अधिकार –</u>

वैद्यकीय व्यावसायिकाने ऑपरेशन करण्यापूर्वी रुग्णाची किंवा त्यांच्या काळजीवाहू व्यक्तीची, जोडीदाराची किंवा पालकाची (अल्पवयीन असल्यास) लेखी संमती घेणे आवश्यक आहे. एखाद्या रूग्णावर आक्रमक तपासणी किंवा शस्त्रक्रिया किंवा केमोथेरपी करण्याचा निर्णय हॉस्पिटलने घेतल्यास, त्यांनी योग्य पॉलिसी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तसे करणे आवश्यक आहे. रुग्णाला किंवा जबाबदार केअरटेकरला प्रोटोकॉल संमती फॉर्म प्रदान करण्यापूर्वी मुख्यतः रुग्णाच्या प्रभारी डॉक्टरांनी तपासणी किंवा शस्त्रक्रियेची जोखीम, परिणाम आणि प्रक्रिया तपशीलवार आणि सोप्या भाषेत स्पष्ट करणे आवश्यक आहे.

५. <u>गोपनीयतेचा, मानवी प्रतिष्ठेचा आणि गोपनीयतेचा अधिकार –</u>

सर्व वैद्यकीय व्यावसायिकांना रुग्णाच्या खाजगी तपशिलांबाबत सर्वोच्च पातळीची गोपनीयता राखली पाहिजे. आता हा एक बऱ्यापैकी ज्ञात हक्क आहे, विशेषत: जर तुम्ही रुग्णालये किंवा डॉक्टरांबद्दल टीव्ही शो फॉलो करत असाल. आचारसंहिता डॉक्टरांना रुग्णाच्या आजाराची आणि उपचार योजनेची माहिती रुग्ण आणि त्यांचे काळजीवाहू वगळता इतर सर्वांकडून काटेकोरपणे गोपनीयतेने ठेवण्यास सांगते. ही माहिती सामायिक करणे 'इतरांच्या संरक्षणाच्या हितासाठी किंवा सार्वजनिक आरोग्याच्या विचारांमुळे' आहे असे अपवादात्मक प्रकरण नसल्यास. महिला रूग्णाच्या बाबतीत, तिला तपासणारा किंवा उपचार करणारा वैद्यकीय व्यवसायी पुरुष असल्यास दुसऱ्या महिलेच्या उपस्थितीची मागणी करण्याचा अधिकार आहे. असे म्हटल्यावर, प्रत्येक रुग्णाच्या लिंगाचा विचार न करता त्याचा सन्मान राखण्याची जबाबदारी रुग्णालयाची आहे. आहे.

६. <u>दुसऱ्या मताचा अधिकार –</u>

रुग्णाला त्याच्या किंवा तिच्या आवडीच्या कोणत्याही डॉक्टरकडे दुसरे मत घेण्यास मोकळे आहे. तुम्ही तुमच्या आवडीच्या डॉक्टर/रुग्णालयाकडून दुसरे मत घेण्याचे निवडल्यास डॉक्टरांनी आणि रुग्णालयाने तुमच्या निर्णयाचा आदर केला पाहिजे. सर्व रेकॉर्ड दस्तऐवज आणि इतर संबंधित माहिती सोपवण्यासाठी ते जबाबदार आहेत तुम्ही वेगळ्या डॉक्टरकडे जाण्याचे निवडले तर. हॉस्पिटल तुम्हाला थांबवू शकत नाही किंवा तुम्हाला इतरत्र जाण्यापासून परावृत्त करू शकत नाही, फक्त आरोग्याच्या स्थितीचे तपशीलवार स्पष्टीकरण आणि उपचारास उशीर झाल्यास त्याचे परिणाम देऊ शकतात. तुमचा दुसरा अभिप्राय मिळाल्यानंतर तुम्ही पहिल्या रुग्णालयात परत येण्याचे निवडल्यास, रुग्णालय अजूनही आरोग्य सेवांच्या गुणवत्तेशी तडजोड करू शकत नाही.

७. <u>दरांमध्ये पारदर्शकतेचा अधिकार –</u>

वैद्यकीय आस्थापनांद्वारे प्रदान केलेल्या सेवा, चाचण्या आणि उपचारांसाठी रुग्णांवर आकारले जाणारे सर्व खर्च लोकांसाठी उपलब्ध करून द्यावे लागतील. वर नमूद केल्याप्रमाणे, रुग्णाला ते घेत असलेल्या उपचारांसाठी त्यांना किती खर्च करावा लागेल याचा लेखी हिशेब ठेवण्याचा अधिकार आहे. याचा पुरावा म्हणून, रुग्णालयांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या वैद्यकीय प्रक्रियेची नावे आणि दर असलेले छापील माहितीपत्रके आणि प्रमुख डिस्प्ले बोर्ड असणे आवश्यक आहे. मुख्य दरांचे तपशीलवार वेळापत्रक सुस्पष्ट ठिकाणी

प्रदर्शित करणे आवश्यक आहे आणि ते इंग्रजी तसेच स्थानिक भाषा दोन्हीमध्ये असणे आवश्यक आहे. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग अथॉरिटी (NPPA) आणि इतर संबंधित प्राधिकरणांनी ठरवलेल्या दरात रुग्णांना औषधे, उपकरणे आणि रोपण मिळवण्याचा अधिकार आहे . रुग्णांना आरोग्य सेवा प्राप्त करण्याचा अधिकार आहे ज्यांची किंमत केंद्र आणि राज्य सरकारांनी दिलेल्या मर्यादेत आहे, ती प्राप्त करताना.

८. भेदभाव न करण्याचा अधिकार –

डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी लिंग, लैंगिकता, जात, धर्म, वंश, जन्मस्थान किंवा आजार या कारणास्तव रुग्णांना उपचार नाकारू शकत नाहीत. वरील मुद्दा आपल्याला रुग्णाच्या आजार, स्थिती, एचआयव्ही स्थिती किंवा त्यांचे लिंग, वय, धर्म, जात, वांशिक, लैंगिक प्रवृत्ती, भाषिक किंवा भौगोलिक किंवा सामाजिक उत्पत्तीच्या आधारावर भेदभाव न करता राखल्या जाणाऱ्या अधिकारांकडे आणतो. वरील वैशिष्ट्यांच्या आधारे, कोणत्याही व्यक्तीला भेदभावपूर्ण वागणूक दिली जाऊ शकत नाही आणि हे सुनिश्चित करण्यासाठी रुग्णालयातील कर्मचारी जबाबदार आहेत.

९. मानकांनुसार सुरक्षितता आणि दर्जेदार काळजी घेण्याचा अधिकार –

उपचारांसाठी सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे हे वैद्यकीय आस्थापनांचे कर्तव्य आहे. दर्जेदार काळजी मानकांच्या सूची अंतर्गत येणाऱ्या तरतुदींची एक संक्षिप्त यादी येथे आहे–

- सुरक्षा आणि सुरक्षा.
- स्वच्छता, संसर्ग नियंत्रण उपाय आणि स्वच्छता सुविधा आणि सुरक्षित पिण्याचे पाणी.
- नॅशनल ॲक्रिडेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स (NABH) अंतर्गत नवीनतम मानके, मानदंड आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणारी आरोग्यसेवा.
- व्यावसायिक पद्धतीने आणि वैद्यकीय नैतिकतेच्या तत्त्वांसह उपस्थित राहणे, उपचार करणे आणि त्यांची काळजी घेणे.
- रुग्ण किंवा काळजीवाहू यांच्याकडून निवारण मिळविण्याचा अधिकार

१०. उपलब्ध असल्यास वैकल्पिक उपचार पर्याय निवडण्याचा अधिकार

एकदा रुग्णाला किंवा त्यांच्या काळजीवाहू व्यक्तीला त्यांच्या उपचाराच्या पर्यायांची माहिती मिळाल्यावर, ते पुढील कोर्स निवडण्यास मोकळे असतात. डॉक्टरांना ते आवश्यक वाटले तरीही त्यांना त्यांच्या इच्छेशिवाय विशिष्ट उपचार पाळण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. रुग्ण/केअरटेकर यांना उपचाराचे सर्व पर्याय स्पष्ट करण्यासाठी रुग्णालयातील कर्मचारी आणि डॉक्टर जबाबदार असतात. त्यांच्या निवडींचा सखोल अभ्यास केल्यानंतर, रुग्ण / केअरटेकर डॉक्टरांच्या प्राथमिक शिफ्फारसी असू शकतात किंवा नसू शकतात अशा उपचारांची निवड करू शकतात. याचा अर्थ असाही होतो की एकदा रुग्ण / काळजी घेणाऱ्यांनी हा पर्यायी उपचार निवडला की, ते त्याच्या परिणामांची जबाबदारी घेतील.

११. औषधे आणि चाचण्या मिळविण्यासाठी स्त्रोत निवडण्याचा अधिकार

जेव्हा रुग्णाला औषधे किंवा चाचण्या लिहून दिल्या जातात तेव्हा ते कोठून खरेदी करायचे हे त्यांनी ठरवायचे असते. स्पर्धात्मक किमतींमध्ये विविध वस्तू किंवा सेवांमध्ये प्रवेश मिळणे हा त्यांचा ग्राहक म्हणून हक्क आहे. एक रुग्ण किंवा काळजीवाहक म्हणून, तुम्हाला तुमचा वैद्यकीय पुरवठा कोणत्या नोंदणीकृत फार्मसीकडून घ्यायचा आहे हे निवडण्याचा अधिकार आहे. यामध्ये नॅशनल ॲक्रिडेशन बोर्ड फॉर लॅबोरेटरीज (एनएबीएल) अंतर्गत नोंदणीकृत कोणत्याही निदान केंद्र किंवा

प्रयोगशाळेकडून तपासणी प्रक्रिया (उदाहरणार्थ, रक्त चाचणी) घेणे देखील समाविष्ट आहे .

१२. विकृत व्यावसायिक प्रभावापासून मुक्त असलेल्या योग्य संदर्भ आणि हस्तांतरणाचा अधिकार

सर्व रुग्णांना अखंड सेवा मिळण्याचा अधिकार आहे आणि जेव्हा रुग्णाला वेगळ्या डॉक्टरकडे पाठवले जाते किंवा रुग्णाला वेगळ्या सुविधेमध्ये स्थानांतरित केले जाते तेव्हा काळजीची गुणवत्ता राखली जाते. जर एखाद्या रुग्णाला एका आरोग्य केंद्रातून दुसऱ्या आरोग्य केंद्रात हस्तांतरित करणे आवश्यक असेल तर, नवीन आरोग्य केंद्राच्या विविध पर्यायांसह योग्य आणि तपशीलवार औचित्य त्यांना/केअरटेकरना दिले पाहिजे. त्यांना उपचार/औषधांची यादी देखील दिली पाहिजे जी हस्तांतरणानंतर सुरू ठेवण्याची आवश्यकता आहे. रुग्ण किंवा त्यांच्या काळजीवाहूने ते स्वीकारल्याशिवाय हे पाऊल उचलले जाऊ शकत नाही. हे वेगळे सांगण्याची गरज नाही, हे निर्णय 'किकबॅक, कमिशन, प्रोत्साहन किंवा इतर विकृत व्यवसाय पद्धती' सारख्या कारणांमुळे प्रभावित होऊ शकत नाहीत.

१३. क्लिनिकल चाचण्यांमध्ये गुंतलेल्या रूग्णांसाठी संरक्षणाचा अधिकार

भारतातील सर्व क्लिनिकल चाचण्यांमधील सहभागींना चाचणी-संबंधित दुखापत किंवा मृत्यू झाल्यास नुकसानभरपाईचा दावा करणे, वैयक्तिक माहितीची गोपनीयता इत्यादीसारखे अधिकार आहेत. MoHFW नुसार, सर्व क्लिनिकल चाचण्या प्रोटोकॉल आणि चांगल्या क्लिनिकल सराव मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून आयोजित केल्या पाहिजेत. भारताचे तसेच सुधारित औषधे आणि सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० आणि नियम, १९४५ केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्था, आरोग्य महासंचालनालयाच्या सर्व लागू वैधानिक तरतुदी. या मुद्द्यांमध्ये रुग्णाची संमती, औषधांचे लिखित प्रिस्क्रिप्शन किंवा हस्तक्षेप, गोपनीयता इत्यादींचा समावेश आहे. तुम्ही येथे मार्गदर्शक तत्त्वांबद्दल तपशीलवार वाचू शकता .

१४. जैववैद्यकीय आणि आरोग्य संशोधनात सहभागी होणाऱ्यांच्या संरक्षणाचा अधिकार

बायोमेडिकल आणि हेल्थ रिसर्चसाठी राष्ट्रीय नैतिक मार्गदर्शक तत्त्वे ज्यामध्ये मानवी सहभागींचा समावेश आहे, सहभागींना अधिकार दिले जातील याची खात्री करण्यासाठी पालन केले पाहिजे. जर एखादा रुग्ण बायोमेडिकल किंवा आरोग्य संशोधन प्रक्रियेत गुंतलेला असेल तर त्यांची संमती लिखित स्वरूपात घेणे आवश्यक आहे. संशोधनादरम्यानही त्यांचा सन्मान, गोपनीयता आणि गोपनीयतेचा अधिकार जपला जाणे आवश्यक आहे. जर सहभागी व्यक्तीला प्रत्यक्ष शारीरिक, मानसिक, सामाजिक, कायदेशीर किंवा आर्थिक नुकसान झाले असेल तर ते रुग्णालयाकडून आर्थिक किंवा इतर मदतीसाठी पात्र आहेत. संशोधनातून रुग्णालयाला जे काही फायदे मिळतात ते संबंधित व्यक्ती, समुदाय आणि सामान्य लोकांसाठी उपलब्ध करून दिले पाहिजेत.

१५. रूग्ण किंवा मृत व्यक्तीचा मृतदेह हॉस्पिटलमधून डिस्चार्ज घेण्याचा अधिकार

उपचाराच्या कोणत्याही टप्प्यावर, रुग्णाला डिस्चार्ज घेण्यास किंवा रुग्णालयातून सोडण्यास मोकळा असतो. त्यांना त्यांच्या इच्छेशिवाय ठेवता येत नाही किंवा जबरदस्तीने रुग्णालयात ठेवता येत नाही. त्याचप्रमाणे मृत रुग्णाच्या काळजीवाहू व्यक्तींना त्यांचा मृतदेह रुग्णालयातून घेण्याचा अधिकार आहे. ङ्गरुग्णाला डिस्चार्ज मिळण्याचा अधिकार आहे आणि रूग्णालयातील शुल्क भरण्याच्या (अ) विवादासारख्या प्रक्रियात्मक कारणास्तव त्याला रुग्णालयात ताब्यात

ठेवता येत नाही. त्याचप्रमाणे, हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेल्या रुग्णाच्या मृतदेहावर देखभाल करणाऱ्यांचा अधिकार आहे आणि देखभाल करणाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध रूग्णालयाचे शुल्क न भरल्याबद्दल/विवादासह, प्रक्रियात्मक कारणास्तव मृतदेहाची तपशीलवार माहिती दिली जाऊ शकत नाही. MoHFW म्हणते.

१६. <u>रुग्णांच्या शिक्षणाचा अधिकार</u>

रुग्णांना त्यांच्या स्थितीशी आणि निरोगी राहण्याच्या पद्धतींशी संबंधित तथ्यांबद्दल शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. रूग्णाला रूग्णालयाने ज्या गोष्टींची माहिती देणे आवश्यक आहे त्यांची यादी येथे आहे. रुग्ण/केअरटेकरला समजेल त्या भाषेत हे संबोधित करणे आवश्यक आहे.

- त्यांच्या स्थितीबद्दल मुख्य तथ्ये
- निरोगी जीवन पद्धती
- त्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या
- त्यांच्याशी संबंधित आरोग्य विमा योजना
- संबंधित हक्क (धर्मादाय रुग्णालयांसाठी)
- तक्रारींचे निवारण कसे करावे

१७. <u>सुनावणी घेण्याचा आणि निराकरण करण्याचा अधिकार –</u>

एखाद्या रुग्णाला किंवा त्यांच्या काळजीवाहू व्यक्तीला डॉक्टर किंवा रुग्णालय प्रशासनाविरुद्ध दिलेल्या उपचारांच्या गुणवत्तेबद्दल तक्रार असल्यास, त्यांना त्याचे निराकरण करण्याचा अधिकार आहे. सर्वात शेवटी, प्रत्येक रुग्णाला त्याच्या तक्रारींचे निराकरण करण्याचा आणि रुग्णालयात किंवा विशिष्ट डॉक्टर/सहाय्यकाकडून मिळालेल्या आरोग्यसेवा आणि उपचारांबद्दल अभिप्राय देण्याचा अधिकार आहे.

MoHFW पुढे जोडते, रुग्ण आणि काळजीवाहू यांना या सनदातील वरीलपैकी कोणत्याही अधिकारांचे उल्लंघन केल्यामुळे त्यांना त्रास होत असेल तर त्यांचे निराकरण करण्याचा अधिकार आहे. हॉस्पिटल / आरोग्य सेवा प्रदात्याने या उद्देशासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे तक्रार करून आणि पुढे रुग्ण हक्क न्यायाधिकरण मंच किंवा क्लिनिकल आस्थापना नियामक प्राधिकरणासारख्या सरकारी यंत्रणेकडे तक्रार नोंदवून हे केले जाऊ शकते.

## रस्ता

सतत हरवतोय रस्ता..
कितीही पळत राहिलं तरी
गवसत नाहीय
त्याचं शेवटचं टोक
किंवा
आरंभीचं वळण!


रस्त्याच्या डोळ्यांवर घट्ट पट्टी बांधून धावायला
सांगितले तर
रस्ता पोहचेल का
हव्या त्या इप्सित स्थळी
की
गरगरत फिरेन
स्वत:च्याभोवती?
निश्चित असं काहीच नसतं!
पण
अनिश्चितता तरी कुठे निश्चित असते?

सगळेच नियम अपवादासहीत
अस्तित्वात असतात..
कोणता अपवाद
कुणाच्या अस्तित्वाला
काय देईल
काय माहित!

रस्त्याचं गरगरणं सुरुच आहे अजूनही



**- डॉ.ज्योती कदम**



# सल

**लेखन – बापू त्र्यंबक माळी (सर)**
निळकंठ नंगर, कुसुंबा, धुळे

मो.: ८६६८७४७०७७

सकाळची लगबग संपली होती. संग्रामपूर गावातील गावकरी आपापल्या शेताकडे निघाले होते. बैलांच्या घुंघर माळांच्या आवाजात बैलगाड्यांच्या खळखळाट सामावत होता. मालकाच्या मागे शेळ्या बकऱ्या, गाई, वासरे रस्त्याने निघाले होते. मध्येच चुकार गाई व अवखळ वासरे मालकांची नजर चुकवून रस्त्या लगतच्या शेतात धावत जाऊन पिकांचा घास घेत होते, आणि मालकाच्या हाके सरशी घाबरून माघारी फिरत असत. मका आपल्या शिरावर राज मुकुटासारखा सुंदर तुरा घेऊन दिमाखात उभा होता. शेवगा बहरला होता. पांढऱ्या शुभ्र फुलांनी लगडला होता. कापसाच्या पिकाने लाल, पिवळी फुले परिधान केलेली होती. बांधा वरचे हिरवे गवत ताठमान करून गर्वाने उभे होते. सर्व कसं व्यवस्थितपणे विना तक्रार चालू होतं. अंगात मळकट कपडे, पायात चिखलाने माखलेली चप्पल, डोक्यावर टोपी, खांद्या वर वस्त्र, हातात काठी आणि शिदोरी अशा वेशात जगाचा पोशिंदा, उद्याच्या विवंचनांचा पसारा डोक्यात घेऊन, आपल्या शेताकडे मार्गस्थ झाला होता. डोक्यात नियोजनाचे चक्र चालू असले तरी आपल्या गुरा ढोरांची काळजी करीत होता. रस्त्या ने येणाऱ्या गाड्यांना रस्ता मोकळा करून देण्यासाठी गुरे कडेला सारत होता. गाड्या आल्या तशा गेल्या. धुरळा उडाला आणि बसला परंतु कुतूहल शमले नाही,
'कोण व्हतं र?' हा प्रश्न वाटसरू एकमेकांना विचारत होते आणि पुन्हा वाटचाल करीत होते.

संग्रामपूरवासीय, त्यांच्या नित्य कर्मात व्यस्त झाले. गावात फक्त वयस्कर आणि कामचुकार मंडळी हजर होते. अचानक गाड्या मारुती मंदिरा जवळ थांबल्या. आबासाहेब आणि त्यांचे मुले, मुलगी असा परिवार उतरला. मंदिरा जवळच्या डेरेदार वृक्षांच्या सावलीत सर्वजण विसावले. भादव्याचे ऊन चांगलं तापलं होतं. झाडाच्या छायेत सर्वजण विसावले.

प्रत्येक कुटुंब काही अंतरावर बसले होते आबा साहेब काठीचा आधार घेत आपल्या वृद्ध पत्नीला आधार देत, एके जागी स्थिरावले. कोणीच कोणाशी बोलत नव्हते वा एकमेकांकडे पहात नव्हते. दुपारच्या उन्हात भयाण शांतता पसरली होती. सर्वांचे लक्ष रस्त्याकडे लागले होते. रस्त्याने चार मोटरसायकली आल्या आणि मारुतीच्या पारा जवळ थांबल्या. पांढऱ्या शुभ्र कपड्यातल्या त्या व्यक्तींनी चेहऱ्यावर हास्य आणत हात जोडले. आणि तेही झाडाखाली स्थानापन्न झाले. थोडी फार विचारपूस झाली. हास्य विनोदाने वातावरण हलकं फुलकं करण्याचा प्रयत्न झाला. त्यातल्या एका वयस्क व्यक्तीने विचारणा केली आणि विषयाला तोंड फोडले,

'काय आबासाहेब, तुमची तब्येत लईच खालावली की राव ? आबास्नी भेटा या हवं असा लय दिसापास्न ईच्चार करत व्हतो
पर ही गावकीची काम काय बी उमगु देत ना. बर हाय नव्ह ?'

'बर हाय बाबा, जो दिसईल त्यो ढकलन्या परीस आता काय उरलया ...? जे मिळेल ते खावं आणि गप पडावं ..'. त्यां चे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच दिनेश बोलला,

'होय आम्ही तुम्हाला खायला देत नाही. मी काय त्रास देतो तुम्हाला? तुम्हा दोघांच्या सेवेसाठी आम्ही

हजर असतो.
'नाय,.. तुमचा तरास नाय पर माझं करमच आमास्नी तरास देतय, तवा सांगून काय फायदा?

आबासाहेबांनी मंडळीस हात जोडले आणि विनंती केली, 'मंडळी, म्या म्हणतोय त्याला काय बी आर्थ नाय, आमची फाटकी बुक

कोण वाचणार हाय? मला न्यायासाठन फरयाद मांडायची नाय..

डबडबलेल्या नेत्रांनी आपले शल्य त्यांनी मांडण्यास सुरुवात केली,

'हतं ह्याच पांढरीत म्या लहानाचा मोठा झालो. माज्या लहानपणीच बावर काळानं घाला घातला तवाधरन जिवाकड पाहयलं नाय. रातदिस याक केला. लहान भावंडं सिकवली. आन त्येस्नि मास्तर केलय. नोकरी मिळाली. त्यांच दोनच चार केलत. त्येंनी मदत केली. आमची जाणीव ठीवली. त्येंचा परपंच वाढला आणि पाखर उडून गेलीत. माय सुखा न गेली .

तिचं डोळ्याचं पारन फेडलं. स्वतःचा परपंच सुरू व्हता. पदरी दोन बिगे शेती व्हती, आज बारा बीगे हाय. दिनेश, रमेश, अनुजा यास्नी सिकवलं. दिनू कारकून हाय. रमा मास्तर झाला. अनुला इंजिनिअर सायबाच्या पदरी घातलं, मग म्या काय चूक केली? सांगा बर मंडळी?

'आबासाहेब हे समद आम्ही आमच्या डोळ्यानी पाह्यल, आपली लेकरं सिकूनशा न मोठी व्हावीतही परतेक आई बापाची इच्छा आसते. पर आता तुमची तक्रार काय हाय?"

रंगनाथरावांनी विचारणा केली. आबांचा चेहरा लाल झाला. ओठ थरथरत होते. अंतर्मन दाटून आले. भावनांचा आणि विचारांचा कल्लोळ माजला. काय आणि कसे सांगावे? याची तर्कसंगती त्यांना लावता येत नव्हती. दुः ख अनावर झाले आणि आसव सैराटपणे धावू लागली. गवताच्या पेंढीच बंद तुटावेत अन गवत वाऱ्याने रानोमाळ पसरत जावे तसे आबांचे झाले. कंठ दाटून आला. शब्दांवर भावनांनी विजय मिळवला. पापण्या थरथरल्या. सुरकुतलेल्या गालांवरून अश्रू ओघळू लागले. दुः खाने आबा खचले. तोच रंगनाथराव आबांनी धीर देत म्हणाले,

'आबासाहेब, समद ठीक व्हईल. आम्हास्नी बी लेकर हा यती. ज्येच चुकलं आसल त्येच्या पदरात घालू. पर तुमी समदी हकीगत आमास्नी सांगा. आम्ही तो डगा काढाया आलोत.

'अरे म्या काय सांगू? ह्यो दिनेश याला कारकून केला. पुढाऱ्यांच पाय धरलं, दाढ्या धरल्या, साळत पैका भरला , पोटाला चिमटा काढला ,.....

पुढे त्यांना बोलणे अशक्य झाले होते. गिरीधरराव आपला मोर्चा दिनेश कडे वळवत म्हणाले,

' काय दिनेश, आबा म्हणत्या त ते खरं हाय, न्हव?'

'अरे आई बापांनी मुलांना शिकवणे, लहानाचे मोठे करणे हे त्यांचे कर्तव्य नाही का? या त नवीन ते काय?' मध्येच दिनेश ची पत्नी प्रभा उतरली ,

' अहो , जर का माझ्या नवऱ्याच्या पदरी शिक्षण नसते तर त्यांना कोणी नोकरी दिली असती काय? शिक्षणासाठी स्वतः लाच मेहनत करावी लागते. पैशांवर मार्क मिळत नाहीत. आमच्या मुलांना ही आम्ही शिकवत आहोत ना? शिक्षण, नोकरी, लग्न हे आईबाप याना त्याने आपले कर्तव्य आहे. आम्ही आमच्या कर्तव्याची टिमकी जगाच्या वेशी वर वाजवीत नाही.

प्रभाच्या तात्विक वाक्यांनी पंच अवाकब झाले. गिरीधररावांनी शांतपणे ऐकून घेतले आणि समजूतीच्या सुरात प्रभाला समज दिली .

'आग पोरी, हे खरच हाय की बाय. येव्हडी वकील व्हती, तर आम्हास्नी काय जेवाया बोलावलंय? तुमचा

न्याव तुमीच कराया हवा व्हता. ?'

'मंडळी माफी मागते पण माझा हेतू तसा नव्हता. आबा आणि माझ्या सासूबाई आमच्याकडे होत्या. ठरल्याप्रमाणे आम्ही त्यांना सांभाळले त्यांच्या आवडी निवडी जपल्या पण सांगायला लाज वाटते, घरची अब्रू वेशीवर टांगणे योग्य नाही. तरी ही या प्रसंगी आपण सारे एकाच गावचे असल्याने सांगते. आबा रोज सकाळी हॉटेलात जाऊन खायचे, घरचे जेवण यांना गोड लागत नव्हतं. सकाळ संध्याकाळी दुसऱ्या गल्लीतल्या देशमुख बाईच्या घरी गप्पा मारीत बसायचे. आम्हाला गावात नोकरी करीत राहायचे आहे. जग काय म्हणेल याचा विचार करायला नको काय? शिवाय सासुबाई नातवंडांना सारख्या हिडीस फिडीस करायच्या त्या शरीराने आमच्याकडे होत्या, मात्र मनाने लहान मुलाकडे.. असे त्यांचे वा गणे होते मग आम्ही किती सहन करावे? आमच्या सहनशीलतेला मर्यादा आहेतच ना ?

प्रभाने आपले म्हणणे प्रभावी पणे मांडले. जणू का ही जग जिंकल्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. वकिलाच्या मुलीचा वारसा तिने जपला. प्रभा म्हणजे शब्दांची जादूगार होती. तिच्या शब्दांच्या आरोपात आबा आणि त्यांची पत्नी सोनाई होरपळत होते. काळजाला चरे पडत होते तोच वृध्द सोनाई डोळे पुसत त्वेषाने उसळली आणि म्हणाली, 'मेली, कुठ पडशील हे पाप? ती देशमुख बाई माझ्या नंद सारखी हाय, तुझ्या सासऱ्याच्या साळत शिकल्याली हाय. एकाच गावाशिवाची हायती दोघबी. या वयात पाप लावतीया, व्हय?तुजं वाटोळं व्हईल ****कीड पडून मरसील. आमी काय गुन्हा केला तुजा? तुला खाऊ घालायचं नव्हतं, आसं सांगकी आमची नातवंड आमची दुश्मन नव्हत, उगी आळ घेऊ नगस...' श्रीधरपंतांनी दोघींना शांत केले.

'आरं दोघी बी गप बसा की. नाय तर आमी चाललो माघारी. बायकांनी आपली लई अक्कल पाजळू नये. त्या फकस्त पायाखाली बगत्यात. दिनेश, बोल की लेका .. बायकोला म्होरं करतोयस लेकाचा. बाईच्या पदरा आड लपतो व्हयर?ङ्ग

आत्ता पर्यंत मूक असलेल्या रमेशला वाचा फुटली,

' मंडळी, या म्हाताऱ्या ने बारापैकी आठ बिघे शेती दिन्याच्या नावे केली. माझ्याकडे सातबारा आहे. सर्व सोने नाणे याच्या घरात भरले. याने सर्व शेती वर कर्ज काढले. मग मी काय उपरा आहे? फक्त दिनेश यांचा वारसदार होता का? या दोघा पती-पत्नींनी आईच्या संसाराची भांडी पळवली. आबाच्या बँकेतल्या रकमा कुठे आहेत? तरी ही आमचे कर्तव्य म्हणून गेल्या सहामहिन्यांपासून आम्ही सांभाळ करीत आहोत. आबांच्या नावे असलेली चार बिघे जमीन याने गिळली. आई बापाची पालन पोषणासाठीची जमीन दिनेशच्या नावे कशी झाली ?'

रमेशने आपली बाजू मांडली. मंडळी सारे काही ऐकत होते. प्रत्येकाने आपला अभ्यास व्यवस्थितपणे केलेला होता. जनाभाऊंनी आपली टोपीसारखी केली आणि ते रमेशला म्हणाले, 'रमेश तुझ्या म्हंन्या परमान, आई बापाची भांडी, सोनं नाणं, पैका अडका, जमीन हडप केली, होय ना? आबांच्या सवसारावर,जमिनीवर तुझा काय अधिकार आहे?'

रमेशने आपली बाजू मांडण्यास सुरुवात केली.

आपल्या दोन्ही मुलांना समान हक्क हवा. समान वाटणी करायची होती. सावत्र व्यवहार का केला? सर्वच जर मोठ्यांच्या घशात घालत असतील तर आम्ही त्यांना का सांभाळावे ?' मध्येय रमेशची पत्नी दिपालीस श्रीधर पंतांनी विचारले,

' दिपाली, या म्हाताऱ्यांस्नी कोण सांभाळणार? मंग तुजा भाऊ, तुज्या आई बापाशी असा वागाय लागला तर तुला काय वाटल? याचा ईचार कर.

श्रीधर पंतांच्या प्रश्नांनी दिपाली शांत झाली पण अनुजाला हुंदका दाटून आला .

'काका आपण म्हणता ते अगदी सत्य आहे. माझ्या आई बापांनी यांचे काय वाईट केले? आयुष्यभर कवडी, कवडी जमा केली. कधी तीर्थयात्रा केली नाही.काजू बदाम तर यांच्या गावीही नव्हते. सूर्यनारायणाच्या साक्षीने कष्ट केलेत. बारा बिघेरान फुलविले. घरदार उभे केले. चांगला चूनेगच्ची वाडा बांधला. गावच्या कल्याणासाठी नेहमी विचार केला. दुसऱ्यांचे भले केले. माझ्या साक्षीने जमिनीचे तीन समान भाग केले. या दोघांना चार चार बिघे जमीन दिली. आबांनी केलेले दागिने, पैसा, आणि सोन त्यांच्याकडे ठेवले. वर्षातून गौरी गणपतीला माहेरी आली, तर चार दिवसांचे माहेर मला मिळत असे.' आता कष्ट करू नका ' हा जावयांचा सल्ला ही आबांनी ऐकला नाही. माझ्या लग्ना नंतर यांची एक गुंज भर सोन्याची मी वाटेकरी नाही. जावई बापू भक्कम आहेत तुझी काळजी नाही, हाच उपदेश मला नेहमी ऐकावा लागे. कारण या लाडक्या मुला, सुनां ना मोठे करायचे होते ना? हेच यां च्या कष्टाचे फळ काय ? आता यांचा सांभाळ करावा, निदान शब्दांनी वार करून त्यांना घायाळ करू नका. म्हातारपणाचा चांगला आशीर्वाद घ्या .' रंगनाथराव बोलते झाले,

'बाय, अनुजा, तुजी खंत बराबर हाय, आबांनी समद्यांसाठन लई केल आणि आता हे बेईमान झालं ङ्ग

'अनु ,तू आज सुखी हाय. आयबासाठी तुजा जीव तुटतो या. ते आमास्नी समजतंय' श्रीधर पंत म्हणाले.

'होय काका,आई-वडिलांच्या मिळकती वर मुलगी म्हणून माझा हक्क नाही का? माझा ही विचार व्हावा, यांची भांडण नसते तर मी आडवी आले नसते .'

अनुजा ने कायद्याचा आधार घेत तिचे मत मांडले. तिचा रोख लक्षात घेऊन जनाभाऊंनी आपले मत मांडले,

'बाय, तुला काय कमी हाय? साहेबाची बायको हाय, आता फकस्त आयबाची खुशाली ईचारायची' तोच म्हातारी सोनाईने उत्तर दिले,

'तुम्ही म्हनतसा ते बरोबर हाय, पर ती काय वाऱ्यावर आली नाय, ते बी माझं लेकरू आहे की? तिचा बी अधिकार हाय.'

आता मात्र अनुजाला बळ मिळाले आणि मोठ्या त्वेषाने ती म्हणाली,

'काका मी परकी नाही, माझ्या भावजयांनी कसेही वागायचे, माझ्या आई वडिलांचे खाण्यापिण्याचे हाल करायचे, त्यांचा प्रत्येक वेळी अपमान करायचा, घराण्याची इज्जत काढायची, सर्व बाजूने त्यांचे पंख छाटायचे. खोटे आळ घेऊन बेईज्जत करायचे. त्यांना जीव नकोसा केलाय. गोड बोलून दिनेशने आपली बापाच्या नावे असलेले जमीन हडप केली. आता त्यांना वाऱ्यावर सोडता येत हे बरे नव्हे'

अनुजाला दुःख अनावर झाले. ती अबोल झाली. शांत बसलेल्या प्रभा आणि दिपाली यांना हे सत्य पचवता येईना. कांगावा करीत तावातावाने त्या बोलू लागल्या,

'होय आम्ही तुझ्या आई वडिलांना लुबाडले; खायला देत नाहीत; मग ते जिवंत कसे? मोठी शहाणी होती तर सांभाळले असते ना? अधिकारांची भाषा वापरते मग सांभाळायचे का नाही?'

दिपालीच्या सुरात प्रभाने सूर मिसळला,

'होय ग, आम्ही दागिने चोरले.. त्यांनी कोणतं डबोल ठेवलं होतं सांगना? या म्हातारीने तुझ्या सरणावर सर्व सोनं घातलं आणि आता सावपणाचा आव आणतेस? तुही कोणाची तरी सून आहेस... फक्त तुझे रंग आम्हाला माहीत नाहीत आणि हो, इथे आमच्यात शहाणपणा करू नकोस, नाही तर तुला अपमानित व्हावे लागेल.

प्रसंग मोठा बाका होता. सामोपचाराला वेगळेच वळण लागू पाहत होते. स्त्रियांनी भांडणात भाग घेतला तर शाब्दिक अनर्थ होतात. सामंजस्याचा मुडदा पडतो, कोण खरं आणि कोण खोटं? याचा निवाडा करणे सोपं नसतं. कारण फक्त चिखल फेक आणि धूळफेक असते

भावनांना आणि अश्रूंना त्यात प्राधान्य असते, शिवाय त्या गदारोळात शब्दांचे वादळ निर्माण होत असते.' आपणच माघार का घ्यावी'? हेच सूत्र या भांडणाचा आत्मा असते .

गिरिधररावांनी खांद्यावरचे उपरने सारखे केले आणि त्यांच्या मनातली चीड त्यांनी व्यक्त केली,

'थांबा, लय बडबड करतासा कवा धरणं तुमचं ऐकतो या, आपलंच म्हणणं खरं करा यचं व्हत तर आम्हास्नी काय भाकऱ्या थापाया बोलावलं व्हय? तुमी दोघीपण आपल्या सासू नंदेशी कसं बोलत्या, हे कळतंय का तुम्हास्नी? आर–कार करतासा, ज्येनंत्येनं आपल्या लायकी परमांन वागाव. ना त्याचा ईसर पडू देऊ नगा, या घरला आल्यात आता शहाणपणा आलाय होय तुमास्नी? जमी न जुमला, पैका अडका हाती येईस्तो वर आपल्या बिळात शांतपणे पडून होत्या आणि आता फणावर काढायला लागल्या व्हय? काय चुकलं त्या पोरीचं? पोरीला आपल्या म्हाताऱ्या आई बापाचा घोर लागतो तुमाला नाय का वाटत?' त्यांनी पुढे निक्षून सांगितले,

'मंडळी हत फकस्त आबा, सोना वहिनी, दिनेश अन रमेश बोलतील बाकीच्यांनी गप गुमान बसावं. या संग्रामपुरात सुनांच राजनाय. पोरांच्या पदरी तुम्हास्नी बांधल म्हंजी त्येंचं तोंड बंद करायचं, ही रीत आहे का ? पोरांनो बायका तुमच्या म्होरं बोलत्यात.. अरे बांगड्या भरल्या काय?'

गिरीधर रावांना शांत करीत श्रीधर पंतांनी आपले मत मांडले,

'अनुजा कायद्याप्रमाणे चौथ्या हिस्स्याची मालकीण हाय तू आबा तिला जमीन दिली? आव तुम्ही फकस्त मुलांचा ईचार केला. आपल्या जीतपनी इस्टेटीची वाटणी करू नये हातातन सोडलं की डोक्या वर बसतया. तुमी नसती आफत वढवली.' आतापर्यंत विमनस्कपणे आपल्या कृतीचा पश्चाताप करीत, गुडघ्यात मान घालून बसलेले आबा बोलते झाले ,

'व्हय म्याच गुन्हेगार हाय. मला आव बुधी आली आन वाटणी केली. आपल्या नंतर आपल्या लेकरास्नी सरकार दरबारी खेट्या घालाया लागू नयेत, नोकरी करताना त्रास नग, म्हनूनशान जीत हाय तोवर वाटणी केली, जमीन नाव केली. नोकरीवाली पोर आम्हास्नी पडत्या काळी दूर लोटणार नाय आस वाटलं व्हतं पर त्येंनीच मला लुटलं. उसाचा रस काढला आन चिपाड फेकून दिलं. माज्या मनातला सल कोणाला सांगू? त्येनला मनाची लाज नाय, तर त्येजनाची काय ठेवतील? म्या समद ऐकतो य, अनु म्हनतिया ते बरोबर हाय, चांगलं घर पाहिलं आन लगीन लावून दिलं. तिला आयबाकडून काय बी अपेक्षा नाय, तिच्या आयेनं समदे दागिन दिल. असं म्हणता आरं का ही लाज आहे का तुम्हा स्नी? ज्येंन त्येण आपल्या मनाला इचारा, मला जास्तीचं बोलाया लावू नगा.. न्या व करा या आलेल्या मंडळीचा मान ठीवा आमचं काय? कोण बी सांभाळेल, नाय तर हतं गावात चार घरी जाऊन कुत्र्यावानी पोट भरू, पर ध्यानात ठिवा, तुमास्नी बी लेकरं हायेत, तुम्हास्नी काय चांगले दिस येतील, व्हय? गाढवावानी, जिथ चारा खाल्ला तिथं लोळू नगा. चांगल्या घरच्या लेकी सुना म्हून आणल्या त्येंनी रंग दाखवलं आर आमच्या पोटाला कीड पडल्यात जगाला काय सांगावं?

आबांचे शरीर थरथरत होते शब्द अडखळत होते.

'देवा ...सोडवर बाबा या चांडाळ चौकडीतून...देवा अमास्नी मरन दे र बाबा. काय पाप केलंय म्या? समदे कुत्रे लचक तोडाया उठलेत... त्या परीस तुझ्या दारी ने बाबा.. देवा .. पांडुरंगा .'

बोलता ना आबांचा तोल गेला आणि ते खाली कोसळले. सोनाईने कालवा केला. मुले सुना लांबूनच पाहत होते. अनुजाने भलत सलत बोलायला सुरुवात केली तिने पदराने वारा घातला, पंचांची धावपळ झाली गावातले बघे एकमेकांना सुचवत होते, 'केश्या, पळकीर. डागत्रास्नी बोलव.. जा पळ जा.' 'तूच पळ की? माझा पाय दुखतोय.' दुसरा म्हणाला.

सूचनांचा खच पडला पण कोणीच डॉक्टरांकडे गेले ना ही. 'कठीण समय येता कोण कामास येतो' ही उक्ती सार्थ ठरली. आबा सावध झाले. पाण्याचा घोट घेऊन सोनाईस म्हणाले,

'अगं गळा काढू नगस. चल आपली पोर मेलीत, आपण निपुतरिक हायेत. आपल्या घरला जाऊ, तू हाय की सैपाक कराया, काय लागलं सावरलं ते म्या आनीन चल, बेगून चल.'

सूर्य मावळतीला झुकला होता. पैलतिरी नेत्र लागलेल्या आबा आणि सोना आई यांना जणू सुचवू इच्छित होता की या जगात कोणकोणाचा असतो? मुले, बाळे, संसार-प्रपंच हा मिथ्या भ्रम आहे. क्षणभरासाठी एकत्र आलेलेजी व गरज संपली की दूर जातात. बालवयी आपले आई-वडील हेच विश्व मानणारा जीव तारुण्याच्या मस्तीत धुंद होतो. अहंकाराचा कैफ त्याला चढतो. लोभाचा, द्वेषाचा आश्रय करतो आणि कालांतराने तो अगतीक होतो, वृद्धत्वाच्या कृतांतकटकामला पुढे तो नतमस्तक होतो. यासाठी जीवाने मायेच्या अवरणातून बाहेर पडावे आणि आपली आपण सोडवण करून घ्यावी.

आबासाहेब धर्मा पाटील तसं फर्ड व्यक्तिमत्व! गाठी अनेक पावसाळ्याचे अनुभव होते. एकेकाळी ग्रामपंचायत सदस्य, सहकारी विकास सोसायटीचे अध्यक्ष, सहकारी दुग्ध संस्थेचे संचालक, इत्यादी पदे त्यांनी भूषवलेली होती. थोरा मोठ्यांच्या ओळखी होत्या. घरी अनेक नेत्यांचा वावर होता. चूनेगच्ची वाड्यातील दिवाणखान्यात कधी राजकारण तर कधी समाजकारणावर साधक बाधक चर्चा होत असत. गाव गाड्यात कुठे खट्ट झाले की लोक न्यायासाठी या वाड्याला साद घालत असत. समाजसेवेबरोबर उत्तम शेती तंत्र आबांनी अंगीकारले होते. लक्ष्मी रुपी गुरा ढोरांना पुत्रवत प्रेम दिले. घरचे गोकुळ झाले. गड्या माणसांनी वाडा भरलेला होता. सोनाई खऱ्या अर्थाने सोन्याने मढवल्या होत्या. लक्ष्मी मुक्तहस्ताने दान देत हो ती. आबांच्या धारदार आवाजाचा गावात आदरयुक्त दरारा होता .लोक आदर करायचे. मुले स्वावलंबी झाले आणि आबांच्या जबाबदाऱ्या कमी झाल्या.

शिवाय आबा आता थकले होते. पांढरे कपडे काहीसे मळकट झाले होते, तरी ही त्यांचा मूळ स्वाभिमानी असलेला स्वभाव बदलला नव्हता. मन काल सुसंगत तडजोड करण्यास धजवणार नव्हतं. कोणी असत्य वा गला तर ते चिडत असत. वयाने बरीच लहान असलेली आजची पंच मंडळी त्यांच्या पुढे जास्त बोलू शकत नव्हती. काठीचा आधार घेत, गावातल्या घराकडे निघालेल्या आबांनी मागे वळून पाहिले आणि नाराजीच्या सुरात ते म्हणाले,

'आर दुपारधरण न्यावं करता येत पर तुमास्नी खरा चोर घावत नाय. तुमास्नी गुन्हेगारास वळखता येत नाय. मोठ्या आशेने तुम्हास्नी साद घातली व्हती म्या .....'

वासरमणी क्षितिजावर विसावला होता. पाखरांची आपल्या घरट्याकडे परतण्याची लगबग सुरू होती. ते चित्र पाहून आबा आणि सोनाई मनी खिन्न झालेत. ज्या पिल्लांना घास भरविला, आयुष्याचा रस्ता दाखवला तेच आता आमच्या जीवावर उठले केवढा हा दुर्दैव विलास? हाच नियतीचा खेळ काय? माणूस नियतीच्या हातातले केवळ खेळणे आहे.

'आई ...आबा ..थांबा ..',

अनुजाच्या आवाजाने त्यांच्या विचाराची तार तुटली. अनुजा त्यांच्या सोबत निघाली. तिघेही विमनस्कपणें, जड पावलांनी चालत होते. दोन श्रांत जीवांना आधार देत अनुजा चालली होती. एका मुलीचं काळीज, काळजी ने तीळतीळ तुटत होते.

मारुती मंदिराजवळ दिनेश, रमेश आणि त्यांच्या बायका तसेच पंच मंडळी बसली होती. रंगनाथरावांनी रमेशकडे आपला मोर्चा वळवला आणि त्यास विचारले,

'रमेश, त्वा तरी खरी भानगड सांगकीर? अमास्नी खरं सांगा.'

रमेशने सत्य कथन करायला सुरुवात केली.

'काका, या दिनेशने, आबा सहा महिने त्यांच्याकडे असता ना गोड.. गोड बोलून आबांची जमीन स्वतः च्या नावे करून घेतली. शिवाय एकदा ते गंभीर आजारी असता ना, गावातल्या घराची किल्ली घेतली आणि कपा टातून आबांचे सोने, चांदी, एफ.डी.च्या पावत्या, मोठमोठी पितळी भांडी, सर्व लंपास केले. आजारपणात त्यांच्या गळ्यातली सोन साखळी आणि अंगाठ्या काढून घेतल्या.

मधेच दिनेश रमेशवर खेकसत म्हणाला,

'याचा अर्थ मी चोरी केली होय? अरे तुमच्याकडे आई-बाबा असताना तू आईच्या अंगावरचे दागिने गोड बोलून काढून घेतलेस. शिवाय आईच्या नावावर असलेले घर स्वतःच्या नावे केलेस आपल्या बुडा खालचा अंधार बघ आधी. हरामखोर, आता मी चोर काय?'

प्रभा आणि दिपालीनी आपापल्या नवऱ्याच्या बाजूने वकिली सुरू केली. कोणीच कोणाचे ऐकत नव्हते. शिव्यांचा वर्षाव झाला. बाब हमरी तुमरी वर आली. धमक्या आणि गलिच्छ आरोपांचे जळजळीत बाण सुटू लागले. मंडळी अवाक झाली. तोच श्रीधर पंत खड्या आवाजात म्हणाले,

' अरे हरामखोरांनो ,....थांबा की वाईच.....'

पुरुषांनी लगाम घातली तरी ही, त्यांच्या बायका मात्र मांजरी सारख्या एकमेकींवर गुरगुरत होत्या .

'मंडळी हतं कुंपणानेच श्यात खाल्लेल हाय, मग न्या व कसा द्यावा? तुमी अमास्नी येडं समजत्यात व्हय? समदे खड्ड्यात जावा. तुमचं तुमी बगा. चला मंडळी घरला. आर असली पोर नग.. भांडा, लेकांनो भांडत रहा...'

कोणत्या ही निर्णया विना, आलेली पंच मंडळी आपापल्या घरी निघून गेली. दिनेश आणि रमेश आपापल्या गाड्यांनी निघून गेले. मारुतीराया हाती गदा घेऊन मूकपणे उभे होते. मानवी मनाच्या विकारांची त्यांना किळस आली असावी. शूद्र मनाचा मानव किती भयानक रूपधारण करू शकतो? फक्त स्वार्थ.. स्वार्थ आणि स्वार्थ .....

आबा सोनाई आणि अनुजा भग्न वाड्याजवळ आले. पावसाळ्यात बहरलेले गवत शुष्क होण्याच्या मार्गावर होते. जीवनही असेच काळाच्या ओघात शुष्क होते. पावसाळा संपला म्हणून गवताने माना टाकल्या तरी ऊन वारायांचा मार सहन करीत उभे होते. एकेकाळी ताठ मानेने उभे असल्याची साक्ष देत होते. आज भग्न होऊ पाहत असलेला वाडा भूतकाळाच्या खुणा जपत उभा होता. गवताने वा वाड्याने कोणाकडेच तक्रार केली नाही. माणसाचं मात्र या उलट आहे स्वार्थासाठी आयुष्यभर तो खटाटोप करतो, स्वार्था आड येणाऱ्यांशी वैर घेतो, त्यांच्या विषयी तक्रारी करणे, खोटेनाटे आरोप करणे विषारी आणि जिव्हारीला गतील असे शब्द बाण फेकणे, नालस्ती करणे, परक्यांकडून स्वकियांचा काटा काढणे, खोटा प्रचार करून सत्याचा आवाज दाबणे या सारख्या सर्व क्रिया तो करतो. आणि दुसऱ्यांच्या यातना बघून त्यास परमानंद होतो. अपवाद फक्त सत प्रवृत्तीच्या साधुसंतांचा आहे. सज्जन किंवा सत्पुरुष खचायला हवा.. यासाठी झटणाऱ्यांची संख्या जगात कमी नाही. जीवन क्षणभंगुर आहे. हे त्याच्या गावीही नसतं. आबा वाड्यावर पोहोचले परंतु मनात स्वकीयांचा सल होता. स्वकियांनी दूर लोटलेला माणूस समाजात चेष्टेचा विषय होतो ,याची त्यांना जाणीव होती. वाड्यात सर्वत्र घाण साचली होती. अनुजाने कंबर कसली आणि घर स्वच्छ केले. जिथे जीवनाचा सूर गवसला, घराचे गोकुळ फुलले, संसार रूपी मोगरा बहरला, तिथे आज सर्वत्र बेसूर झाले होते. गोकुळ आणि मोगरा दोन्ही ही मलिन झाले होते. गावातील विठ्ठल मंदिरात हरिपाठ चालू होता. भजनी मंडळाचे गायन स्पष्ट ऐकू येत होते .

लटीका व्यवहार सर्व हा संसार;<br>
वाया येरझार हरिविण'<br>
हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा:<br>
पुण्याची गणना कोण करी .'

अभंग ऐकून आबा अंतर्मुख झाले पश्चातापाच्या आगीत मन होरपळून गेलं. आपण फक्त संसाराचे ओझे वाहत राहिलो, मंदिरातील कार्यक्रम करण्यासाठी झटलो परंतु भगवंताचे नाममात्र मुखी आले नाही, याची चुटपूट लागली. पण आता फार विचार करण्यात काय अर्थ होता? काळ कोणासाठी थांबला? आबा मायेच्या पाशात, भ्रमरा सारखे संसार कमळात अडकले होते.

आता दिवस ढळला होता नेत्र पैलतीरी लागले होते, उरले हो ते फक्त,

'भोगणे ते फळ संचिताचे ....

या संतवाणी प्रमाणे जगणे. परंतु मनाला शांत करण्याचा प्रयत्न तर करायलाच हवा. यान्यायाने मनाचे सांत्वन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, तरी ही यातनासल रूपाने पुन्हा पुन्हा मनात डोकावत होत्या. त्यांना बंधन घालता येत नव्हतं. तो च कुणी तरी आल्याची चाहूल लागली. जीर्ण दरवाजा कुरकुरला. शेजारच्या बायकांनी आवाज दिला, 'सोनाई, आव, सोनाई; आम्ही भाकऱ्या आन कोरड्यास आणलय बगा ... बाय लई इप्रित घडलया, म्हाताऱ्यास्नी वनवास भोगावा लागतोय ... मेल्यास्नी लाज वाटायला हवी व्हती ...वाटोळ व्हईल.. त्येस्नि बी पोरं हायती ते बी तसंच वागती ल ...' तोच दुसरी शेजारील म्हणाली, बायकांचे बैल मेलं ..त्या बयास्नी काय शरम आहे का?. 'रमाई आणि कमळाई यांनी खंत व्यक्त केली. सोनाई सारखी रडत हो ती. आबा शांतपणे खुर्चीवर बसले होते, तोच कमळाई म्हणाली, 'बाय, त्यो दिनु आन परभा आल व्हतं एका दिसी आन तुमचा संसार भरून गेला की व गाडीत. बर आता जेवा. काय लागलं तर सांगा. बाय, म्या पाणी आणून देते. रातच्याला काळजी करू नगा, आमी हाय ना हतं. परमेसर कसोटी बघतो या तुमची. सकाळच्याला चाय घेऊन येतो आमी ..' जेवण आणि सांत्वन घेऊन आलेल्या शेजारनी परत गेल्या. आबांच्या मनात काही तरी वेगळेच विचार चालू होते जेवल्या नंतर आपल्या मुलीस म्हणाले, 'म्या आज सरकार दरबारी अर्ज द्यायचा ईचार करतोय नवीन कायद्या परमान पोरांनी आपल्या म्हाताऱ्या आयबास्नी सांभाळलं नाय तर त्येंच्यावर खटला द्या वा आणि जमीन परत मिळवावी .. खावटी लावायची ..' मध्येच सोनाई म्हणाल्या,

' म्या काय म्हणते, सरकारात अर्ज देयाचा सोपा हाय पर नोकरीवाल्या लेकरासनी तरास व्हईल, आता आपलं किती दिस राहाइलत? त्येंच कर्माची फळ देयाला त्येंची पोर आहेत की? देवाकडे सारं लिवल हाय ...'

एका आईचं काळीज तळमळून सत्य मांडत होतं. आपल्या मुलांनी कितीही चुका केल्या तरी आईची माया कमी होत नाही. मुलांची दुर्गती ते डोळे पाहू शकत नाहीत. सोनाईच्या सल्ल्या पुढे आबा हतबल झाले. आपला विचार त्यांनी रद्द केला. अनुजा आठ दिवस थांबली. आवश्यक ते सामान तिने आणून टाकले. आई–वडिलांना चार खास खाऊ घातले. त्यांच्या मनातला सल काढण्याचा प्रयत्न केला. एके दिवशी तिने जाण्याची अनुमती मागितली ,

'आबा मी जायचे म्हणते, घरी माझी मुले वाट बघता येत.'

'व्हय...जा बाय.. तु किती दिस थांबशील हतं....' आबांनी दीर्घ उसासा टाकला. खिन्नपणे ते म्हणाले, 'जा बाय तुला बी संसार हाय. पर पोरी, सासू–सार्सयांस्नी आय–बापा परमान सांभाळ. आमचा मान वाढीव. म्हातारी माणसं देवा प्रमाण असत्यात. त्येंचा चांगला आशीर्वाद घ्यावा. आमी काय पिकल्याली पान.. आता फकस्त गळायची वाट बघतोय... आमचा लई ईचार करू नगस..'

दुसऱ्या दिवशी सकाळी अनुजाने आवर सावर केली. निघण्या पूर्वी आई–वडिलांना नमस्कार करण्यासाठी गेली. तिघांनी आता पर्यंत नियंत्रित केलेले दुःख प्रकट झाले, उमाळा दाटून आला. आई–वडिलांना आलिंगन देताना तिघेही रडत होते. पण कधी तरी मायेची मिठी सैल होणारच होती. आबांनी आवंढा गिळला, ओठ

थरथरले, पांढऱ्या भुवया आकुंचित झाल्या. गालावरचे अश्रू पुसत ते म्हणाले,

'जा बाय..शोक करू नग. आमी जलमभर पुरायचो नाय. पाव्हण्या सणी खुशाली सांग..वंगाळ सांगू नग. जग काय करणार? नातवंडांना पाहायचं होतं एकदा. त्येस्नी चांगलं वाढीव, चांगल वळण लाव. तुजं नाव काढतील.'

आबा आणि सोनाई यांचे अश्रू थांबत नव्हते. मायेचा पाझर आटत नव्हता. अनुजाला पहिल्यांदा सासरी पाठवता ना जेवढ्या यातना झाल्या नसतील, त्यापेक्षा आज कैकपटीने यातना होत होत्या. एखाद्या म्हाताऱ्याची काठी हरवावी आणि तो सैरभैर व्हावा, तशी गत झाली होती. संकट रुपी ढगांनी जीवन आकाश व्यापले होते. अंधार ..सर्वत्र अंधार दाटला होता. कोणी कोणाला मार्ग दाखवायचा? अखेर माया पाश तोडून अनुजा निघाली. समाधी वर शिळा लोटल्या सारखे तिला झाले. अनुजा दूर.. दूर चालली होती.. मनात मोठे शल्य घेऊन चालली होती.. ती पुन्हा पुन्हा मागे वळून पाहत होती. पावलं अडखळत होती. पुढे जायला मन धजावत नव्हत, 'कन्या सासुरासी जाये, मागे परतो नी पाहे' या तुकोबांच्या वाणीची प्रचिती येत होती. अनुजाच्या आकृतीकडे दाटलेल्या अश्रूंच्या नजरांनी ते पाहत होते, हातवर करून निरोप घेत होते ...

अखेर एका वळणावर अनुजाची आकृती अस्पष्टशी झाली आणि वृद्धत्व धरणी मातेस शरण गेले... उदास.. उदास, अगदीच भकास... जीवन भासू लागले.

***** ****''******''''****'''******

ग्रामीण भागात काही अंशी माणुसकी तग धरून आहे. शेजारी व गल्लीतली दयावान मंडळी जेवण आणून देत असत. एके दिवशी सकाळी आबा पाणी आणताना, पाय घसरून दगडा वर पडले... पायाचा खुबा मोडला, डोक्याला मोठी खोक पडली. शेजाऱ्यांनी औषधोपचार केलेत. आता आबा पुरते खचले होते. त्यांनी मुलांना हे वृत्त कळवण्यास नकार दिला. आणि दोनच दिवसांनी त्यांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली.

'एकयातनामय जीवनाचा प्रवास थांबला होता'.

जन लज्जेस्तव आलेले मुले आणि सुना वरकरणी खूप जपल्याचे नाटक करीत होते. अनुजा मात्र खूप आक्रोश करीत होती. आबा गेल्या नंतर तिसऱ्या दिवशी पहाटे सोना आईच्या छातीत कळ आली आणि त्यांचेही प्राणोत्क्रमण झाले.... उरल्या फक्त आठवणी .

'एक सहनशील वृद्ध जोडपं<br>
काळाच्या पडद्या आड गेलं....'<br>
'अपने खातिर महल बना या,<br>
आप ही जाकर जंगल सोया'

***** ****''******''''****'''******

तेरा दिवस आठवणीत जातील.. जग रहाटी या न्यायाने जो तो आपल्या कामी लागेल. आयुष्यात आबांनी बरेच विष पचविले,.. अपमान सहन केलेत.. मुलांना संपत्ती हवी होती, 'वृद्ध माता-पिता नको ... वृद्ध माता पिता नको !'

***** ****

जगात असे अनेक माता-पिता असतील, संसारातील व मुलांच्या वेदनांनी अगतिक झालेले... प्रत्येकाची कथा आणि व्यथा वेगळी असेल परंतु आजच्या डिजिटल युगात ही नाथांचे वचन जीवन सार्थकता शिकवून जाते .

'माता पितयासी जो करी नमन,<br>
धन्य पुण्य त्याचे इहलोकी '

(कथेतील कथानक काल्पनिक आहे. कोणाशीही संबंध नाही असल्यास केवळ योगा योग समजावा.)

**उत्तम दिवस आठवणी देतात,<br>
चांगले दिवस आनंद देतात,<br>
वाईट दिवस अनुभव देतात<br>
व ते सर्व खूप काही शिकवून जातात.**



# अभ्यंग व उद्वर्तन
# कथा अभ्यंगाची

**डॉ. लीना बोरुडे**
आयुर्वेदाचार्य पंचकर्म व वैद्यक योग तज्ञ
मो. ९५११८०५२९८

एक आटपाट नगर होते तिथे वैद्या लीना यांचे आयुर्वेद क्लिनिक होते. एक दिवस क्लिनिकमध्ये रोजची ओपीडी सुरू होती तेव्हा एक मध्यमवयीन स्त्री तिच्या शाळकरी मुलीला घेऊन आल्या त्या दोघींची एकच समस्या होती त्वचा खूपच कोरडी झाली आहे आणि केसही खूप गळतात त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर सुरकुत्याही होत्या आणि त्वचा खूप काळवंडलेली होती तर तिच्या मुलीची ही त्वचा खूपच कोरडी रुक्ष होती. त्या दोघींकडे पाहून मी पहिला प्रश्न विचारला की अंगाला तेल कधी लावलंय? त्या दोघींनी एकमेकींकडे पाहिलं आणि उत्तर दिलं की बहुतेक मागच्या दिवाळीत. हे उत्तर मला अगदीच अपेक्षित होते. कारण आपल्याकडे फक्त दिवाळीतच अंगाला तेल लावले जाते. मग सगळ्यात आधी त्या दोघी मायलेकींना अभ्यंगाचे महत्त्व समजावून सांगितले .

आयुर्वेद शास्त्रानुसार स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी दिनचर्या सांगितली आहे आणि या दिनचर्येतील महत्त्वाचा भाग आहे अभ्यंग म्हणजेच अंगाला तेल लावणे होय.

आता अंगाला तेल लावा म्हणले की लोक लगेच कारणे देतात आम्हाला वेळ नाही त्यासाठी आयुर्वेद क्लिनिक किंवा स्पा मध्ये जावे लागेल. परंतु अभ्यंग म्हणजे घरच्या घरी रोज अंघोळीच्या आधी स्वतःच्या हाताने तेल लावणे होय. इथे शरीरात तेल जिरवणे अपेक्षित आहे. आयुर्वेद क्लिनिक किंवा स्पामध्ये करतात तो मसाज वेगळा असतो. अभ्यंग हे रोज करायचे असते.

अभ्यंगम आचरेत नित्यं स जरा श्रमवातहा ।
दृष्टी प्रसादपुष्ट्यायु: स्वप्न सुत्वकत्व दाढर्यकृत ।।

आयुर्वेदानुसार अभ्यंग हे नित्य म्हणजेच रोज करावे कारण त्यामुळे अनेक फायदे होतात जसे म्हातारपण म्हणजेच वार्धक्य दूर राहते. त्वचेची चांगली निगा राखली जाते. त्वचा हा आपल्या शरीरातील सर्वात मोठा अवयव असून ते वाताचे स्थान आहे त्यामुळे अंगाला तेल लावले की वातदोषाचे संतुलन होते शारीरिक श्रमाने आलेला थकवाही दूर होतो. त्वचा कोरडी पडते ड्राय होते कारण त्वचेतील नैसर्गिक स्निग्धता कमी होते. रोज आपण केमिकलयुक्त साबण आणि इतर सौंदर्य प्रसाधने वापरत असतो त्यामुळे शरीरातील नॅचरल मॉइश्चर कमी होते व त्वचा ड्राय होऊ लागते. रोज विशिष्ट औषधी सिद्ध तेलाने जर संपूर्ण शरीराला मालिश केली तर त्वचेची नैसर्गिक चमक व स्निग्धता टिकून राहते. त्वचा सुकुमार व सॉफ्ट राहते त्यामुळे बाहेरून वेगळे मॉइश्चरायझर किंवा क्रीम्स लावण्याची गरज पडत नाही. तसेच अभ्यंगामुळे त्वचेच्या सुरकुत्याही दूर होतात तारुण्य टिकून राहते आणि नेहमी फ्रेश वाटते. अभ्यंगामुळे शरीर पुष्ट होते आयुष्य वाढते गुडघेदुखी कंबर दुखी, सांधेदुखी हे विकार दूर राहतात. स्नायू पिळदार होतात. हाडे बळकट होतात. लहान मुले कृश व्यक्ती व वृद्ध व्यक्तींना रोज अभ्यंग करावे.

शारीरिक थकवा कमी होतो. नियमित अभ्यंग केल्याने सहसा फ्रॅक्चर होत नाही. शरीर बलवान होतं. ऋतुनूसार होणारे बदल सहन करण्याची क्षमता शरीरात येते.

रोज अगदी संपूर्ण अंगाला तेल नाही लावता आले तरी निदान डोके कान व पाय यांना तरी तेल लावावे.

शिर श्रवण पादेषु तं विशेषन शीलयेत ।

त्यामुळे मन शांत होते झोप चांगली व गाढ लागते. पादाभ्यंगामुळे दृष्टी सुधारते. अभ्यंगानंतर येते उदवर्तन म्हणजेच उटणे लावणे आणि कोमट पाण्याने अंघोळ करणे. दिवाळीच्या वेळेस बाजारात अनेक सुगंधी उटणे मिळतात परंतु त्यात बऱ्याचदा भेसळ असते. खात्रीशीर उटणे तुम्हाला आयुर्वेद वैद्यांकडेच मिळेल उठणे हे चंदन अनंता सुगंधी कचोरा यासारख्या विविध आयुर्वेदिक वनस्पतींपासून बनवले जाते जे तुमच्या त्वचेसाठी हितकर असते बाजारात जे महागडे स्क्रब मिळतात त्याला उत्तम पर्याय म्हणजे हे उटणे. त्यामुळे त्वचा चांगली साफहोते डेड स्कीन, ब्लॅकहेड्स, व्हाईट हेड्स निघालंय मदत होते शरीरातील अतिरिक्त चरबी (फॅट्स) कमी होते आणि विशेष म्हणजे त्वचा कोरडी पडत नाही तर छान सॉफ्ट मऊ होते.

आता पुढे येणाऱ्या हिवाळ्यात तर त्वचा खूपच कोरडी होते तेव्हा आत्तापासूनच नियमित अभ्यंग व उद्वर्तन करायला सुरुवात करा म्हणजेच त्वचेचा पोत चांगला राहील रंग उजाडेल टॅनिंगही कमी होईल आणि त्वचेसाठी महागडी क्रीम्स साबण वापरण्याची गरज पडणार नाही.

